महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ

महा सहकार

(PRGI Reg. No. MHMAR/25/A1461)

• पुणे • वर्ष : १ • अंक १ • जुलै-सप्टेंबर २०२५ (त्रैमासिक) • पृष्ठे ५६ • किंमत : रु. ५०/- • संपादक : डॉ. भास्कर नारायण पाटील

2025
International Year of Cooperatives
Cooperatives Build a Better World

MCDC
महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ
२५ रौप्य महोत्सव पूर्तता

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे

पहिला मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५. फोन : (०२०) २९८० ९४०८

E-mail : mcdcpune@gmail.com

Website : www.mahamcdc.com

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ
(रौप्य महोत्सवी वर्ष २०२५-२६)

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे अंतर्गत

शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी

- रास्त दरामध्ये शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी.
- शासनाच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक मदत.
- सारथी प्रायोजित संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनामुल्य प्रशिक्षण.
- रास्त दरात कृषी निविष्ठांचा पुरवठा.

शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे -

- एकुण १० संचालकांचे पॅनकार्ड व आधारकार्ड स्वंयमस्वाक्षरीत (सेल्फ अटेस्टेड)
- जन्मदाखला / प्रमाणपत्र
- मोबाईल नंबर व ईमेल आयडी
- पत्ता - लाईट बिल किंवा इंडेक्स ०२
- बँक स्टेटमेंट पहिले पान व चालू महिन्याचे बँक स्टेटमेंट प्रत
- शेतकरी असल्याचा दाखला
- शिक्षण
- पासपोर्ट फोटो - ३

नोंदणी शुल्क
रु. ३५,४००/-
(GST सहित)

नोंदणी शुल्क खालील बँक खात्यात जमा करावेत.

Bank Name
Federal Bank
Account Number
13480200009347
IFSC Code
FDRL0001348

(वरील सर्व कागदपत्रे स्कॅन करून **mcdcabgc@gmail.com** या मेलवर पाठवावे)

अधिक माहितीसाठी संपर्क - श्रीमती शुभांगी भोलनकर
प्रशिक्षण समन्वयक, मो. क्र. - ९३२२७९४५५०
mcdcabgc@gmail.com
www.mahamcdc.com
महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर ,पुणे - ४११००५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

सत्यमेव जयते

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

जा.क्र/मु.मं.स/ज.क./६८०/२०२५
दि. १९ सप्टेंबर, २०२५

शुभेच्छा

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे रौप्यमहोत्सवी वर्ष विविध उपक्रमांनी साजरे झाले हे समजून आनंद झाला. यानिमित्ताने महामंडळामार्फत राबवल्या जात असलेल्या विविध योजना, उपक्रमांची माहिती राज्यभर पोहोचवण्याच्या दृष्टीने महा सहकार त्रैमासिकाचा पहिला अंक प्रकाशित होत आहे. या स्तुत्य उपक्रमासाठी महामंडळाचे हार्दिक अभिनंदन!

महामंडळ माफक दरात खतपुरवठा, विक्री व विविध परवाने वितरण, प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करत आहे. महामंडळ नाबार्ड आणि एनसीडीसी यांच्या मदतीने शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना, व्यवस्थापन, विपणन, बाजार व वित्त जोडणी, प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहे. तसेच हे महामंडळ कृषी क्षेत्राला आवश्यक असणारी सुविधा पुरवठा करुन विकासाला हातभार लावत आहे.

महामंडळामार्फत रोजगार निर्मितीसाठी सहाय्यभूत होणारे प्रकल्प ग्रामीण भागात उभे राहिले आहेत, ही कौतुकाची बाब आहे. महामंडळ विविध कार्यकारी सेवा संस्थाच्या माध्यमातून गोदाम उभारत आहे. या माध्यमातून ग्रामीण भागात अन्न धान्य साठवण्याची पायाभूत सुविधा तयार होत आहे, ही महत्त्वाची बाब आहे.

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत प्रकाशित होत असलेले महा सहकार त्रैमासिक सहकारी संस्था, शेतकरी आणि पदवीधर तसेच कृषी क्षेत्रात कार्य करणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल, याची खात्री आहे.

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आणि महा सहकार अंकाच्या प्रकाशनास शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, **ई-मेल :** cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

दिनांक १८ सप्टेंबर, २०२५

शुभेच्छा

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त महामंडळामार्फत राज्यातील सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, उपक्रम यांची माहिती देणाऱ्या 'महा सहकार' या त्रैमासिकाचा पहिला अंक तयार करण्यात येत असल्याचे समजून आनंद झाला.

सहकारी संस्थांचे सक्षमीकरण, सहकार क्षेत्राला चालना देणे, आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य पुरवणे, सहकारी बँका, पतसंस्था, दूधसंघ, साखर कारखाने यांच्या विकासासाठी योजना राबवणे, प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी कार्यक्रम आयोजित करणे, शेतकरी आणि ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे आणि सहकार क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रमांना पाठबळ देण्याचं महत्वाचं कार्य महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येत आहे, ही स्तुत्य बाब आहे.

'महा सहकार' या त्रैमासिकाच्या पहिल्या अंकास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

(अजित पवार)

मंत्री
सहकार
महाराष्ट्र राज्य

शुभ संदेश.....

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. महामंडळ वि.का.स. संस्था/ PAC's व FPO's यांना विविध कृषी निविष्ठा/ खत पुरवठा करण्यासाठी सहकारी खत उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून माफक दरात खतपुरवठा करीत आहे. त्यामध्ये या संस्थांना विक्री योग्य किंमतीमध्ये नफा मिळेल असे धोरण ठेवले आहे, त्यांना विविध परवाने काढण्यासाठी मदत होत आहे.

महामंडळ शेतकरी उत्पादक कंपन्या, आणि कृषी पदवीधर, शेतकरी बांधव यांचे जीवनमान उंचवणाऱ्या कृषी विभागाच्या PMFME, नाबार्ड, पोखरा, स्मार्ट, मॅग्नेट, आत्मा, सारथी, मॅनेज इ संस्थांच्या कृषी विपणन, मूल्य साखळी, आधुनिक तंत्रज्ञान, इ शी निगडित सर्व प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम घेत आहे. सहकारी साखर कारखाने, दुग्ध संस्था, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. च्या पदाधिकारी, संचालक मंडळांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम तसेच रौप्य महोत्सवी वर्षात उत्तम प्रतिसाद लाभलेले पाच दिवसीय दर्जेदार कृषिमाल निर्यात प्रशिक्षण महामंडळाने सुरू केले आहेत.

नाबार्ड आणि NCDC यांच्या मदतीने महत्वाकांक्षी, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्थापना, व्यवस्थापन, विपणन, बाजार व वित्त जोडणी,प्रशिक्षण इ. सर्वांगीण कामे मंडळ करीत आहे.

राज्यामध्ये अटल अर्थ सहाय्य योजनेअंतर्गत या वर्षात १८५ सहकारी संस्थांना ३० कोटी रु. इतकी अनुदान व कर्जरुपी मदत झाली असून रोजगार निर्मितीसाठी सहाय्यभूत होणारे प्रकल्प ग्रामीण भागात उभे राहिले आहेत.

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी अन्न भंडारण योजनेअंतर्गत 'जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना' ची नोडल एजन्सी म्हणून मंडळ कामकाज करीत असताना विविध कार्यकारी सेवा संस्था यांच्या ४६ पेक्षा जास्त गोदामांच्या उभारणीसाठी दर्जेदार D.P.R., प्लॅन, एस्टिमेट तयार केले असून या योजनेतून राज्याच्या ग्रामीण भागात ,सहकार क्षेत्रातून सुमारे ५५३२० मे. टन इतकी साठवणूक क्षमता उभी राहत आहे, त्यात महामंडळाचा महत्वाचा सहभाग आहे याचा आनंद आहे. रौप्य महोत्सव पूर्ती निमित्त महामंडळामार्फत विविध योजना, उपक्रम राज्यातील सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतकरी बांधवांसाठी राबवले जात आहेत आणि त्याची माहिती राज्यभर पोहोचवण्यासाठी सुरू करण्यात येत असलेल्या ' महा सहकार ' त्रैमासिकास आमच्या हार्दिक शुभेच्छा. त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन महामंडळाचा अध्यक्ष म्हणून मी करीत आहे.

(बाबासाहेब पाटील)

प्रविण दराडे
प्रधान सचिव

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक 23 SEP 2025

- शुभ संदेश -

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ रौप्यमहोत्सवी वर्ष पुर्ततेनिमित्त नवनवे उपक्रम हाती घेत आहे. विविध कार्यकारी सेवा संस्था, FPO's यांना कृषी निविष्ठा, खत विक्री , कृषी क्षेत्राशी निगडीत सर्व प्रकारच्या परंपरागत प्रशिक्षणाशिवाय मागील वर्षात नव्याने सहकार क्षेत्राशी निगडीत सहकारी साखर कारखाने, दुग्ध संस्था, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. च्या पदाधिकारी, संचालक मंडळांसाठी, प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केले आहेत. रौप्य महोत्सवी वर्षात पाच दिवसीय सर्वकष कृषिमाल निर्यात प्रशिक्षण महामंडळाने सुरू केला आहे व त्याला उत्तम प्रतिसाद लाभला आहे, ही आनंदाची बाब आहे.

नाबार्ड आणि NCDC यांच्या मदतीने महत्वाकांक्षी, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्थापना, व्यवस्थापन, विपणन, बाजार व वित्त जोडणी,प्रशिक्षण इ. सर्वांगीण कामे मंडळ करीत आहे. जागतिक बँक व स्मार्ट प्रकल्प सहायीत योजनेत वखार पावती योजनअंतर्गत महामंडळाच्या कडून राज्यभर विविध कार्यकारी सेवा संस्थांच्या माध्यमातून गोदामांची उभारणी होत आहे. तसेच केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी "अन्न भंडारण योजनेअंतर्गत" 'जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना' ची नोडल एजन्सी म्हणून मंडळ कामकाज करीत असताना विविध कार्यकारी सेवा संस्था यांच्या ४६ पेक्षा जास्त गोदामांच्या उभारणीसाठी दर्जेदार D.P.R., प्लॅन, एस्टिमेट तयार केले असून या योजनेतून राज्याच्या ग्रामीण भागात, सहकार क्षेत्रातून सुमारे ५५३२० मे. टन इतकी साठवणूक क्षमता उभी रहात आहे, ही महत्वाची बाब असून त्यात महामंडळाचा महत्वाचा सहभाग आहे ही कौतुकाची बाब आहे.

रौप्य महोत्सव पूर्ती निमित्त महामंडळामार्फत विविध योजना, उपक्रम राज्यातील सहकारी संस्था, FPO's कृषी पदवीधर व शेतकरी बांधवांसाठी राबवल्या जात आहेत आणि त्याची माहिती राज्यभर पोहोचवण्यासाठी सुरू करण्यात येत असलेल्या 'महा सहकार' त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाचा शुभारंभास हार्दिक शुभेच्छा.

(प्रवीण दराडे)

सत्यमेव जयते

दिपक तावरे
भा. प्र. से.
सहकार आयुक्त

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे - ४११००१
कार्यालय : ०२०-२६१२२५००, २६१२२७३९
Email : ccrcs.pune@coop.maharashtra.gov.in

अ.शा.पत्र क्र.स.आ./शुभसंदेश/२०२५
दिनांक : २४ सप्टेंबर, २०२५

- शुभ संदेश -

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ रौप्यमहोत्सवी वर्षाची पूर्तता झाली आहे. यानिमित्त महामंडळ नवनवे उपक्रम हाती घेत आहे. विविध कार्यकारी सेवा संस्था , FPO's यांना कृषी निविष्ठा, खत विक्री , कृषी क्षेत्राशी निगडीत सर्व प्रकारच्या परंपरागत प्रशिक्षणाशिवाय रौप्यमहोत्सवी वर्षात नव्याने सहकार क्षेत्राशी निगडीत सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध संस्था, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. च्या पदाधिकारी, संचालक मंडळांसाठी, प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केले आहेत. याशिवाय पाच दिवसीय सर्वकष कृषिमाल निर्यात प्रशिक्षण महामंडळाने सुरू केला आहे व त्याला उत्तम प्रतिसाद लाभत आहे, ही आनंदाची बाब आहे.

नाबार्ड आणि NCDC यांच्या मदतीने महत्वाकांक्षी, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्थापना, व्यवस्थापन, विपणन, बाजार व वित्त जोडणी,प्रशिक्षण इ. सर्वांगीण कामे मंडळ करीत आहे. जागतिक बँक व स्मार्ट प्रकल्प सहाय्यीत वखार पावती योजनअंतर्गत महामंडळाच्या कडून राज्यभर विविध कार्यकारी सेवा संस्थांच्या माध्यमातून गोदामांची उभारणी हात आहे. तसेच केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी "अन्न भंडारण योजनेअंतर्गत " 'जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना' ची नोडल एजन्सी म्हणून मंडळ कामकाज करीत असताना विविध कार्यकारी सेवा संस्था यांच्या ४६ पेक्षा जास्त गोदामांच्या उभारणीसाठी दर्जेदार D.P.R., प्लॅन, एस्टिमेट तयार केले असून या योजनेतून राज्याच्या ग्रामीण भागात ,सहकार क्षेत्रातून सुमारे ५५३२० मे. टन इतकी साठवणूक क्षमता उभी रहात आहे, ही महत्वाची बाब असून त्यात महामंडळाचा महत्वाचा सहभाग आहे ही कौतुकाची बाब आहे.

रौप्य महोत्सव वर्ष निमित्त महामंडळामार्फत विविध योजना, उपक्रम राज्यातील सहकारी संस्था, FPO's कृषी पदवीधर व शेतकरी बांधवांसाठी राबवल्या जात आहेत आणि त्याची माहिती राज्यभर पोहोचवण्यासाठी सुरू करण्यात येत असलेल्या ' महा सहकार ' त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाचा शुभारंभास हार्दिक शुभेच्छा.

(दिपक तावरे)

विशेष संपादकीय

जागतिकीकरणानंतर सहकार क्षेत्रास अस्तित्वासाठी करावी लागणारी स्पर्धा, व्यावसायिक कौशल्यांचा अभाव, साधन संपत्तीच्या मर्यादा यासारख्या गंभीर आव्हानांना सामोरे जावं लागत आहे. राज्यामध्ये सहकार क्षेत्रात कार्यरत विविध प्रकारच्या २.१५ लाख सहकारी संस्था पैकी ग्रामीण पातळीवर प्राथमिक संस्था असलेल्या प्राथमिक कृषी विविध कार्यकारी सेवा सहकारी पतपुरवठा संस्था PAC's यांची संख्या २१०९७ इतकी आहे. त्यापैकी नफ्यातील सहकारी संस्था फक्त ४८% आहेत. केंद्र शासन स्तरावर सहकार मंत्रालयाची स्थापना झाल्यानंतर शेतकरी बांधवांचे उत्पन्न दुप्पट करणे या मुळ संकल्पनेतुन 'सहकार से समृध्दी' या केंद्र शासनाच्या अत्यंत महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासन या संस्थांमार्फत ग्रामीण स्तरावर विविध प्रकारचे लाभ देण्याची व्यवस्था विविध योजनांव्दारे प्रथम प्राधान्याने करत आहे. या योजनांची माहिती ग्रामपातळीवर सर्व संबंधितांना अवगत होणं, त्यांना प्रशिक्षणातून, आवश्यक तिथे तांत्रिक सल्ला देऊन, त्यातील घटकांना विविध मार्गाने प्रोत्साहन देऊन पर्यायाने त्या सक्षम होतील, समृद्ध होतील यासाठी आवश्यक तिथे मदत करणे आवश्यक असत. याची अंमलबजावणी विविध कार्यक्रमाअंतर्गत करण्यासाठी महामंडळ व्यग्र आहे. केंद्र सरकारची महत्वाकांक्षी १०००० शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना आणि बळकटीकरण योजना ही शेतकरी बांधवांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या योजनेचा एक महत्त्वाचा भाग आहे. 'FPO's च्या स्थापने पासून, बळकटीकरण आणि सक्षमीकरण, काळानुरूप सुधारित तंत्रज्ञानाची ओळख, बिझनेस मॉडेल चे मार्गदर्शन करून देण्यासाठी, त्यांच्या व्यवसायवृद्धीसाठी महामंडळ नाबार्ड आणि एन.सी.डी.सी. ची मदत घेऊन प्रयत्न करत आहे. महामंडळाने तयार केलेल्या ६१ शेतकरी उत्पादक कंपन्या त्याची साक्ष आहे. आता CBBO म्हणून एन.सी.डी.सी. ने इतर अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना वाटप केलेल्या अपेक्षित प्रगती करु न शकलेल्या एफ.पी.सी. देखील महामंडळ अनुभवाच्या जोरावर चालवायला घेत आहे.

राज्यातील विविध कार्यकारी सहकारी संस्था ,शेतकरी उत्पादक कंपनी / संस्था बचत गट यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन, तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय सल्ला, चर्चासत्र, कार्यशाळा याद्वारे प्रशिक्षण, निधीची उभारणी, व्यवसायवृद्धीसाठी मदत, फॉरवर्ड आणि बॅकवर्ड लिंकेजचे बळकटीकरण, ई-प्लॅटफॉर्म माहिती सेवा या प्रकारची मदत करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या 'अन्न भांडारन योजना' या महत्वाकांक्षी धोरणाअंतर्गत 'वर्ल्ड लार्जेस्ट ग्रेन प्रोग्राम' (WLGP) या महत्वाकांक्षी योजने मध्ये महामंडळाने पन्नास वर PACS च्या गोदामाचे दर्जेदार प्लॅन, एस्टिमेट आणि डी.पी.आर. तयार करून राज्यामध्ये तयार होणाऱ्या गोदामस्वरूपी ५५००० मे.टन संभाव्य क्षमतेमध्ये आपला महत्त्वाचा वाटा अधोरेखित केलेला आहे.

महाराष्ट्रातील कृषीमाल निर्याती मध्ये राज्यातील शेतकरी बांधवांचा स्वतःचा सहभाग वाढावा या उद्देशाने 'कृषीमाल निर्यात' याबाबत ए टू झेड माहिती देण्यासाठी माफक दरात पाच दिवसीय निवासी निर्यात प्रशिक्षण कार्यक्रम गेले तीन महिन्या पासुन राबवत आहे. याला उदंड प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय महामंडळाने सहकार क्षेत्र सक्षमीकरण करण्यासाठी नवनवीन प्रशिक्षण क्षेत्र जसे सहकारी पतसंस्था, सहकारी साखर कारखाने, नागरी सहकारी बँका, सहकारी दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, या क्षेत्रातही संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी वर्ग यांना अचूक, सर्वकष, दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी गेल्या वर्षभरात यशस्वीरित्या पदार्पण केले आहे. 'प्रशिक्षण व सर्वकष मदती अंतर्गत सहकारातून समृद्धी' हे महामंडळाचे सध्याचे ध्येय आहे. 'शासन आपल्या दारी 'या शासनाच्या धोरणाचा प्रत्यक्ष अवलंब करून 'गडचिरोली ते गडहिंग्लज' असे राज्यभर आवश्यक तेथे जाऊन दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी महामंडळ कटिबध्द् आहे. त्याशिवाय याच्या नियोजनात्मक प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी महामंडळाने आपली सुसज्ज वेबसाईट तयार केलेली आहे. ती वेबसाईट दर दोन दिवसांनी अद्यावत केली जाते आणि त्यावर महामंडळ आगामी काळात आयोजित करीत असलेल्या प्रशिक्षणाची माहिती देते. महामंडळ करीत असलेली कार्यवाही आणि सहकार क्षेत्रातुन सर्वस्व प्रगतीसाठी 'सहकार से समृद्धी' या केंद्र शासनाने आखलेल्या योजनेअंतर्गत महामंडळ राज्यासाठी आपला निश्चित असा चांगला सहभाग नोंदवत आहे. ही कार्यवाही महामंडळाचे आदरणीय अध्यक्ष व राज्याचे सन्माननीय सहकार मंत्री महोदय श्री.बाबासाहेब पाटील यांच्या सततच्या मार्गदर्शनाखाली करत आहे. याशिवाय महामंडळाला महामंडळाचे सन्माननीय संचालक राज्याचे सहकार व साखर आयुक्त श्री. दीपक तावरेसाहेब, पणन संचालक श्री. विकास रसाळ साहेब व इतर संचालक मंडळाच्या सदस्याचे मार्गदर्शन व मदत सातत्याने लाभत आहे.

महामंडळ सहकार व कृषी क्षेत्रासाठी करत असलेल्या काम काजाची माहिती सर्वांना एक त्रैमासिकाद्वारे जावी अशी महामंडळाचे अध्यक्ष आदरणीय बाबासाहेब पाटील साहेब यांची तीव्र इच्छा होती. त्यास अनुसरूनच या त्रैमासिकाची आखणी करण्यात आली आहे. सहकारी संस्था, कृषीशी निगडित शेतकरी बांधवांना पुरवायचं शेतीम धील आधुनिक तंत्रज्ञान, सर्वकष माहिती, विषय या त्रैमासिकाद्वारे प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. महामंडळ प्रसिद्ध करत असलेल्या 'महा सहकार' त्रैमासिकास निश्चित सर्वांचा उदंड प्रतिसाद मिळेल अशी मी अपेक्षा बाळगतो आणि माझं विशेष संपादकीय लेखन पूर्ण करतो.

श्री. मंगेश तिटकारे,
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे

'महा सहकार' हे मासिक मालक, महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांचेकरिता प्रकाशक मंगेश भगवंत तिटकारे यांनी मुद्रक विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, द्वारा शॉप नं. २, कोणार्क उद्योग, सर्व्हे नं. १७७, एरंडवणे, पुणे - ४११ ००४ येथे छापून साखर संकुल, नरवीर तानाजी वाडी, शिवाजी नगर, पुणे - ४११ ००५ येथून प्रसिद्ध केले.

संपादक - डॉ. भास्कर नारायण पाटील

'Maha Sahakar' quartely periodical is owned by Maharashtra Cooperative Development Corporation, Published by Mangesh Bhagwant Titkare, Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, Sr. No. 177, Erandwana, Pune - 411 004 Published at Sakhar Sankul, Narveer Tanaji Wadi, Shivaji Nagar, Pune 411 005.

Editor - Dr. Bhaskar Narayan Patil

महा सहकार

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ

२५ रौप्य महोत्सवी वर्ष

वर्ष : १ अंक : १ जुलै-सप्टेंबर २०२५

पृष्ठे : ५६ किंमत : रु. ५०/-

(वार्षिक वर्गणी रु. २००/-)

संपादक : डॉ. भास्कर नारायण पाटील

मार्गदर्शक

मा. ना. श्री. बाबासाहेब पाटील,

सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य

मा. श्री. दीपक तावरे

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा प्रभारी साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य, पुणे

मा. श्री. विकास रसाळ

पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

मा. श्री. गोकुळ राठी

तज्ज्ञ संचालक

श्री. मंगेश तिटकारे

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे

वाचनालयांना आवाहन

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ हे राज्य शासनाने स्थापन केलेले महामंडळ असून कंपनी कायद्यानुसार दि. २८ ऑगस्ट २००० रोजी महामंडळाची स्थापना झाली आहे. राज्याचे सहकार मंत्री महोदय हे महामंडळाचे मा. अध्यक्ष आहेत.

राज्यातील वाचनालयांना 'महा सहकार ' त्रैमासिकाची वर्गणी भरणे संदर्भात खालील माहीती देण्यात येत आहे. वार्षिक वर्गणी रु. २००/-डिमांड ड्राफ्ट, रोखीने भरता येते. वर्गणी चेकने पाठविल्यास चेक रु. २२०/- चा पाठवावा. त्रैमासिकाच्या वर्गणीचा डिमांड ड्राफ्ट/ चेक 'महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ ' या नावाने काढावा.

– संपादक

अनुक्रमणिका

- विशेष संपादकीय....8
- साखर उद्योगात उपपदार्थ निर्मितीसाठी एआय वर भर हवा सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील....१०
- सहकारी संस्थेची नोंदणी, अनुषंगिक कामकाज आणि सुप्रशासनासाठी QR कोडचा वापर....११
- कृषी पणनच्या विकासात पणन संस्थांचे योगदान....१५
- कृषी मालाची निर्यात - एक संधी....१८
- प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)....२२
- नागरी सहकारी बँकांचं महत्व अधोरेखित व्हायलाच पाहिजे....२५
- ज्ञानाचे इनपुट शेती व्यवसायात टाका....२६
- मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनी लिमिटेड....२७
- एन.बी. फॉर्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड....३१
- लक्ष्मी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. लक्ष्मीनगर....३३
- तीन महिनेच हंगाम चालण्याने साखर कारखानदारी तोट्यात....३४
- तीन महिनेच हंगाम चालण्याने साखर कारखानदारी तोट्यात....३५
- पोकरा प्रकल्पामुळे आर्थिक स्थैर्य....३६
- बिगरशेती पतसंस्थांची गुंतवणूक आणि वैधानिक तरलता....३७
- मनी लॉन्ड्रिंग : पतसंस्थांसाठी जागरुकता व सावधगिरी....३९
- सहकारी संस्थांमधील सभासद व ग्राहक साक्षरता....४०
- को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रगतीसाठी संचालकांची भूमिका महत्त्वाची....४२
- चार भिंतीच्या पलीकडील बँकिंग....४४
- पतसंस्था व बँकिंग क्षेत्रातील क्रांती : AI आणि ML चे युग....४५
- अर्थव्यवस्थेची दिशा ठरविणारे राष्ट्रीय सहकार धोरण....४७
- सहकारी संस्थांच्या खर्चाचे व्यवस्थापन....४९
- को-ऑपरेटिव्ह आणि एन.बी.एफ.सी.....५१
- फुलबाजाराशी संबंधित पुरक उद्योगाकडे वळावे : मंगेश तिटकारे....५२
- शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करा : श्री. अनिरुध्द देसाई....५२
- 'देशात दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था होणार' केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा....५३
- त्रिभुवन सहकार विद्यापीठाचा अभ्यासक्रम त्या त्या राज्यांतील भाषेत शिकविणार - मोहोळ....५३
- शेतकऱ्यांनी नवीन मार्केट खुले केले पाहिजे....५४

साखर उद्योगात उपपदार्थ निर्मितीसाठी एआय वर भर हवा

सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील

साखर उद्योगासाठी लवकरच नवे धोरण जाहीर करणार

राज्यातील साखर उद्योगासाठी नजीकच्या काळात नवे धोरण जाहीर करण्यात येणार असून या माध्यमातून उपपदार्थाला प्राधान्य देण्याबरोबर या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापर वाढविण्यावर भर दिला जाणार आहे, असे राज्याचे सहकार मंत्री मा. श्री. बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत ते बोलत होते.

राज्याचे साखर आयुक्त श्री. सिद्धराम सालीमठ, विस्माचे अध्यक्ष श्री. बी. बी. ठोंबरे, कार्यवाह श्री. पांडुरंग राऊत आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट ऊस विकास पुरस्कार पुणे जिल्ह्यातील श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना, तांत्रिक आणि नवीनतम गटात पुरस्कार सातारा येथील जयवंत शुगर्सला, जैव ऊर्जा आणि जैवइंधन गटात कोल्हापूरच्या श्री गुरुदत्त शुगर्स, आर्थिक व्यवस्थापन गटात नाशिकच्या द्वारकाधीश साखर कारखाना, सामाजिक दायित्त्व गटात दालमिया भारत शुगर कारखाना तर सर्वोत्कृष्ट साखर कारखाना गटात धाराशीव येथील नॅचरल शुगर अँड अलाईड कारखाना यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. दिवसभराच्या परिषदेत विविध विषयांवर सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये भारतीय साखर उद्योग क्षेत्रातील परिवर्तन आणि भविष्याचा मार्ग, साखर उद्योग क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि हरित हायड्रोजन उत्पादन या विषयाचा समावेश होता. यावेळी विस्मा मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

※ उपपदार्थांकडे लक्ष देणे गरजेचे –

सहकार मंत्री मा. श्री. पाटील यांनी सांगितले की, साखरेच्या उत्पादनाबरोबर अन्य उपपदार्थ याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर

विस्माच्या वतीने आयोजित केलेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय साखर उद्योग परिषदेचे उद्घाटन करताना सहकार मंत्री मा. ना. बाबासाहेब पाटील. डावीकडे साखर आयुक्त श्री. सालीमठ, उजवीकडे विस्मा अध्यक्ष श्री. बी.बी. ठोंबरे, सचिव श्री. पांडुरंग राऊत, कार्यकारी संचालक श्री. अजित चौगुले.

वाढविण्याची गरज असून कमी पाण्यात ऊस शेती कशी करता येईल हे पाहायला हवे तसेच माती परीक्षण, पाण्याचा वापर, ठिबक सिंचन, उसाचे नवे वाण आणि मुख्य म्हणजे ऊसाचा गाळप कालावधी वाढविणे याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. या नवीन धोरणाच्या माध्यमातून या क्षेत्राला नवी दिशा देण्याचा प्रयत्न आहे असे त्यांनी सांगितले.

※ साखर उद्योगाचा अहवाल शासनाला सादर –

साखर आयुक्त श्री. सालीमठ यांनी भाषणात नवीन साखर धोरणाबाबत सविस्तर माहिती सांगितली. ते म्हणाले, नवीन अहवाल तयार करून शासनाला देण्यात आला आहे. त्यामध्ये उपपदार्थ उत्पादन, ऊसाचा नवीन वाण, कमी पाण्यातील ऊस शेती आदी बाबींचा विचार करण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षांतील गाळप हंगामाचा विचार केला तर १५० दिवस गाळप हंगाम सुरू राहिला, असे सात वेळा घडले आहे. एका वर्षी ७२ दिवस तर दोन वर्षे १५० पेक्षा कमी कालावधीसाठी हंगाम सुरू राहिला आहे. राज्यातील ७५ टक्के साखर कारखाने हे दुष्काळी भागात आहेत. यापुढील काळात कमी पाण्यात उस शेती करण्याचा विचार करण्याची गरज आहे. एकीकडे एफआरपीसाठी स्पर्धा सुरू आहे तर दुसरीकडे उसाचे क्षेत्र कमी होत आहे. राज्यात १६ लाख हेक्टर्सवरुन ते आता ११ लाख हेक्टर्स इतके राहिले आहे. ऊसाचे नवे वाण घेण्याकडे कल कमी आहे असे ते म्हणाले.

※ खाजगी साखर कारखान्यांसाठी नवीन कल्पना –

विस्मा अध्यक्ष श्री. ठोंबरे यांनी सांगितले की, राज्यात असोसिएशनचे १३३ कारखाने सदस्य आहेत. साखर उत्पादनात खासगी कारखान्यांचा वाटा ५० ते ५५ टक्के असून इथेनॉल उत्पादनात ७२ टक्के वाटा आहे. खासगी कारखान्यासाठी नवीन कल्पना राबविण्यात येत आहेत. साखर उद्योग क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. यावेळी त्यांनी असोसिएशनच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला. श्री. महेश देशमुख यांनी आभार मानले.

सहकारी संस्थेची नोंदणी, अनुषंगिक कामकाज आणि सुप्रशासनासाठी QR कोडचा वापर

सहकारी संस्थेची नोंदणी व अनुषंगिक कामकाजासाठी QR कोडचा वापर

डॉ. सोपान शिंदे

महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी भागात आर्थिक व सामाजिक विकासाचे प्रभावी साधन म्हणून सहकारी संस्थांकडे पाहिले जाते. राज्यात असलेल्या २,१७,४१० (सन २०२२ अखेर) सहकारी संस्थांपैकीसहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या १,१५,१७२, प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्थांची (विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था) संख्या २०,९३०, नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची संख्या २०,५४६ व उर्वरीत इतर सहकारी संस्थांची संख्या ६०,७६२ आहे.

राज्यात सहकारी संस्थांची नोंदणी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियम १९६१ अंतर्गत तरतुदीनुसार करण्यात येते. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम ४ मधील तरतुदी अनुसार एकूण १५ प्रकारच्या सहकारी संस्थांची नोंदणी करण्यात येते आणि अशा नोंदणी केलेल्या सहकारी संस्थांचे उक्त नियम १९६१ चा नियम १० मधील तरतुदी अनुसार एकूण १३ प्रमुख वर्ग आणि एकूण २० प्रमुख उपवर्गीकरण यामध्ये वर्गीकरण करण्यात येते.

सहकारी संस्थांची नोंदणी ही सहकार चळवळीच्या संख्यात्मक व गुणात्मक वाढीसाठी आवश्यक अशी प्रमुख बाब आहे. सहकारी संस्थांची नोंदणी हि सहकारात प्रवेश करण्यासाठी पहिली पायरी

आहे. त्यामुळे सहकारी संस्थांची नोंदणीची प्रक्रिया सुलभ व सुखकर होणेसाठी प्रकार निहाय सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक असणारी माहिती व कागदपत्रे जसे की नोंदणीचे निकष, नोंदणीच्या अटी व शर्ती, नियोजित संस्थेचे नाव आरक्षित करणे व बँकखाते उघडणे, नियोजित संस्थेचीनोंदणी करणे, नोंदणी फीचे दर, संस्था प्रकारनिहाय आदर्श उपविधी आणि यासाठी नोंदणीचे अनुषंगाने आवश्यक असे अर्ज व माहितीचा नमूना आणि या सर्वांची चेकलिस्ट अशी माहिती व कागदपत्रे उपलब्ध होणे आवश्यक ठरते.

राज्यातील सहकारी संस्थांच्या नोंदणीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियम १९६१, सहकारी संस्थांचे प्रकारनिहाय आदर्श उपविधी नमूना, नोंदणीचे निकष व नोंदणीच्या अटी व शर्ती निश्चित करणारे मा.सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परीपत्रकीय मार्गदर्शक सूचना यांची माहिती मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाचेपुढिल संकेतस्थळावर स्वतंत्रपणे व वेगवेगळया शिर्षकाखाली डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत https://sahakarayukta.maharashtra.gov.in/

संस्था नोंदणीची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने, कालबध्द रीतीने पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सदरची सेवा महाराष्ट्र लोकहक्क सेवा अधिनियम, २०१५ अंतर्गत सहकार विभागाच्या द्यावयाच्या पाच सेवांमध्ये समाविष्ट करून शासनाने नियोजित सहकारी संस्थेचे नाव आरक्षित करणे व बँक खाते उघडणे आणि नोंदणी करणे याबाबतची सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. आपले सरकार पोर्टलचे संकेतस्थळ पुढीलप्रमाणे आहे – https://aaplesarkar.mahaonline.gov.in/en/Login/Login

सहकारी संस्थांची नोंदणीसंबंधाने उपरोक्त ऑनलाईन सुविधांचा वापर करण्याासाठी विज आणि इंटरनेट अनिवार्यपणे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सर्वसामान्य नागरीकांना सदरच्या सेवा आकर्षित करण्याासाठी तसेच त्या सिटीजन-फ्रेंडली/युजरफ्रेंडली (वापरकर्तास्नेही) होणेसाठी पूर्वतयारी म्हणून नोंदणीबाबतची उपरोक्त माहिती विनाअर्ज, विनामूल्य, विनासंपर्क (शासकीय कार्यालयाचे संपर्काखेरीज), विनाविलंब व पर्यावरणस्नेही रीतीने एकत्रिपणे एकाच छताखाली (Under One Umbrella) उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. तसेच सहकारी संस्थांच्या सुप्रशासनासाठी सहकारी संस्थांशी संबंधीत कायदे व नियम यांची प्रत देखील सहकारी संस्थांना उपलब्ध करून देणे गरजेचे ठरते. सदरचे हेतू साध्य करणेसाठी QR कोड तंत्रज्ञानाचा वापरहा प्रभावी पर्याय आहे.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक व तालुका सहाय्यक निबंधक,सहकारी संस्थायांचे कार्यालयात QR कोड तंत्रज्ञानाचा वापर करून (१) सहकारी गृहनिर्माण संस्था, (२)

प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्थां (विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था), (३) नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, (४) सर्वसाधारण सहकारी संस्था आणि (५) मजूर सहकारी संस्था यांच्या नोंदणीची सर्व प्रकारची माहिती,नमूने व कागदपत्रे यादी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच प्रमुख कायदे जसे की,(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (म राठी व इंग्रजी आवृत्ती), (२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४, (३) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४,(४) महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी- विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३, (५) महाराष्ट्र लोकहक्क सेवा अधिनियम, २०१५, (६) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५,(७) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ (मोफा),(८) म हाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम, १९७० व (९) नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पत संस्थाकरीता नियामक मंडळाचे परीपत्रकीय निदेशांचे संकलन यांचे QR कोड ग्रंथालय उपलब्ध करून देण्यात आले आहे.

याच रीतीने सहकार विभागातील कार्यालयामध्ये QR कोडचा वापर करून (१) शासनाच्या विविध योजनांची माहिती जसे योजनेचा शासन निर्णय, योजनेचे स्वरूप, निकष व लाभार्थींची यादी, (२) जिल्हयातील सहकारी संस्थांची संपर्क सूची - संस्थेचे नाव व पत्ता, इमेल, चेअरमन व सचिव यांचे संपर्क क्रमांक, (३) विषयनिहाय प्रसिध्द करावयाच्या सूचना (४) कार्यालयाने प्रसिध्द करावयाचे स्वप्रकटीकरण आणि (५) अधिनियम व नियमान्वये जतन करावयाच्या सार्वजनिकरीत्या निरीक्षण करण्यास उपलब्ध करावयाच्या विविध प्रकारच्या नोंदवही व अभिलेख,इत्यादी जनतेस सहज व सुलभरीत्या उपलब्ध करून देणे शक्य आहे.

QR कोडद्वारे माहिती प्राप्त करणेसाठी कार्यालयास अर्ज करणे व नक्कल फी भरणा करणे तसेच कार्यालयातील कर्मचारी यांना संपर्क करण्याची गरज राहत नाही. माहितीचा अधिकार अधिनियमात अपेक्षित असलेल्या माहितीचे स्वप्रकटन केल्यामुळे माहितीचा अधिकार अंतर्गत येणारे अर्जांचे संख्येत लक्षणीय घट होण्यास मदत होईल. QR कोडद्वारे माहिती आपोआप उपलब्ध होत असल्याने अशा प्रकारची माहिती देणेसाठी खर्च होणारा कर्मचाऱ्यांचे श्रम व वेळ वाचणार असून कर्मचारी इतर कामकाजासाठी वेळ देवू शकतील. या सर्व बाबींचा विचार करता, प्रशासनात QR कोडचा वापर केल्यास नक्कीच कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता व प्रशासकीय गतिमानता राखली जाईल.

'सहकार सोपान' या शिर्षाखाली सदर QR कोड पोस्टरचे विम ोचन मा.ना. श्री. बाबासाहेब पाटील, मंत्री सहकार, महाराष्ट्र शासन यांचे शुभहस्ते करण्यात आले आहे. सदरचे QR कोड पोस्टर्स हे डिजीटल व प्रिंटिंग अशा स्वरूपाचे असून ते सर्वांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सहकारी संस्थांचे सुप्रशासनासाठी QR कोडचावापर

राज्यातीलसहकारी संस्थामध्ये QR कोड तंत्रज्ञानाचा वापर हाकेवळ मोबाईल बँकींग व आर्थिक देणी भागविण्यापुरता सिमीत आहे. सहकारी संस्थांच्या पारंपरिक कागदपत्रांवर आधारित व्यवस्थापनात सर्वसाधारणपणे पुढील अडचणी येतात जसे की, माहिती मिळण्यास अवाजवी विलंब, पारदर्शकतेचा अभाव आणि सदस्यांच्या सहभागाचे अल्पप्रमाण यावर QR कोड तंत्रज्ञानाचा वापर हा प्रभावी उपाय होवू शकतो.

सहकारी संस्थांच्या पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासनासाठी QR कोड तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. या तंत्रज्ञानामुळे सहकारी संस्थांच्या व्यवहारांमध्ये डिजिटल ट्रॅकिंग, माहितीची सहज उपलब्धता आणि सदस्यांशी संवाद सुलभ होण्यास मदत होईल. परिणामी सहकारी संस्थांमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता आणि डिजिटल साक्षरता यामध्ये वाढ होईल.तसेच QR कोड तंत्रज्ञानाचा वापर केल्याने सहकारी संस्थांमध्ये काही अंशी डिजिटल परिवर्तन होवून ग्रामीण भागातही डिजिटल साक्षरता वाढवण्यास मदत होईल.

सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनात QR कोडचा वापर-

सहकारी संस्थेच्या कामकाजामध्ये QR कोडचा वापर खुप प्रभावी ठरतो. त्याचप्रमाणे संस्थेचे व्यवस्थापन आधुनिकतेने करण्यासाठीच्या तंत्रज्ञानाच्या वापरातील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. उदाहरण दाखल पुढिलप्रकारे QR कोडचा वापर करता येईल-

अ. क्र.	उपयोग	तपशील
१	संस्थेचा पत्ता व अनुषंगीक माहिती	१. संस्थेचा पत्ता, इमेल अॅड्रेस, दुरध्वनी क्रमांक, २. शाखांचे पत्ते व संपर्क क्रमांक माहिती, ३. संचालक मंडळ व मूख्य कार्यकारी अधिकारी /सचिव नाव व संपर्क क्रमांक, ४. गुगल मॅपवरील मुख्य कार्यालय आणि शाखा कार्यालय यांचे लोकेशन
२	पेमेंट सुलभ करणे	१. सदस्यांना UPI किंवा अन्य डिजिटल पेमेंट प्रणालीद्वारेत्यांच्या कर्ज हप्त्याचे किंवा देय रकमेचे पेमेंट QR कोड स्कॅन करून सहज करता येते. २. रोख व्यवहार कमी होतो आणि डिजिटल ट्रॅकिंग सुलभ होते.
३	सदस्य नोंदणी व त्यांची माहिती अद्यावत करणे	१. सदस्य ओळखपत्र (मेंबर आयकार्ड) २. प्रत्येक सदस्यासाठी स्वतंत्र कोड तयार करूनत्यामध्ये त्याची वैयक्तिक व आर्थिक माहिती उपलब्ध करून देणे.

४	ठेव व कर्ज व्यवहार	१. प्रत्येक सदस्याची ठेव, व्याज दर, मुदत संपते तो दिनांक याची माहिती २. प्रत्येक सदस्याचा कर्ज अर्ज, मंजुरी व परतफेड याची माहिती
५	निवडणूक प्रक्रिया	१. सभासद मतदार ओळखपत्र, २. मतदार यादी प्रसिध्दी, ३. निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी, ४. उमेदवारांची माहिती व निवडणूक संबंधित कागदपत्रे, ५. निवडणूक निकाल
६	तक्रार व्यवस्थापन	सदस्य तक्रार नोंदवू शकतात व तिची स्थिती पाहू शकतात.
७	उपस्थिती नोंद	QR कोड स्कॅन करून उपस्थिती नोंदवणे जसे की, वार्षिक/ विशेष सर्वसाधारण सभेसाठी सदस्य उपस्थिती.
८	योजनांचे माहितीपत्रक, सर्वसाधारण सभा नोटिस व अजेंडा, आणि वार्षिक अहवाल	१. संस्थेच्या विविध ठेव, कर्ज व इतर योजना, २. वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभा नोटिस, अजेंडा व इतिवृत्त, ३. संस्थेचा वार्षिक अहवाल, ४. वार्षिक आर्थिक पत्रके, ५. लाभांश रक्कम यादी
९	अभिलेख व दस्तऐवज व्यवस्थापन	१. संस्थेच्या महत्त्वाच्या कागदपत्रांवर QR कोड लावून त्यात डिजिटल प्रत जोडता येते. २. स्कॅन केल्यावर संबंधित दस्तऐवज लगेच पाहता येतो.
१०	प्रसिध्दी, जाहिरात आणि संपर्क	१. संस्थेच्यासेवा, योजना किंवा नवीन ऑफर्ससाठी QR कोड वापरून माहिती प्रसारित करता येते. २. सदस्य QR कोड स्कॅन करून वेबसाइट, फॉर्म किंवा व्हॉट्सअ‍ॅप लिंकवर थेट पोहोचू शकतात.

काय आहे QR कोड?

QR (Quick Response) कोड हे एक द्विमितीय बारकोड आहे, ज्यामध्ये माहिती डिजिटल स्वरूपात साठवलेली असते. स्मार्टफोन किंवा QR (Quick Response) कोड स्कॅनरद्वारे स्कॅन करून ती माहिती सहज वाचता येते.

कसा वापरावा QR कोड?

डिजीटल आणि किंवा प्रिटिंग स्वरूपातील ठ्ठ कोडहे मोबाईल फोनमधील QR (Quick Response) कोड स्कॅनरद्वारे, स्मार्टफोनच्या कॅमेराद्वारे किंवा गुगल लेन्सद्वारे स्कॅन करून वाचता येतात आणि सदरच्या माहितीपैकी सर्व किंवा निवडकपणे डाऊनलोड देखील करता येते.

QR कोड प्रणालीचा अंमलबजावणीचा सर्वसाधारण आराखडा कसा असावा ?

सर्वसाधारणपणे QR कोड प्रणालीचा वापर करण्याचा उद्देश/ गरज आधारीत QR कोड तयार करणे सुलभ व सोयीचे ठरते. विनामूल्य आणि मर्यादित वापरासाठी ऑनलाईन QR कोड जनरेशन टूल उपलब्ध आहेत, परंतु त्यांच्या वापरावर मर्यादा आहेत. QR कोड हे static व Dynamic अशा दोन्ही प्रकारचे आहेत. ज्याममध्ये static प्रकारात माहितीमध्ये कोणताही बदल करता येत नाही. तर Dynamic प्रकारात माहितीमध्ये कालानुरूप कोणताही बदल करता येतो परीणामी असा QR कोड दीर्घकाल वापरात राहतो. या सर्व बाबींचा विचार करता QR कोड प्रणालीचा अंमलबजावणीचा सर्वसाधारण आराखडा पुढिलप्रमाणे असावा –

टप्पा १ : गरज ओळखणे –

कोणते प्रयोजन/कारणासाठी QR कोड वापरणारः देयक, सदस्य माहिती, दस्तऐवज, सभा

टप्पा २ : QR कोड जनरेशन टूल निवडणे –

qr-code-generator.com, Google Forms, UPI Apps वापरून QR तयार करा.

टप्पा ३: डेटा संकलन व QR कोड तयार करणे–

सदस्यांची माहिती Excel मध्ये संकलित करा व प्रत्येकासाठी QR कोड तयार करा.

टप्पा ४: QR कोड वितरण–

QR कोड छापा व डिजिटल स्वरूपात WhatsApp/SMS द्वारे पाठवा

टप्पा ५ : स्कॅनिंग प्रणाली तयार करणे–

QR Scanner App वापरून माहिती वाचणेव स्कॅन केल्यावर डेटाबेसमध्ये नोंद

टप्पा ६ : प्रशिक्षण व जनजागृती–

कर्मचारी व सदस्यांसाठी QR वापर प्रशिक्षणदेणे व फायदे सम जावून सांगणे

टप्पा ७ : सतत परीक्षण आणि सुधारणा

QR प्रणालीचा वापर नियमितपणे तपासा व फीडबॅक घेऊन प्रणालीत सुधारणा करा.

टप्पा ८ : सुरक्षा आणि गोपनीयता–

डेटा एन्क्रिप्शन वापराव गोपनीयता धोरण तयार करा.

डॉ.सोपान बापू शिंदे,

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी

संपर्क – ७९७२३१७१९४

email : sopanshinde@gmail.com,

sopan.shinde@mah.gov.in

कृषी पणनच्या विकासात पणन संस्थांचे योगदान

आपला भारत देश हा मूलतः शेतीप्रधान आहे. शेती व्यवसाय हे येथील जनतेच्या उपजिविकेचे व रोजगाराचे प्रमुख स्त्रोत आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकरण, माहिती तंत्रज्ञान व सेवा क्षेत्राचा होत असलेला निरंतर विस्तार व विकास यामुळे शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांचे इतरत्र स्थलांतर होत आहे व त्यामुळे शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या अलिकडे दिवसेंदिवस हळूहळू कमी कमी होत चाललेली आहे. शेती व्यवसायात पूर्वापार चालत आलेल्या छुप्या बेरोजगारीची समस्या विचारात घेता असा बदल होणे अपेक्षितही होते/आहे. मानवी जीवनात शेती व्यवसायाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.शेती व्यवसायाचे अस्तित्व टिकवून ते विकसित करणे ही काळाची गरज आहे.

श्री. सुखदेव भि. पाटील

महाराष्ट्रातील शेती व शेतमाल पणन विषयक बाबी:-

महाराष्ट्रातील शेती व्यवसायाचा विचार करावयाचा झाल्यास येथील शेतमालाचे वार्षिक उत्पादन सुमारे रु.२ लाख कोटींचे आहे.राज्यात सध्या ३०७ मुख्य बाजार व त्यांचे ६२६ उप-बाजार आहेत. खाजगी/थेट/ एकल परवानाधारक सुमारे २००० इतके आहेत. राज्यात कृषी पणनाची अशी दुहेरी व्यवस्था आहे. राज्यातील उपरोक्त शेतमाल उत्पादनापैकी बाजार समित्यांच्या आवारात विक्री होणाऱ्या शेतमालाचे मुल्य सुमारे रु.१ लाख कोटींचे व खाजगी/थेट/एकल परवानाधारकांनी खरेदी केलेल्या शेतमालाचे मुल्य सुमारे रु.२०,००० कोटीपर्यंत आहे. उर्वरित सुमारे रु.७५ हजार कोटी मुल्यांचा शेतीमाल उपलब्ध बाजार व्यवस्थेमध्ये विक्रीसाठी येत नाही. त्याची काही कारणे पुढीलप्रमाणे गृहीत धरता येतील.

(१) शेतकऱ्यांकडे शेतमाल उत्पादनात विक्रीयोग्य आधिक्य नसणे

(२) उसासारखा शेतमाल बाजार आवारात विक्रीसाठी आणला न जाणे

(३) काही शेतमाल उत्पादने नियमन मुक्त असणे.

(४) शेतकऱ्यांना उपलब्ध बाजार व्यवस्थेची माहिती नसणे.

(५) बाजार समितीचे अंतर फार जास्त असणे

(६) घरगुती वापर व बियाण्यासाठी काही शेतमाल राखून ठेवला जाणे

(७) इतर अनुषंगिक कारणे.

शेतीप्रधान व्यवस्था असलेल्या आपल्या राज्यात ३०७ बाजार समित्यांपैकी उत्पन्नानुसार 'अ' वर्गीकरणात १९४,'ब' ५४,'क' २७ व 'ड' ३० बाजार समित्या आहेत.

एका बाजूला उत्पादित झालेला शेतमाल मोठ्या प्रमाणावर बाजारात विक्रीसाठी येत नाही आणि दुसऱ्या बाजूने उभारलेली बाजार व्यवस्था मोठ्या संख्येने आर्थिक अडचणीत/क्षमतेचा वापर न होण्याच्या स्थितीत आहे.या स्थितीत बदल घडवून आणण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.यासाठी सहकारी पणन/प्रक्रिया संस्थांचा सहभाग वाढवणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील शेती व्यवसायाचा सध्याचा कल :-

सन २००० पासून राज्यातील शेतकऱ्यांचा कल उच्च मुल्य कृषी उत्पादने, नगदी पिके घेण्याकडे वाढलेला आहे. परिणामस्वरुप राज्य फळे, भाजीपाला, डाळी, कापूस व सोयाबीनसारख्या पिकांच्या उत्पादनाचा देशातील सर्वात मोठे उत्पादक व निर्यातदार ठरले आहे.

कृषीमाल उत्पादन व पणनाच्या सध्याच्या समस्या :-

* राज्यातील कृषी क्षेत्राची वाढ आणि संरचनात्मक परिवर्तन असमान आहे.
* शेतमालाच्या किंमतीतील चढउताराचा परिणाम अल्प व अत्यल्प भूधारकांवर अधिक होत आहे.
* शेतमालाच्या किंमतीच्या हालचालीचा परिणाम शेतकऱ्यांच्या नफ्यावर होत आहे.
* व्यापार धोरणामुळे कडधान्याच्या स्थानिक व्यापारावर परिणाम होत आहे.
* कृषी पणन सुधारणांमुळे निर्मित नवीन क्षमता/संधींचा शेतकऱ्यांना पुरेसा फायदा होत नाही.
* सर्वसमावेशक स्पर्धात्मक पुरवठा व मुल्यवृध्दी साखळी विकसन अपेक्षित प्रमाणात झालेले नाही.
* तांत्रिक सेवा व जोखीम व्यवस्थापनातील पूरक गुंतवणूकीत पुरेशी वाढ झालेली नाही.
* शेतमाल उत्पादक व उद्यमींना (प्रक्रिया उद्योग) नवीन व संघटित बाजारपेठेत पुरेसा प्रवेश मिळालेला नाही.

कृषी पणनाच्या नियमनाची राज्यातील विद्यमान व्यवस्था:-

राज्यात कृषी उत्पन्नाच्या नियमनासाठी, 'महाराष्ट्र कृषी उत्पन्न

पणन अधिनियम,१९६३ व नियम १९६७ पारित करण्यात आले.

सन २००३ मध्ये या अधिनियमात काही महत्वपूर्ण अशा सुधारणा करण्यात आल्या. कायद्याचे नाव बदलून,फ महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,१९६३ असे करण्यात आले.

या कायद्याचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:–

* शेतकऱ्यांचा शेतमाल योग्य रीतीने विकला जावा
* शेतकऱ्यांच्या मालाचे वजन योग्यरित्या व्हावे
* शेतकऱ्याने विक्री केलेल्या मालाची किंमत त्यास तात्काळ मिळावी
* शेतकऱ्यांची मध्यस्थांकडून फसवणूक होऊ नये
* शेतमाल खरेदीदाराला एकत्रित माल मिळावा.
* दर्जेदार शेतमाल उत्पादनास उत्तेजन मिळावे.

बाजार समित्या व पणन सहकारी संस्था: मूलभूत फरक :–

बाजार समित्या:–

बाजार समित्या ह्या ममहाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,१९६३ व नियम,१९६७ नुसार स्थापित व शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या खरेदी किंवा विक्रीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविणाऱ्या व त्या अनुषंगाने नियमन करणाऱ्या संस्था आहेत.

सहकारी पणन संस्था:–

सहकारी पणन संस्था व इतर अनुषंगिक सहकारी संस्था ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम,१९६१ नुसार स्थापित करण्यात येतात. या संस्थांचे उद्देश व भूमिका व्यापक स्वरूपाची आहे.महाराष्ट्र राज्यात सध्या एकूण १३७० सहकारी पणन प्रक्रिया संस्था असून त्यांची सभासद संख्या सुमारे १०.४० लाख इतकी आहे.

या सहकारी संस्था दोन टप्प्यात आपल्या भूमिका पार पाडतात.

अ) शेतमाल उत्पादनाशी निगडित बाबी:–

शेतकऱ्यांना शेतमालाचे दर्जेदार उत्पादन करण्यासाठी पोषक हवामानासह पुढील घटक आवश्यक असतात. जसे– सिंचन,वित्त,बियाणे,खते,किटक व जंतू नाशके,अवजारे, मार्गदर्शन. शेतकऱ्यांना या सुविधा सहकारी पणन व अन्य संस्थांकडून पुरवल्या जातात.

आ) शेतमाल पणन विषयक बाबी:–

शेतमालाचे उत्पादन केल्यानंतर ते ग्राहक, उद्यमींपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांची करावी लागणारी प्रतवारी, प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवण, वाहतूक, खरेदी व विक्री या बाबींसंबंधी कामकाज पणन, प्रक्रिया व अन्य संस्था करतात.

अशा प्रकारे सहकारी पणन व प्रक्रिया व अन्य सहकारी संस्था ह्या शेतकऱ्यांना शेतीचे दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी आणि शेतमाल विक्रीसाठी सहाय्य करणाऱ्या संस्था आहेत.

प्रमुख कृषी पणन व प्रक्रिया संस्था:–

राज्यातील कृषी पणन व प्रक्रिया संस्थांचे प्रमुख प्रकार पुढीलप्रम ाणे आहेत.

* तालुका खरेदी विक्री संघ
* जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्था
* कृषी उत्पादन प्रक्रिया संस्था
* ग्राहक सहकारी संस्था
* फळे व भाजीपाला सहकारी संस्था
* म.रा. सहकारी पणन महासंघ म.,मुंबई
* विदर्भ को–ऑपरेटिव मार्केटिंग फेडरेशन मी.,नागपूर
* म.रा.स. ग्राहक महासंघ म.,मुंबई
* म.रा.स.कापूस उत्पादकांचा महासंघ म., नागपूर

स्मार्ट प्रकल्प व पणन सहकारी संस्था

राज्यातील कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तनासाठी सध्या मा.बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) राबविण्यात येत आहे.

या प्रकल्पाचा उद्देश:–

या प्रकल्पाचा उद्देश राज्यातील अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी आणि कृषी व्यवसायीकांसाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे हा आहे.–

(१) कृषी उत्पादनाचे विपणन व त्याबाबत व्यापारात येत असलेले धोके टाळणे किंवा कमी करणे

(२) कृषी उत्पादनाच्या किंमतीतील चढ–उतार व अनिश्चितता यातील जोखीम कमी करणे/योग्य जोखीम व्यवस्थापन करणे.

(३) कृषी प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणे.

(४) शेतमालाची पुरवठा व मुल्यवृध्दी साखळी विकसित करणे

(५) शेतकरी उत्पादक कंपन्या/संघटनांमार्फत शेतमालाला आंतरराज्यीय व जागतिक बाजार मिळवून देणे

स्मार्ट प्रकल्प अंतर्गत क्षमता विकास प्रशिक्षण :–

स्मार्ट प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीचा एक भाग म्हणून राज्यातील पणन विभागाचे क्षेत्रिय अधिकारी(४००) व बाजार समित्यांचे कर्मचारी (१२००) यांना सन २०२४–२५ मध्ये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,पुणे (यशोदा) मार्फत सखोल प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षणाचा उद्देश पुढीलप्रमाणे होता.–

(१) अधिकारी/कर्मचारी यांच्यातील क्षमता विकसित करणे.

(२) कृषी पणनातील विवाद निवारण यंत्रणा बळकट करणे.

(३) कृषी पणनातील नियमन व्यवस्था सुधारणे.

प्रशिक्षण अभ्यासक्रमात सहकारी पणन संस्थांचा समावेश:–

स्मार्ट प्रकल्पांतर्गत या प्रशिक्षणासाठी जे विषय/उपविषय निश्चित करण्यात आले होते.त्यातील एक महत्त्वाचा विषय,मसहकारी पणन संस्थांमार्फत कृषी पणनचा विकासफ असा आहे.

कृषी पणनच्या विकासात सहकारी संस्थांचा, विशेषतः पणन व प्रक्रिया संस्थांचा सहभाग वाढवून घेण्यासाठी या संस्थांचे सदस्य, समिती सदस्य व कर्मचारी यांचा प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग असणे अपेक्षित आहे,मात्र या घटकांचा सहभाग झाला नाही.

त्यामुळे,या संस्थांची भूमिका शेतमाल उत्पादन व शेतमालाची

खरेदी–विक्री या सर्व आघाड्यांवर महत्त्वाची असल्याने त्यांच्यासाठी स्वतंत्रपणे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याची नितांत आवश्यकता आहे.

सहकारी पणन संस्था व इतर अनुषंगिक संस्थांचे संभाव्य योगदान:–

सहकारी पणन संस्था व इतर अनुषंगिक संस्था कृषी व्यवसाय विकास व पणनच्या विकासात पुढीलप्रमाणे महत्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

- ✻ सामाजिक भांडवल उभारणीस चालना देणे.
- ✻ आवश्यक त्या पायाभूत सुविधांची उभारणी करणे
- ✻ विविध सहकारी संस्थांमध्ये आपसी समन्वय स्थापून उद्देशपूर्तीसाठी कामकाज करणे.
- ✻ कृषी व्यवसाय अर्थक्षम करण्यात सक्रिय योगदान देणे.
- ✻ कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावणे.

प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्था:–

स्मार्ट प्रकल्पाच्या अंमलबजावणीत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचा सहभागदेखील अपेक्षित केलेला आहे.

या संस्था शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारा वित्तपुरवठा करतात.याशिवाय काही संस्था ह्या बियाणे,खते ,औषधे व अवजारे देखील पुरवतात.या संस्था आता बहुउद्देशीय संस्था म्हणून काम करताना अनेक उपक्रम हाताळू शकणार आहेत.केंद्र शासनाच्या धान्य भांडारण योजनेत या संस्थांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे. बियाणे,निर्यात व सेंद्रिय क्षेत्रात कामकाज करण्यासाठी स्थापन केलेल्या तीन बहुराज्यीय संस्थांच्या कामातही या संस्थांचा सहभाग असणार आहे.

कृषी पणनच्या विकासासाठी आवश्यक असलेली शेतमालाची पुरवठा व मुल्य साखळी विकसन करणे,शासनाच्या कृषीमाल निर्यात धोरणाची अंमलबजावणी करणे यात चांगल्या रितीने योगदान देऊ शकतात.

सहकारी पणन संस्थांच्या कामकाजाची संभाव्य व्याप्ती :–

सहकारी पणन संस्था शेतकऱ्यांना कृषी मालाच्या पणन विषयक सुविधा पुरवतात.

सद्यस्थितीत या संस्थांकडून पुढीलप्रमाणे काही बाबी हाताळणे शक्य होऊ शकते.

- ✻ मूल्य साखळी विकसन करणे
- ✻ कृषी उत्पादनाची प्रतवारी करणे
- ✻ कृषी उत्पादनाचे वेष्ठनिकरण करणे
- ✻ कृषी उत्पादनाची साठवणूक करणे
- ✻ कृषी उत्पादनाची वाहतूक करणे
- ✻ कृषी उत्पादनांची इ–प्रणालीद्वारे विक्री करणे
- ✻ कृषी उत्पादनासाठी देशांतर्गत व जागतिक बाजारपेठ उपलब्ध करणे
- ✻ सध्या कृषी पणनातील सुधारणा, जागतिक व देशांतर्गत संधींचा लाभ खाजगी व्यक्ती आणि संघटना घेत आहेत.तो लाभ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना मिळवून देणे.
- ✻ कृषी प्रक्रिया उद्योगांवर लक्ष केंद्रित करणे.
- ✻ अल्प व अत्यल्प भूधारकांना स्वतःशी जोडून घेऊन त्यांना विविध सेवा पुरवणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे.
- ✻ सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक कृषी मूल्य साखळी विकासनात सहभाग घेणे व प्रोत्साहन देणे.
- ✻ शेती क्षेत्रातील विविध उपक्रमांची वाढ करण्यास सहभाग घेणे व प्रोत्साहन देणे.
- ✻ शेतकऱ्यांचा बाजारपेठेत प्रवेश विस्तार करण्यासाठी संस्थात्मक मदत करणे.
- ✻ किंमत जोखीम निवारण व्यवस्था उभारणे.
- ✻ कृषी प्रणालीतील परिवर्तनास गती देण्यात योगदान देणे.
- ✻ या संस्थांनी आपली व्यवस्थापन क्षमता वाढविणे.

पणन व प्रक्रिया संस्थांसाठी कामकाजाची सद्यस्थिती पाहता आवश्यक कृती कार्यक्रम:–

(१) संघीय संस्थांनी आपल्याशी संलग्न असलेल्या प्राथमिक पणन संस्थांचे क्रियान्वयन व बळकटीकरण करणे.

(२) संघीय संस्थांनी स्वत: अधिक क्रियाशील व बळकट होण्यासाठी प्रयत्न करणे.

(३) संघीय संस्था व संलग्न प्राथमिक संस्थांनी अंतर्गत मुल्य साखळी विकसित करणे

(४) संघीय व संलग्न प्राथमिक संस्थांनी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे

(५) सभासद शेतकऱ्यांच्या शेती उत्पादन वाढीसाठी कृषी सेवांचा पुरवठा व मार्गदर्शन करणे

(६) शेतकरी सभासदांच्या उत्पादनाची थेट खरेदी करणे

(७) प्रक्रिया करण्यासाठी पर्याय शोधणे व त्यातून मुल्यवृध्दी होईल असे पाहणे

(८) संघीय व संलग्न प्राथमिक संस्थांनी मिळून गुणवत्तापूर्ण उत्पादन, प्रतवारी, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक व विक्री या माध्यमातून मुल्य साखळी निर्माण करणे

(८) संघीय संस्थांनी कृषी प्रक्रिया करणाऱ्या संस्था किंवा सदस्यांसाठी उद्योग/व्यवसाय सुलभतेसाठी सहाय्य व मार्गदर्शन करणे. शेतकरी आणि पणन व प्रक्रिया संस्थांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे

(९) संघीय संस्था, संलग्न प्राथमिक संस्था व शेतकरी सभासद यांनी संघटीत प्रयत्न करून विस्तारीत बाजारपेठेचा अंतिमतः शेतकऱ्यांना लाभ मिळवून देणे.

श्री. सुखदेव भि. पाटील

(मो.९६३७४३४७२१)

Email- sukdeobpatil@gmail.com

(लेखक महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील अपर आयुक्त तथा सहसचिव पदावरून सेवानिवृत्त आहेत.)

कृषी मालाची निर्यात – एक संधी

कृषी मालाचा जागतिक व्यापार करारामध्ये सन १९९३ मध्ये समावेश करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सन १९९५ पासून करण्यात आली आहे. कृषी मालाकरता जागतिक बाजारपेठ खुली झाल्यानंतर विविध देशांना कृषीमाल निर्यातीसाठी प्रचंड संधी निर्माण झाल्या आहेत. वाढत्या कृषीमाल निर्यातीबरोबरच त्याची गुणवत्ता, कीड, रोगापासून मुक्तता, पिकावरील उर्वरित अंश, त्याचे वेष्टन, निर्यात झालेल्या मालाची थेट शेतापर्यंतची ओळख इत्यादी बाबींना जागतिक बाजारपेठेत विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कृषी मालाची निर्यात करताना किडी व रोगांचा एका देशातून दुसऱ्या देशात प्रसार होऊ नये, तसेच त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वमान्य अशा काही विशिष्ट पद्धती विकसित करण्यासाठी जागतिक अन्न संघटनेने सन १९५१ सालामध्ये आंतरराष्ट्रीय पिक संरक्षण करार केलेला आहे. तो करार 'इंटरनॅशनल प्लांट प्रोटेक्शन कन्व्हेन्शन' या नावाने ओळखला जातो. भारत हा या कराराचा एक सदस्य देश आहे. सदर करारानुसार कृषी मालाच्या आयात व निर्याती करता फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र घेणे व सर्व सदस्य देशांना सदर कराराचे पालन करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. भारतातून मसाले, चहा, अन्नधान्य, डाळी, साखर, ताजी फळे, भाजीपाला तसेच बासमती आणि बिगर बासमती तांदूळ हा कृषी शेतमाल प्रामुख्याने निर्यात होतो. २०२४-२५ या आर्थिक वर्षात मसाले, मिरची, सेंद्रिय उत्पादनांच्या मागणीत वाढ झाली आहे. भारतीय भाजीपाल्यास अरेबियन देशात तर सेंद्रिय उत्पादनांना युरोप व अमेरिकेतून मागणी येत आहे. सन २४- २५ या आर्थिक वर्षात ४० अब्ज अमेरिकन डॉलर म्हणजेच रु. ३.३२ लाख कोटी इतक्या कृषीमालाची निर्यात भारतातून झाली आहे. यामध्ये सुमारे १३ टक्के इतका मोठा वाटा आपल्या राज्याचा आहे. राज्यातून विशेषतः भाजीपाला, फुले, ताजी फळे, रोपे इत्यादींची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. फळांमध्ये प्रामुख्याने द्राक्ष, डाळिंब, आंबा, केळी व भेंडी, कढीपत्ता, दोडका, भोपळा, गवार, कारले, दुधी भोपळा, मिरची, ढोबळी मिरची, काकडी, आले, हळद, शेवगा, बटाटा, वांगे व कांदा इत्यादी प्रकारचा भाजीपाला तसेच इतर पिकांमध्ये तीळ, मका, इत्यादींचा समावेश आहे. देशातून होणाऱ्या कृषी मालाच्या निर्यातीमध्ये महाराष्ट्र राज्याचा मोठा वाटा आहे. देशाच्या एकूण निर्यातीच्या ९४% द्राक्ष, ७९ % आंबा, ८२ % केळी, ७८% डाळिंब, ८७% कांदा, १३% भाजीपाला, ३५% आंबा गर आणि २०% प्रक्रिया केलेली फळे व भाजीपाला यांची निर्यात होते. युरोपियन युनियन तसेच अमेरिका, चीन, कॅनडा इत्यादी विविध देश सध्या कृषीमाल आयात करताना संबंधित मालाच्या कीड, रोगमुक्त व कीडनाशक उर्वरित अंशमुक्त बरोबरच त्याच्या ट्रेसिबिलिटी बाबत मागणी करत असतात. परदेशातील ग्राहक आयात करण्यात येणारे फळे व भाजीपाला कोणत्या शेतावरून किंवा बागेतून आला आहे. तसेच तेथील उत्पादकाने ठेवलेले अभिलेख, वापरलेली कार्यपद्धती, स्वच्छता विषयक घेतलेली काळजी, उत्पादन प्रक्रियेत अवलंब करण्यात आलेले तंत्रज्ञान इत्यादीची माहिती

उपलब्धतेबाबत आग्रह धरीत आहेत. या सर्व बाबींचा विचार करून केंद्र शासनाच्या अपेडा या संस्थेने ताजी फळे व भाजीपाला या पिकांच्या जगात विशेषतः युरोपियन युनियनला निर्यात होणाऱ्या फायटोसॅनिटरी तपासणी व निर्यात प्रमाणीकरणासाठी एक आदर्श कार्यपद्धती (एस.ओ.पी.) विकसित केली असून त्यामध्ये कृषी मालाचे उत्पादन ते निर्यात या संपूर्ण प्रक्रियेमधील विविध भागीदार संस्थांची जबाबदारी निश्चित केलेली आहे. या एस.ओ.पी.नुसार निर्यात करावयाच्या फळे व भाजीपाला यांची शेतस्तरापर्यंतची सर्व शृंखला याबाबत माहिती असणे व मागणीनुसार ती शोधता येणे म्हणजेच बॅकवर्ड लिंकेजेसची माहिती असणे बंधनकारक केले आहे. निर्यातक्षम फळे, भाजीपाला, शेतांची नोंदणी करणे, त्याची तपासणी करणे, नोंदणी प्रमाणपत्र देणे, या प्रणालीवर नोंदणीसाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, नोंदणी झालेल्या शेतांमध्ये कीड रोगांचे पाक्षिक सर्वेक्षण करणे, नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना पीक उत्पादन पद्धती, कीडनाशक लेबल क्लेम्स, एकात्मिक कीड व्यवस्थापन, कीडनाशक उर्वरित अंश पातळी या सर्व गोष्टींचे अभिलेख जतन करणे इत्यादीबद्दल मार्गदर्शन करणे इत्यादी कामे करण्याची जबाबदारी या एस.ओ.पी. नुसार कृषी विभागाला देण्यात आलेली आहे. ही सर्व कामे अपेडा संस्थेने विकसित केलेल्या संगणक प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने करायची आहेत. सन २००३-०४ पासून द्राक्ष बागांसाठी सुरू करण्यात आलेली ऑनलाइन ग्रेप नेट प्रणाली आता आंबा, डाळिंब, भाजीपाला, खाण्याची पानं, संत्रा या पिकांसाठी अनुक्रमे मँगो नेट – २०१५, अनार नेट –२००९ , व्हेज नेट – २०१६, बिटल नेट – २०१८ सीट्रसनेट – २०१८ यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. ओनियन नेटवर्क आदर फ्रूट नेटवर्क २०२१- २२ सालापासून सुरू करण्यात आलेले आहेत. आता या सर्व प्रणाली संस्थेच्या संकेतस्थळावर हॉर्टिनेट ट्रेसीबिलिटी सिस्टीम या नावाने एकत्रित उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. हॉर्टिनेट ट्रेसीबिलिटी सिस्टीम अंतर्गत निरीक्षण, फळबागांची

श्री. मंगेश तिटकारे

व शेतांची नोंदणी, नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना नोंदणी प्रमाणपत्र देणे, बागेची/ शेताची तपासणी, शेतकऱ्यांना उत्पादन पद्धती, कीडनाशक लेबल क्लेम, एकात्मिक कीड व्यवस्थापन याबाबत माहिती संकलित करावी लागते. नोंदणीसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना नोंदणी अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना निर्यात क्षम शेतमालाची ऑनलाइन नोंदणी या सर्व बाबींची माहिती निर्याती करू इच्छिणाऱ्या सर्वसामान्य नागरिक कृषी पदवीधर व उद्योजक होणा यांना होणे आवश्यक असते.

राज्याने २०२४-२५ या आर्थिक वर्षात कृषी, प्रक्रियायुक्त शेतमाल आणि अन्न उत्पादनांच्या निर्यातीत मागील वर्षापेक्षा १५ टक्के वाढ नोंदवली आहे, जी रु. ४७,०१७ कोटी इतकी आहे. महाराष्ट्र राज्य कृषी निर्यातदार म्हणून देशांमध्ये अग्रगण्य स्थानावर आहे. एकूण ५४.१४ लाख टन इतका शेतमाल राज्यातून निर्यात झालेला आहे. यामध्ये म्हशीचे मांस रु. १०,३०० कोटी, ताजी फळे रु. ९५०० कोटी, बिगर बासमती तांदूळ रु. ६,६१३ कोटी इतकी निर्यात झालेली आहे. ताज्या फळांच्या निर्यातीत केळी रु. २,८३९ कोटी रुपये, द्राक्षे रु. २७८१ कोटी, डाळिंब रु. ३७१ कोटी, इतर फळे रु. ३,४०५ कोटी, महत्त्वाचे म्हणजे फळांच्या निर्यातीत ३२% इतकी वाढ झाली आहे. एकूण फळांची निर्यात रु. ३,४०५ कोटींची झाली, जी त्या मागच्या वर्षात रु. २,५६६ कोटी होती. याशिवाय रु. २,१०० कोटींच्या डाळी, रु. २,०१४ कोटींची तृणधान्य, रु. १,६२० कोटींचा गुळ आणि मिठाई, रु. १,४३६ कोटींचे कांदे व रु. १,३५३ कोटींचे वाईन, ज्यूस व पेये यांचा समावेश होता. द्राक्ष, कांदा व फळांची दर्जेदार निर्यात वाढवण्यासाठी अपेडा प्रयत्न करीत आहे.

जिऑग्राफिकल इंडिकेशन रजिस्ट्री (GI) अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील कृषी शेतमाल जळगाव – केळी, नागपूर – संत्रा, भिवापूर – मिरची, वायगाव – हळद, नाशिक – द्राक्ष, सोलापूर – डाळिंब, महाबळेश्वर – स्ट्रॉबेरी, सिन्नर – तांदूळ, मंगळवेढा – ज्वारी, पुरंदर – अंजीर, मराठवाडा – केशर आंबा, सांगली – बेदाणा, घोलवड – चिकू, कोल्हापूर – गुळ, नवापूर – तुरडाळ, रत्नागिरी – कोकम, आंबेमोहोर तांदूळ – (मुळशी) पुणे, वाघ्या घेवडा – सातारा, लासलगाव – कांदा, कोकण – हापूस आंबा, सांगली – हळद, अलिबाग – पांढरा कांदा, पान चिंचोली – चिंच, लातूर – बोरसुरी तुरडाळ, बदलापूर – जांभूळ, बहाडोली– जांभूळ, बीड – सीताफळ, कुंथलगिरी लातूर – खवा, पेढा, जालना– दगडी ज्वारी, कास्ती – कोथिंबीर, लातूर, आजरा – घनसाळ तांदूळ, जळगाव – भरीत वांगी, जालना – मोसंबी, वेंगुर्ला – काजू, बसमत – हळद, नंदुरबार – आमचूर, नंदुरबार– मिरची

वरील जवळजवळ ३७ प्रकारचे जिओग्राफिकल इंडिकेशन रजिस्ट्री नोंद असलेल्या शेतमाल त्या त्या ठिकाणच्या कृषी मालाचे वैशिष्ट्य तेथील भौगोलिक परिस्थिती, पाणी जमीन हवामान, वातावरण, त्याचा दर्जा, त्याची चव वगैरे दर्शवते. याचा फायदा घेऊन हा शेतमाल निर्यात कसा करता येईल? तो ऑरगॅनिक/सेंद्रिय पद्धतीने निर्यात उत्पादित करून कसा करता येईल? याबाबत प्रयत्न होणे आवश्यक आहे. राज्यात गेल्या आर्थिक वर्षांमध्ये ५३.१४ लाख टन इतक्या कृषी माल/ उत्पादनाची निर्यात जगात झाली आणि याच मूल्य साधारण रु. ४७,०१७ कोटी इतके होते. ही सर्व वस्तुस्थिती आणि आकडेवारी पाहता राज्यामधील तरुणाईला तसेच नव कृषी पदवीधर ,निर्यात क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात जसे मालाचे उत्पादन, कापणी, शेत व्यवस्थापन, लागवड आणि देखभाल, कापणी आणि काढणी नंतरची हाताळणी, कृषीमाल निर्यात, लॉजिस्टिक्स, निर्यात व्यवस्थापन आणि समन्वय, वाहतूक व्यवस्थापन, गोदाम व्यवस्थापन, इन्व्हेंटरी कंट्रोल, अन्नप्रक्रिया, पॅकेजिंग, लेबलिंग, कोल्ड स्टोरेज, गुणवत्ता नियंत्रण, हमी, विपणन आणि विक्री, बाजार संशोधन आणि विश्लेषण, व्यवसाय विकास, नियामक बाबी यांचे अनुपालन, लेखापरीक्षण, स्वच्छता आणि फाइटोसॅनिटरी उपाय, कृषी तंत्रज्ञानाचा नव्याने वापर, अचूक शेती आणि डाटा विश्लेषण, निर्यात प्रोत्साहनासाठी वापरण्याचे विविध डिजिटल प्लॅटफॉर्म, यामध्ये विविध कंपन्याना शासन देत असणाऱ्या वित्तीय सेवा, क्रेडिट सुविधा, विमा आणि जोखिम व्यवस्थापन, प्रशिक्षण, कॅपॅसिटी बिल्डिंग या अनेक क्षेत्रांमध्ये नोकरीच्या नानाविध संधी उपलब्ध आहेत. कृषी पदवीधर, नवउद्योजक या क्षेत्रात काम करू इच्छिणारे नागरिक, उद्योजक यांना निर्यात क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी खुणावत आहेत महाराष्ट्र राज्य तर देशाचे फ्रुट बाऊल म्हणून प्रसिद्ध आहे राज्याला व्यापारासाठी बॉम्बे पोर्ट आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट जे.एन.पी.टी. यासारखे दोन आंतरराष्ट्रीय दर्जाचे समुद्री बंदर उपलब्ध असून मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यासारखे आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा उपलब्ध आहेत. या उपलब्ध साधनसामुग्रीचा आणि उपलब्ध सोयी सवलतींचा विचार करता महाराष्ट्र राज्यातून कृषी मालाच्या निर्यातीस मोठा वाव आहे आणि या क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अगणित संधी दडलेल्या आहेत. भविष्यातही कृषीमालाची निर्यातीची आकडेवारी वाढत जाणार आहे. तथापि या निर्यातदारांमध्ये थेट शेतकरी अथवा ग्रामीण भागातून आलेल्या मराठी व्यक्तींचा समावेश नगन्य स्वरूपामध्ये आहे. ही सुद्धा वस्तुस्थिती आहे. अद्यापही शेतकरी बांधव हे केवळ कृषी मालाच्या उत्पादनामध्ये लक्ष घालत असून या मालाची विक्री व्यवस्था, निर्यात या तांत्रिक आणि किचकट बाबी समजून त्याच्यात हवे तितके लक्ष घालताना दिसत नाही. त्यामुळे कृषी मालाची निर्यात ही संपूर्णतः उत्पादकां व्यतिरिक्त इतर व्यक्तींच्या अथवा साखळीच्या हातात आहे. निर्यातीतून मिळणारा खरा फायदा हा शेतकरी बांधव, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, उद्योजक, ग्रामीण भागातील युवा वर्ग यांना मिळण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागामध्ये कृषीमालाच्या निर्यातीबाबत मोठ्या प्रमाणामध्ये कुतुहल आहे. तथापि योग्य मार्गदर्शनाचा अभाव, मार्गदर्शनाची अत्यंत मोठी फी आकारून, जुजबी ज्ञान देणारे बाजारातील मार्गदर्शक सर्वत्र आहेत. त्याच्यातून होणारी फसवणूक आणि लुबाडणूक हे सुद्धा वास्तव आहे. याचा विचार करून महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने कृषीमाल निर्यातीचा पाच दिवसीय निवासी किंवा बिगर निवासी प्रशिक्षणाचा कार्यक्रम गेल्या तीन महिन्यापासून आखला असून या पाच दिवशीय कार्यक्रमात निर्यात विषयक ए टू झेड विषयांचा समावेश अत्यंत माफक दरात केलेला आहे. निर्यातीबाबतचे सर्व प्रकारचे तांत्रिक ज्ञान, शेतमालाचे प्रमाणीकरण, लागवडीपासून पोस्ट हार्वेस्टिंगपर्यंत चे तंत्रज्ञान, साठवणूक, वाहतूक, संरक्षण इ. घ्यावयाची काळजी, प्रतवारी, विविध प्रकारची प्रमाणपत्रे, फॉर्म, प्रत्यक्ष निर्यातदार यांच्याशी गाठभेट, चांगल्या प्रकारे कृषीमालाची निर्यात करीत असणाऱ्या, करीत असलेल्या उद्योजकांच्या जागेवर जाऊन थेट भेटी याचा समावेश त्यामध्ये आहे.

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळातर्फे नव्यानेच निर्यातीसाठी येऊ इच्छिणाऱ्या युवक तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था यांचेकरिता निर्यात सेवा सुरू केलेल्या आहेत, यामध्ये आयात-निर्यात परवाना, AD कोड, पोर्ट नोंदणी अंतर्गत डिजिटल सिग्नेचर, ICEGATE, AD Code, तसेच निर्यात प्रोत्साहन परिषदांमध्ये नोंदणीसाठी फी या सेवा देण्यात येतात, याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

शेतकरी उत्पादक कंपन्या / संस्था, सहकारी संस्था, वैयक्तिक, कंपन्या यांच्यासाठी निर्यात सेवा

राज्यामधून शेतकऱ्यांच्या संस्थांमार्फत (FPC/ FPO) तसेच सहकारी संस्थामार्फत कृषीमालाची निर्यात वाढावी या दृष्टीकोणातून संस्थांना खालील प्रकारच्या सेवा महामंडळामार्फत उपलब्ध करून देत आहोत.

क्रमांक	परवाना/नोंदणी	शुल्क (रु.)	GST 18%	एकूण देय
१	आयात - निर्यात परवाना (IEC)	३५००/-	६३०/-	४१३०/-
२	AD कोड	१५००/-	२७०/-	१७७०/-
३	पोर्ट नोंदणी अंतर्गत			
	✼ Digital Signature	४०००/-	७२०/-	४७२०/-
	✼ ICEGATE (पोर्ट लॉगीन)	४५००/-	८१०/-	५३१०/-
	✼ AD Code (पोर्टवर नोंदणी)	५५००/-	९९०/-	६४९०/-
४	निर्यात प्रोत्साहन परिषद फी (Export Promotion Council Fee)			
	✼ APEDA	८०००/-	१४४०/-	९४४०/-
	✼ MPEDA	८०००/-	१४४०/-	९४४०/-
	✼ Spices Board of India	१९८००/-	३५६४/-	२३३६४/-
	✼ CASHEW Export Promotion Council of India	३५,७३०/-	६४३१/-	४२१६१/-
	✼ Cotton Textiles Export Promotion Council	२५,७००/-	४६२६/-	३०३२६/-

निर्यातदार नोंदणीसाठी (New Exporter) आवश्यक कागदपत्रे – सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) आणि व्यक्तिगत संस्था (Proprietorship/ Partnership/ PVT Limited/ Limited Liability Partnership) यांच्यासाठी

सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे (सर्व प्रकारांसाठी लागू):

१. PAN कार्ड – संस्थेचे किंवा व्यक्तीचे.

२. GST नोंदणी प्रमाणपत्र

३. बँक खाते व बँक प्रमाणपत्र (Cancelled Cheque / Bank Certificate)

४. उद्योग आधार / UDYAM/MSME नोंदणी प्रमाणपत्र (लघु उद्योजकांसाठी वैकल्पिक पण उपयुक्त)

५. पासपोर्ट साईज फोटो – अधिकृत व्यक्तीचे (Soft Copy)

१. सहकारी संस्था (सोसायटी):

- संस्था नोंदणी प्रमाणपत्र (Registrar of Coop Societies)
- सदस्यांची यादी व त्यांचे आधार कार्ड/ओळखपत्र
- बोर्ड ठराव / ठरावपत्र – निर्यात प्रक्रियेस मान्यता देणारा
- PAN कार्ड – संस्थेचे
- संस्थे चा बँक खाते तपशील व रद्द चेक (Cancelled चेक)
- स्वाक्षरीसाठी अधिकृत प्रतिनिधी बाबतचा ठराव

२. **शेतकरी उत्पादक कंपनी** (FPC - Private Ltd./ Section 8):

- Company Incorporation Certificate (ROC कडून)
- MOA/ AOA (Memorandum Articles of Association)
- Company PAN Card
- Board Resolution to apply for IEC and export
- Authorized Director Mm KYC (Aadhaar, PAN, Photo)
- DIN Number
- FPC चा बँक तपशील व रद्द चेक (Cancelled चेक)

३. **व्यक्तिगत संस्था** (Individual / Proprietor):

- व्यक्ती PAN व आधार कार्ड
- व्यक्तीचा पासपोर्ट साईज फोटो (Soft Copy)
- बँक खाते तपशील व Cancelled Cheque (Proprietorship च्या नावाने)
- Business Address Proof (Electricity Bill, Rent Agreement इत्यादी)
- UDYAM / MSME प्रमाणपत्र (जर असल्यास)

वरील कागदपत्रांची पूर्तता पूर्ण शुल्क प्राप्त झाल्या नंतर परवाने / नोंदणी प्रक्रिया महामंडळातर्फे केली जाईल.

बँक खाते माहिती

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या., पुणे

बँक : फेडरल बँक

खाते क्र. 1348-0200-0093-47

IFSC Code: FDRL-000-1348

अधिक माहिती साठी संपर्क:

ईमेल : mcdcexport@gmail.com

www.mahamcdc.com

प्रशिक्षणासाठी संपर्क :

श्री. सादिक मणेरी

राज्य समन्वयक

Email : mcdcexport@gmail.com

Mob : 8600987807

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या., साखर संकुल, पहिला मजला, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने निर्यातीला चालना देण्यासाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी राज्यात केली आहे. यामध्ये विकिरीकरण हिट प्रक्रिया, व्हेपर ट्रीटमेंट ,हॉट वॉटर ट्रीटमेंट यासारख्या प्रक्रिया करण्याच्या सुविधांचा समावेश आहे. तिथे सुद्धा भेटीचे कार्यक्रम या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये ठेवण्यात आलेले आहेत. या कोर्समध्ये निर्यातीसाठी आवश्यक आयात निर्यात परवाने काढण्यापासून ते केंद्र शासनाच्या अखत्यारीतील अपेडा, नॅशनल प्लांट प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन, एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन इत्यादी संस्थांच्या माहिती बरोबर या संस्थांच्या अधिकाऱ्यांशी प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये आवश्यकतेनुसार सुसंवाद साधण्याची संधी सुद्धा देण्यात येते.अपेडा अधिकाऱ्यांबरोबर चर्चा, निर्यातीसाठी आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र, कृषी विभागाकडील फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र, सर्टिफिकेट ऑफ ओरिजिनसाठी चेंबर ऑफ कॉमर्स, निर्यातीच्या पत विम्यासाठी एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, कस्टम विभागांतर्गत निर्यात करायच्या प्रस्तावित पोर्टवर नोंदणी, कस्टम हाऊस एजन्सीची निवड, क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग साठी आवश्यक कागदपत्र, आयातदार पत, विमान आणि समुद्रमार्गे निर्यात विमा, इत्यादी बाबतीत मार्गदर्शन करण्यात येते पाच दिवशीय. निवासी प्रशिक्षण रु. ११,५०५ व अनिवासी प्रशिक्षण रु. ९,७३५ इतके शुल्क प्रशिक्षणासाठी आकारण्यात येत आहे. याचा निश्चित लाभ राज्यातल्या निर्यात क्षेत्रात आपली गुढी उंचवू पाहणाऱ्या सर्वच संबंधितांनी घ्यावा विशेषत: नवकृषी पदवीधर यांनी घ्यावा आणि स्वतःचा उद्योग स्थापण्याची क्षमता किंवा इच्छा बाळगणाऱ्या कृषी पदवीधर तसेच इतर क्षेत्रातील तरुण वर्गाने सुद्धा यामध्ये उतरावं आणि देशातल्या तसेच राज्यातील वाढत जाणाऱ्या कृषी माल निर्यातीमध्ये आपला सहभाग मोठ्या प्रमाणात नोंदवावा या खुणावणाऱ्या क्षेत्रातील संधी ओळखा, शंका दूर करा, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या प्रशिक्षणात सहभागी व्हा अशी विनंती सर्वांना करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी मंडळाची वेबसाईट www.mahamcdc.com किंवा mcdcexport@gmail.com वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

श्री. मंगेश तिटकारे

व्यवस्थापकीय संचालक,

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे

ईमेल : mcdcpune@gmail.com

मो. : ९८९०६२०००१

***

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)

राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३०७.७ लक्ष हेक्टर आहे. त्यापैकी २३२ लक्ष हेक्टर क्षेत्र शेतीखाली आहे. लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा भारतात दुसरा क्रमांक लागतो. फळे व भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्य, तेलबिया व दुग्ध उत्पादने, मसाला पिके यांचे उत्पादनांत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. फळे व भाजीपाला उत्पादनात महाराष्ट्र राज्याचा देशात प्रथम क्रमांक लागतो. परंतु उत्पादित होणारा सर्व शेतमाल नाशवंत असल्याने शेतमाल ते ग्राहक या साखळीतील विविध स्तरावर होणारे नुकसानही मोठ्या प्रमाणात आहे. तसेच शेती व्यवसाय हा केवळ शेतमालाची उत्पादकता वाढवणे एवढ्यावर अवलंबून नाही. तर त्यापुढे जाऊन उत्पादीत शेतमालावर समूह आधारित प्रक्रिया करुन स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजरपेठेच्या मागणीनुसार गुणवत्ता व पोषक मूल्य वाढवून निर्यात करणे गरजेचे आहे. असं म्हणतात की, ""Change is the only constant thing in the World'' म्हणजेच जगात बदल हीच कायम टिकणारी गोष्ट आहे. याला कोणतेही क्षेत्र अपवाद नाही. मग '' अन्नदाता देवो भवः'' असणा-या माझ्या शेतक-यांच्या शेती क्षेत्रापुढे असणा-या अडचणी कृषि प्रक्रियेच्या बदलातूनच कमी करणे शक्य आहे.

सध्यस्थितीत कृषि प्रक्रिया ही केवळ साठवणूक, काढणीपश्चात प्रक्रिया, अत्याधुनिक शीतगृह तसेच पॅक हाऊसमध्ये माल आणून त्याचे वर्गीकरण, प्रतवारी आणि पॅकिंग करुन बाजारपेठेतील मागणीनुसार ग्राहकांपर्यंत मालाचे वितरण करणे म्हणजेच प्राथमिक कृषि प्रक्रिया यापर्यंत मर्यादीत आहे. तथापि यापुढे जावून प्राथमिक प्रक्रिया केलेल्या कच्च्या शेतमालावर व्दितीय किंवा तृतीय प्रक्रिया करणे यासाठी मोठा वाव आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेमध्ये म्हटले आहे की, ''कच्चा माल मातीच्या भावे, पक्का होतास चौपटीने घ्यावे''. त्यामुळे राज्यातील कृषि मालाचे मूल्यवर्धन (Value addition) करुन अन्न प्रक्रिया उद्योग वाढविणे आवश्यक आहे. म्हणजेच पारंपारीक स्थानिक उत्पादने (Vocal For Local)जपून त्याचा प्रचार व प्रसार करणे गरजेचे आहे.

राज्यातील ग्रामिण व शहरी भागातील महिला ह्या स्वयं सहाय्यता गटांच्या (SHG) माध्यमातून अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये अग्रेसर आहेत. महिलांना सूक्ष्म अन्न प्रक्रीयेतून सन्मान व प्रतिष्ठा मिळू शकते. तथापि स्वयं सहाय्यता गटांचे अन्न प्रक्रिया उद्योग असंघटीत असल्याने ब-याच उत्पादनांची सर्वोत्तम गुणवत्ता असूनही आकर्षक पॅकींग व ब्रॅन्डींग न झाल्यामुळे बाजारामध्ये टिकाव धरु शकत नाहीत. तथापि खाण्याच्या प्रवृत्तीतील बदल, वेळेची कमतरता, व्यस्त जीवनशैली, स्वाद व स्वास्थ (Health) बाबत जागरुकता इत्यादी कारणामुळे प्रक्रियायुक्त अन्नाला मागणी वाढली आहे. याचबरोबर नैसर्गिक व सेंद्रिय उत्पादनांबरोबरच Smart Food , Magic Food , Vegan Food, Ready to Eat/ Serve/ Cook कडेही शहरी लोकांचा कल वाढत चालला आहे. आजच्या अधुनिक जगात पोटभर अन्ना ऐवजी भरपूर पोषण मूल्य असणा-या प्रक्रिया उत्पादनांचीही मागणी वाढत चालली आहे. असे असले तरी असंघटित अन्न प्रक्रिया क्षेत्रात वित्तीय संस्थांकडून कर्ज उपलब्ध होणे, आधुनिकीकरणाचा अभाव, एकात्मिक अन्न पुरवठा साखळीचा (Integrated Value Chain) तसेच विपणनचा अभाव आणि आरोग्य व सुरक्षीतता मानांकनांचा अभाव इ. महत्वाच्या समस्या आहेत. उपरोक्त समस्यांचे निराकरण करुन स्थानिक/ स्वदेशी/ गावरान/ रानमेवा/ वनउपज/ सेंद्रिय/ पारंपारिक उत्पादनांना वाव देण्यासाठी (""Vocal for Local'') केंद्रपुरस्कृत ''आत्मनिर्भर भारत मोहिमेअंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PM FME)'' ही योजना सन वर्षासाठी लागू केली आहे. एकत्रित शेतमाल/कच्चा माल खरेदी, सामाईक सेवांची उपलबधता व उत्पादनाचे विपणन (विक्री) यादृष्टीने अधिक फायदा व्हावा यासाठी योजनेमध्ये ''एक जिल्हा एक उत्पादन'' (ODOP) या धोरणाचा अवलंब केला आहे. सध्याचे जिल्हयातील भौगोलीक मानांकन (GI), पारंपारीक पिके, जिल्हयातील समूह आधारित (Clusters Development), व कच्च्या मालाची जादाची उपलब्धता (Surplus) इ. लक्षात घेवून प्रत्येक जिल्ह्यासाठी ''एक जिल्हा एक उत्पादनाची'' (ODOP) प्राधान्याने निवड केली आहे.

या योजनेमध्ये नाशवंत फळपिके जसे आंबा, द्राक्षे, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, कोरडवाहू फळे, चिंच, जांभूळ, फणस, करवंद, काजू, तृणधान्ये, कडधान्ये, टोमॅटो, बटाटा, पापड, लोणची, मिलेट, मसाला पिके, यांवर आधारित उत्पादने, दुग्ध व पशुउत्पादने, मांस उत्पादने, वन उत्पादने इ. चा समावेश आहे. याशिवाय काही पारंपारिक व नाविण्यपूर्ण उत्पादने ज्यामध्ये टाकाऊ पदार्थापासून उत्पन्न मिळवून देणाऱ्या उत्पादनाना (Waste to Wealth) सहाय्य करण्यात येत आहे. कृषि उत्पादनांवर प्रक्रिया करणे तसेच वाया जाणाऱ्या कच्च्या शेतमालाचे प्रमाण कमी करणे, उत्पादनाची योग्य पारख करणे, उत्पादनाची साठवणूक, प्रक्रिया, पॅकेजिंग, मार्केटिंग व ब्रॅडींग यासाठी सहाय्य देण्यात येत आहे.

नव्याने स्थापित होणा-या किंवा सद्यस्थितीत कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना विस्तारीकरण/स्तरवृद्धीसाठी, भांडवली गुंतवणूकीसाठी बँक कर्जाशी निगडीत अर्थसहाय्य करणे आणि FSSAI अंतर्गत स्वच्छता मानके नोंदणी, उद्योग आधार आणि वस्तू व सेवा कर (GST) यांना औपचारिक स्वरुप प्रदान करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. तसेच यामध्ये कौशल्य प्रशिक्षण, अन्न सुरक्षेबाबतचे तांत्रिक ज्ञान देणे, उत्पादनाची गुणवत्ता व दर्जा यामध्ये सुधारणा करुन सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांची क्षमता बांधणी करणे याचाही समावेश आहे.

योजनेंतर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगर सह एकूण ३६ जिल्ह्यांचा समावेश आहे. सन २०२२-२३ हे ''**आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष**'' म्हणून घोषित केलेले होते. त्यामुळे या योजनेंतर्गत कडधान्य आधारीत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना वाव आहे. तसेच सन २०२२

हे ''महिला शेतकरी सन्मान वर्ष''म्हणून राज्यामध्ये साजरे करण्यात येत आहे. जिल्हास्तरावर अर्जदारांना हातमिळवणी सहाय्य करणेसाठी जिल्हा संसाधन व्यक्तींची (DRPs) नेमणूकही करण्यात आले. योजनेंतर्गत भांडवली गुंतवणूक, सामाईक पायाभूत सुविधा, इनक्युबेशन सेंटर, स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांना बिज भांडवल, मार्केटींग व ब्रॅन्डींग आणि प्रशिक्षण या घटकांकरिता लाभ देय आहे.

PMFME योजनेविषयी केंद्र शासनाच्या फा.सं. FM.-11/64/2021-FME दि.१८/०५/२०२२ कार्यालयीन आदेशानुसार, अद्ययावत थोडक्यात विवरण खालील तत्क्यात करण्यात आले आहे.

घटक	तपशिल
१. वैयक्तीक सुक्ष्म अन्न प्रक्रीया उद्योगांना लाभ	
लाभार्थी	वैयक्तीक मालकी / भागीदारी,शेतकरी उत्पादक संस्था (FPO), स्वयं सहायता गट (SHG), गैर सरकारी संस्था (NGO), सहकारी संस्था (Cooperative), खाजगी कंपनी (Pvt. Ltd. Companies) ई
वय व शैक्षणिक पात्रता	यापूर्वी लागू असलेल्या वय वर्ष - १८ किंवा जास्त व किमान शिक्षण या अटी आता लागू नाही.
पात्र उपक्रम	एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) - नविन तसेच कार्यरत सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग एक जिल्हा एक उत्पादन व्यतिरिक्त (NON-ODOP) - नविन प्रक्रिया उद्योग व कार्यरत उद्योगांचे विस्तारीकरण/ स्तरवृद्धीकरण घटकासाठी
अनुदान परिगणना	प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के व जास्तीत जास्त १० ल्खापर्यत बॅक कर्जाच्या निगडीत अनुदान लाभ देय.
लाभार्थी गुंतवणुक	किमान १० टक्के
कृती संगम / अभिसरण (Convergence)	Package scheme of Incentives 2019, छोट्या शेतक-यांचा कृषि व्यापार संघ (SFAC), CGTMSE, PM MUDRA (Shishu,Kishir,Tarun), MoFPI, NRLM (राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान), STAND UP, व्याज दर सवलत अनुदानास कृती संगम स पात्र, ईतर शासकीय योजनांशी Top UP Convergence देय आहे. उदा. महात्मा फ़ुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
बॅक कर्ज पुर्नरचना	विस्तार व आधुनिकीकरण अंतर्गत अडचणीत आलेले जे अन्न प्रक्रीया उद्योग कर्जाचे पुर्नगठणास पात्र आहेत त्या प्रकल्पांना बँकेद्वारे कर्ज पुर्नरचना करणेस परवानगी.
प्रस्तावास मान्यता	वैयक्तीक लाभार्थी/ गट लाभार्थी - जिल्हास्तरीय
२. बीज भांडवल	
लाभार्थी	ग्रामीण व शहरी भागातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वयंसहाय्यता गटातील सदस्य
वय व शैक्षणिक पात्रता	यापूर्वी लागू असलेल्या वय वर्ष - १८ किंवा जास्त व किमान शिक्षण या अटी आता लागू नाही.
पात्र उपक्रम	१) एक जिल्हा एक उत्पादन (ODOP)- नविन तसेच कार्यरत सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग २) एक जिल्हा एक उत्पादन व्यतिरिक्त (NON ODOP) - नविन प्रक्रिया उद्योग, कार्यरत उद्योगांचे विस्तारीकरण व आधुनिकीकरण घटकासाठी
अनुदान परिगणना	लहान मशिनरी (Small Tools) खरेदी करण्यासाठी व खेळते भांडवल (Working Capital) यासाठी प्रति सदस्य कमाल रक्कम रु. ४०,०००/- व प्रति स्वयंसहाय्यता गट कमाल रक्कम रु. ४,००,०००/-
कृती संगम / अभिसारण	ग्रामीण भागात - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई व शहरी भागात - राज्य नागरी उपजीवीका अभियान (SULM) मुंबई यांच्यामार्फेत राबविण्यात येतो.
मंजूरी प्राधिकारी	State Level Approved Committee (SLAC)
३. सुक्ष्म अन्न प्रक्रीया गट उद्योगांना लाभ (सामाईक पायाभूत सुविधा)	
पात्र संस्था संरचना	शेतकरी उत्पादक संस्था (FPO)/शेतकरी उत्पादक कंपनी (FPC), सहकारी संस्था (Cooperative), स्वयंसहायता गट (SHG) आणि त्यांचे फेडरेशन (उदा.MSRLM-CLF, MAVIM-VLF, CMRC/ NULM-ALF) शासकीय संस्था.
उत्पादन	ODOP किवा NON-ODOP साठीचे प्रस्ताव सहाय्यासाठी पात्र आहेत. तथापि ODOP प्रस्तावांना प्राधान्य दिले जाईल.
अनुदान सहाय्य	रु. ३.०० कोटी कमाल मर्यादेसह पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५% बॅक कर्जाच्या निगडीत अनुदान
प्रकल्प घटक आणि खर्च ब्रेकअप	१. प्लँट व यंत्रसामग्री आणि तांत्रिक नागरी कामाचा खर्च समाविष्ट आहे. २. तांत्रिक नागरी काम हे पात्र प्रकल्प खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त नसावे. ३. जमीन/भाडे किंवा भाडेतत्त्वावरील कामाच्या शेड खर्च प्रकल्प किमतीत समाविष्ट नाही. ४. एकूण पात्र प्रकल्पाची किंमतची मर्यादा नाही. क्रेडीट बॅक कर्जाच्या निगडीत अनुदान लाभ पात्र प्रकल्प किमतीच्या ३५%. कमाल सहाय्य मर्यादा रु.३.०० कोटी.
जमिनीची किंवा शेडची मालकी	पात्र प्रकल्प खर्चामध्ये जमीन/भाडे किंवा भाडेतत्त्वावरील कामाच्या शेडची किंमत वगळली जाते.
प्रवर्तकांचे योगदान	प्रकल्प खर्चाच्या किमान १०%.
भाडेपट्टीवर प्रक्रिया क्षमतेचा वापर	सामाईक पायाभूत सुविधेची भरीव क्षमता तसेच प्रोसेसिंग रांगा इतर युनिट्स आणि लोकांसाठी भरीव क्षमतेच्या प्रमाणात भाड्याने वापरण्यासाठी उपलब्ध असावी.
जिल्हा संसाधन व्यक्ती	अनिवार्य नाही. अर्जदार डी.पी.आर. तयार करण्यात अनुभव असलेल्या कोणत्याही व्यावसायिक/ एजन्सीला निवड करू शकतो.
मंजूरी प्राधिकारी	State Level Approved Committee (SLAC)

४. मार्केटींग व ब्रॅन्डींग	
लाभार्थी	शेतकरी उत्पादक संस्था (FPO)/शेतकरी उत्पादक कंपनी (FPC), उत्पादक सहकारी संख्या, स्वयंसहायता गट (SHG) यांचे समूह अथवा SPV.
अनुदान सहाय्य	पात्र प्रकल्प खर्चाच्या ५०% कमाल आर्थिक मर्यादा केंद्र शासनाकडून विहीत करण्यात येईल.
मंजूरी प्राधिकारी	State Level Approved Committee (SLAC) आणि IMEC

५.सुक्ष्म अन्न प्रक्रीया गट उद्योगांना लाभ (इन्क्युबेशन केंद्र)	
पात्र संस्था/यजमान संस्था	शेतकरी उत्पादक संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, स्वयंसहायता गट आणि त्यांचे फेडरेशन (उदा.MSRLM-CLF, MAVIM-VLF, CMRC/NULM-ALF), शासकीय संस्था.
बाब	खर्च तपशील (अनुदान)
अ. ३-५ प्रक्रिया रांगा ब. अन्न परीक्षण प्रयोगशाळा क. पूर्व स्थित प्रकल्प सुधारणा ड. Auxiliary Unit इ. मार्गदर्शक संस्था शुल्क ई. नवीन इमारत बांधकाम	१) एकूण पात्र प्रकल्पाची किंमत रु. १० कोटी पेक्षा जास्त नसावी. २) यापूर्वी लागू असलेली अनुभवाबाबतची आता कोणतीही अट नाही. ३) प्लँट व यंत्रसामुग्री आणि तांत्रिक नागरी कामाचा खर्च समाविष्ट आहे.तांत्रिक नागरी काम हे पात्र प्रकल्प खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त नसावे. ४) यजमान संस्थेचा स्व- हिस्सा प्रकल्प खर्चाच्या किमान १०%. ५) बँकेकडून तत्वतः मान्यता घेणे अनिवार्य आहे. ६) प्रकल्प अहवाल सादर करणेसाठी यजमान संस्था यांना रक्कम रु. ५०००० देय ७) यजमान संस्था प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी व्यावसायिक संस्था/ अनुभवी संस्था निवड करू शकते. जिल्हा संसाधन व्यक्ती निवडणे बंधनकारक नाही. ८) ३.०० कोटी कमाल मर्यादेसह पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५% क्रेडिट लिंक्ड कॅपिटल सबसिडी.
मंजूरी प्राधिकारी	State Level Approved Committee (SLAC)

६. सुक्ष्म अन्न प्रक्रीया गट उद्योगांना लाभ (मूल्य साखळी)	
पात्र संस्था/यजमान संस्था	शेतकरी उत्पादक संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, स्वयंसहायता गट आणि त्यांचे फेडरेशन (उदा. MSRLM-CLF, MAVIM-VLF, CMRC/NULM-ALF) शासकीय संस्था.
शेती स्तरावरील पायाभूत सुविधा – पॅकहाऊस, पॅकेजिंग आणि ग्रेडिंग, प्रक्रिया युनिट, साठवण गृह, वितरण, वाहतूक व्हॅन (रेफ्रिजरेटेड/ इन्सुलेटेड व्हॅन)	१) प्लँट व यंत्रसामुग्री आणि तांत्रिक नागरी कामाचा खर्च समाविष्ट आहे.तांत्रिक नागरी काम हे पात्र प्रकल्प खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त नसावे. २) यापूर्वी लागू असलेली अनुभवाबाबतची आता कोणतीही अट नाही. ३) यजमान संस्थेचा स्व- हिस्सा प्रकल्प खर्चाच्या किमान १०%. ४) बँकेकडील पूर्व संमती पत्र जोडणे अनिवार्य आहे. ५) प्रकल्प अहवाल सादर करणेसाठी यजमान संस्था यांना रक्कम रु. ५०००० देय. ६) यजमान संस्था प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी व्यावसायिक संस्था/ अनुभवी संस्था निवड करू शकते. जिल्हा संसाधन व्यक्ती निवडणे बंधनकारक नाही. ७) रु. ३.०० कोटी कमाल मर्यादेसह पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५% बँक कर्जाच्या निगडीत अनुदान लाभ. ८) एकूण पात्र प्रकल्पाची किंमत रु. १० कोटी पेक्षा जास्त नसावी.
मंजूरी प्राधिकारी	State Level Action Committee (SLAC)

७. प्रशिक्षण	
लाभार्थी	१) योजनेअंतर्गत बँकेमार्फत मंजूर आणि नामंजूर प्रकल्प असे सर्व लाभार्थी ३ दिवसीय प्रशिक्षण २) बीज भांडवल लाभार्थी १ दिवसीय प्रशिक्षण
अनुदान सहाय्य	१००% अनुदान

उपरोक्त योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यास पाच वर्षांसाठी २२२३४ वैयक्तिक उद्योगांचे बळकटीकरणाचा भौतिक लक्षांक प्राप्त झाला असून याकरिता रक्कम रु. ९२१.५१ कोटीचा निधी दिला जाणार आहे. यामध्ये सन २०२१-२२ करिता ७२२६ वैयक्तिक उद्योगांच्या बळकटीकरणाचा भौतिक लक्षांक आहे.

अशा प्रकारे सदर योजनेंतर्गत येणाऱ्या विविध घटकांचा लाभ राज्यातील सध्यस्थितीत कार्यरत व नव्याने स्थापित होणाऱ्या सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

PMFME योजनेत सहभागी होणेसाठी वैयक्तिक व गट लाभार्थ्यांनी भांडवली गुंतवणूक प्रस्तावांसाठी www.pmfme.mofpi.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत. तसेच बीज भांडवल या घटकासाठी ग्रामिण भागातील स्वयंसहाय्यता गट सदस्यांनी जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा (DRDA) यांचेशी संपर्क साधावा. तसेच शहरी भागातील स्वयंसहाय्यता गट सदस्यांनी महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांचेशी संपर्क साधावा.

योजनेच्या अधिक माहितीसाठी www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच संबंधित तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी या कार्यालयांशी संपर्क साधावा.

***

नागरी सहकारी बँकांचं महत्व अधोरेखित व्हायलाच पाहिजे

ॲड. सुभाष मोहिते

एक वास्तव सगळ्यांनाच मान्य आहे की सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि खाजगी बँका यांच्या तुलनेत नागरी सहकारी बँकांचा जीव छोटा आहे. हे पण मान्य आहे की नागरी सहकारी बँकांमधे या बड्या बँकाइतकं प्रगत तंत्रज्ञान नसल्याने अनेक आधुनिक सुविधा उपलब्ध नाहीत. नागरी सहकारी बँकांची तुलना या मोठ्या बँकांशी होऊच शकत नाही. आणि खरं तर अशी तुलना करणं हे या बँकांवर अन्यायकारकच आहे. अशी तुलना होणं योग्य नाही याचं कारण म्हणजे नागरी सहकारी बँका आणि सार्वजनिक क्षेत्रातील आणि खाजगी बँका यांचं स्ट्रक्चर वेगळं आहे. यांचं प्रशासन वेगळं आणि आणि यांचा आकार कितीतरी मोठा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर या मोठ्या बँकांचा प्रभावही अर्थात मोठाच आहे. नागरी सहकारी बँका आकाराने छोट्या आहेत, यांचं प्रशासन वेगळं आहे. या बँकांचं संचालक मंडळ, अध्यक्ष हे सभासदांच्या मतदानातून निवडले जातात. सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि खाजगी बँका यांच्या संचालकांची आणि अध्यक्षांची निवड करण्यात, जरी या पब्लिक लिमिटेड कंपन्या असल्या तरी सर्वसामान्य भागधारकांचा यात प्रभाव पडलेला नसतोच.

या मोठ्या बँकांमधील सिस्टीम्स वेगळ्या आहेत आणि त्या सखोल अभ्यासातून निर्माण झाल्या आहेत. या बँकांमधील कर्मचारी, अधिकारी हे त्या मानाने उच्च शिक्षित आणि तरुण असल्याने त्यांच्याकडून मिळणारं आऊटपुटही अधिक असतं. या बँकांचा आकार मोठा, यांच्या ग्राहकांचा आकार मोठा, यांच्याकडच्या व्यवस्थापन प्रणाली वेगळ्या आहेत आणि तंत्रज्ञानही आधुनिक आहे. ज्या सुविधा यांच्याकडे आहेत त्या सहकारी बँकांकडे नाहीत. उदाहरणच द्यायचं झालं तर क्रेडिट कार्डाचं देता येईल. क्रेडिट कार्डावर दिलेल्या क्रेडिटवर मिळणारं व्याज आणि अन्य उत्पन्न पाहिलं तर लक्षात येईल की कोणताही प्रशासकीय खर्च न करता क्रेडिट कार्डामुळे मिळणारे कर्जदार खूप मोठे आहेत. ज्या विक्रीठिकाणी हे कार्ड वापरलं जात त्याच्याकडून वसूल केलेली फी पाहिली तर विश्वास बसणार नाही इतक्या दराने या छोट्या क्रेडिटवर उत्पन्न मिळते. या बँकांचे अन्य आकार आणि फी मोठी असते. नागरी सहकारी बँकांना मात्र केवळ व्याजाच्या उत्पन्नावरच थांबावं लागतं. व्याजेतर उत्पन्न अत्यल्प असतं. खाजगी बँकांचा विमा व्यवसाय मोठा आहे, त्यांचं मार्केटिंग दमदार असल्याने त्याचा लाभ त्यांना होतोच.

याउलट नागरी सहकारी बँकांचं जसं प्रशासन वेगळं आहे, तशाच अन्य गोष्टीही वेगळ्या आहेत. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या सिस्टीम पक्क्या असतात आणि त्यापलिकडे या बँका जात नाहीत. सहकारी बँकांकडेही सिस्टीम्स आहेतच. फरक इतकाच आहे की सहकारी बँका कर्जामागील माणूस अगोदर विचारात घेतात. आकड्यांना प्राधान्य असतंच, परंतु अर्जदार हा माणूस म्हणून अगोदर जोखला जातो. या बँका ग्राहकांच्या खूप जवळ असल्याने अनेक गोष्टींमधे फरक पडतो. ग्राहकाची अडचण पाहून नियमांमधे थोडीफार लवचिकता आणण्याची संस्कृति सहकारी बँकांमधे असते. खाजगी बँका मात्र आपल्या नियमात जराही तडजोड करण्यास तयार नसतात. केवळ नियमात एखादं कर्ज प्रकरण बसतं आहे म्हणून ते थकित होणार नाही किंवा बुडणार नाही असं नाही. कारण आकडे बदलणे शक्य असतं, ताळेबंदही प्रसंगी बदलला जातो, पण या आकड्यांमागचा माणूस मात्र बदलला जात नसतो. ज्यांना हा माणूस समजतो त्या असतात नागरी सहकारी बँका. खऱ्या गरजवंतांना अशाच लवचिकतेची अपेक्षा असते. नागरी सहकारी बँका अपवादात्मक का होईना ही लवचिकता दाखवतात आहेत, तरी यांच्या थकित कर्जाचं प्रमाण खूप मोठं आहे असं नाही. बहुतेक नागरी सहकारी बँकांचं निव्वळ एनपीएचं प्रमाण शून्य टक्के आहे.

अतिशय कडक असे एनपीएचे नॉर्म असूनही सहकारी बँकांनी सार्वजनिक क्षेत्रातील आणि खाजगी बँकांची याबाबत स्पर्धा करत थकित कर्जाचं प्रमाण सांभाळलेलं आहे. खाजगी बँकांमधे मिळणारा पगार पाहिला आणि नागरी सहकारी बँकांमधील पगाराची तुलना केली तर लक्षात येईल की नागरी सहकारी बँकांमधील कमी पगार घेणारा कर्मचारीही उत्तम सेवा देत आहे. नागरी सहकारी बँकांमधील सेवक बहुतांशी निवृत्तीपर्यंत तिथेच एकनिष्ठ असतो. खाजगी बँकामधील सेवक आणि अधिकारी दोन तीन वर्षात इकडून तिकडे जातात. या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निष्ठा त्या बँकेच्याबाबतही फार घट्ट असत नाहीत, ना खातेदारांबाबत. तिथे एक कोरडा ठणठणीत व्यवहारच असतो. नागरी सहकारी बँका मात्र ग्राहकांशी भावनिकरित्या बांधलेल्या असतात.

एक वास्तव आहे की काही काळापूर्वी अपवादात्मक परिस्थितीत काही बँका बंद झाल्या किंवा अन्य बँकांमधे विलीन झाल्या. हे झालं ते या सहकारी बँकिंग संकल्पनेत काही दोष आहे म्हणून नाही तर काही व्यक्तींच्या हलगर्जीपणामुळे किंवा अन्य कशामुळे ते घडलं होतं. मोठ्या बँकांमधेही यापेक्षा कितीतरी मोठाले घोटाळे होतात. तेही बँकिंग या सकल्पनेमुळे नाही तर काही चुकीच्या व्यक्तींकडे निर्णयाचे अधिकार गेल्यामुळे. त्या तुलनेत सहकारी बँकांमधे हे प्रकार अत्यल्पच आहेत.

मोठ्या बँका मोठ्या ग्राहकांचं स्वागत करतात. छोट्या आणि खऱ्या गरजवंत ग्राहकांना आजही नागरी सहकारी बँकाच हक्काचं ठिकाण आहेत. बँकांच्या राष्ट्रीयीकरणापूर्वी छोट्या छोट्या कारणासाठी, अगदी लग्न कार्य असेल, स्कूटर घ्यायची असेल तर कर्ज देणाऱ्या केवळ नागरी सहकारी बँकाच होत्या. प्राधान्य क्षेत्राव्यतिरिक्त कर्ज देण्याला मोठ्या बँकांना त्यावेळी परवानगी नव्हती. नागरी सहकारी बँकांकडे एकेका कुटुंबातल्या चार चार पिढ्या व्यवहार करत आहेत ते केवळ स्नेहपूर्ण जिव्हाळा असल्यामुळेच.

नागरी सहकारी बँकांमधील संचालक मंडळावरील सर्व सभासद आपण ग्राहकांच्या पैशाचे विश्वस्त आहोत असं समजतात. त्यामुळे कर्जावरचा निर्णय घेताना निर्धारित नियमापलीकडे जाऊनही कर्ज प्रकरणाची छाननी होत असते. नियमांना मुरड घातली गेली तरी ती बँक आणि ग्राहक यांचं हित विचारात घेवूनच असते.

नागरी सहकारी बँकांबाबत आणि त्यांची उपयुक्तता विचारात घेता आता केंद्र सरकार आणि रिझर्व बँकेनेही खूप उदार धोरण स्वीकारलेलं आहे. त्यासाठी केंद्रात स्वतंत्र मंत्रालयही सुरु केलं आहे. या बँकांना वेगळी काही मदत केली नाही तरी एक वेळ चालेल, पण यांना यांचं स्ट्रक्चर, यांचं प्रशासन विचारात घेऊन यांच्यासाठी शासकीय धोरणात थोडं वेगळेपण असायला पाहिजे. या बँकांना आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी खास सवलतही मिळायला पाहिजे. आता येऊ घातलेलं आर्टिफिशल इंटेलिजन्स मोठ्या बँका वापरु लागल्या आणि त्यांचा प्रशासनिक खर्च कमी झाला तर नागरी बँकांना त्यांच्या तुलनेत व्यवसाय करणे थोडं का होईना अवघडच असणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे उपलब्ध सुविधा, सेवा सहकारी बँकांना देता आल्या नाही तर तरुण पिढी यांच्यापासून आताच थोडी दुरावली आहे ती अधिक दुरावेल.

भारतीय अर्थव्यवस्थेमधे आपली तळागाळातल्यांसाठीची भूमिका चोख बजावणाऱ्या नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राकडे अधिक लक्ष देण्याची मात्र आवश्यकता आहे. केंद्र आणि राज्य सरकारची सध्याची भूमिका पाहता नागरी बँकांना व्यवसाय करणे अधिक सुलभ होईल अशी आशा आहे.

ॲड. सुभाष मोहिते
अध्यक्ष, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, पुणे
मो. : ९४२२०८६२७२/ ९३७२०७९४०९

ज्ञानाचे इनपुट शेती व्यवसायात टाका

डॉ. महानंद माने

'ज्ञानाचे इनपुट जोपर्यंत शेतकरी शेती व्यवसायामध्ये टाकत नाही, तोपर्यंत शेती व्यवसाय फायदेशीर होणार नाही असे उद्गार कृषी महाविद्यालय, पुणे चे सहयोगी अधिष्ठाता तसेच प्राचार्य डॉ. महानंद माने यांनी सोमवार दिनांक ९ जून २०२५ रोजी काढले. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे तर्फे प्रथमच आयोजित 'कृषीमाल निर्यात प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. माने बोलत होते. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री मंगेश तिटकारे होते.

प्रशिक्षणामुळे व्यक्तींची कार्यक्षमता वाढते. शेतकरी कष्ट करतो, तथापि बाजार भाव योग्य न मिळाल्यास शेतकऱ्यांचे कष्ट वाया जातात, त्यांची मेहनत मातीमोल होते. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने जोडधंदे करणे तसेच आपण उत्पादित केलेल्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थापनामध्ये लक्ष घालणे आवश्यक आहे. तसेच कृषी पणन व्यवस्थेमध्ये शेतकरी वर्गाने प्रवेश करणे गरजेचे आहे. अन्यथा बाजारभावाचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे कठीण आहे. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळातर्फे प्रथमच कृषीमाल निर्यात या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात

आले आहे. राज्यभरातून सुमारे ३० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झाले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महामंडळाचे व्यवस्थापक डॉ.भास्कर पाटील यांनी केले.

आपल्या प्रास्ताविक भाषणात डॉ. पाटील म्हणाले की, 'शेतकऱ्यांच्या कुटुंबांमधून निर्यातदार घडणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांची मुलं शिकली आहेत आणि त्यांना शेतीक्षेत्रा मध्ये काम करण्याची। इच्छा आहे. त्यांना शेतीत राबविण्यापेक्षा शेतमालाच्या विक्री व्यवस्थापनामध्ये त्यांच्या ज्ञानाचा उपयोग झाल्यास तो शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल. महामंडळाचे प्रशिक्षण व्यवस्थापक श्री. हेमंत जगताप यांनी सूत्रसंचालन केले तसेच उपस्थितांचे आभार मानले. कृषीमाल निर्यात प्रशिक्षण कार्यक्रम पाच दिवसांचा असून प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थींची विविध निर्यात सुविधा केंद्रांना भेट आयोजित करण्यात आली आहे.

मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनी लिमिटेड

महाराष्ट्राच्या विदर्भ विभागातील वैनगंगा नदीच्या खोऱ्यात भंडारा जिल्ह्यात मोहाडी तालुका वसलेला आहे. येथील नद्या आणि तलावांमुळे शेती आणि रेती उत्खननाला चालना मिळते. मोहाडी तालुका हा शेतीप्रधान असून तांदूळ (विशेषत: चिन्नोर, दुभराज, काळी कमोद या सुगंधी जाती) आणि इतर पिकांसाठी प्रसिद्ध आहे. मोहाडी येथील चंदेश्वरी देवी मंदिर हे ३०० वर्षे जुने प्राचीन मंदिर आहे, जे तालुक्याच्या धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासाचे प्रतीक आहे. याच मोहाडी तालुक्यातील सालेबर्डी गावात राहणारे श्री. सतीश रामदास ठवकर, वय ३० वर्षे, एक उत्साही आणि मेहनती शेतकरी. शेतीबद्दल त्यांची अपार आवड आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन यामुळे त्यांनी आपल्या गावात आणि परिसरात एक नवा आदर्श निर्माण केला.

यशोगाथा

संस्था स्थापना

परिसरातील इतर शेतकरी सुरुवातीला धानाचे/भाताची शेती करत, जे मोहाडी तालुक्यातील प्रमुख पीक आहे. परंतु, धानाला/भातालायोग्य भाव मिळत नसल्याने आणि बाजारपेठेतील मध्यस्थ आणि अस्थिरतेमुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. यामुळे सतीश ठवकर यांनी आपला मोर्चा भाजीपाला शेतीकडे वळवला. विशेषतः हिरवी मिरचीया पिकाकडे. स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेत हिरव्या मिरचीला खूप मागणी आहे, पण शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. याच आव्हानातून शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळवून देण्याची संधी श्री. ठवकर यांना दिसली. सालेबर्डी आणि आजूबाजूच्या गावांमध्ये काही शेतकरी सुशिक्षित होते, परंतु त्यांना शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करण्याची माहिती किंवा प्रेरणा नव्हती. या दरम्यान, कुमारी अपेक्षा बोरकर, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक कृषी विभाग यांनी ''केंद्र शासनाच्या १०,००० शेतकरी उत्पादक कंपनी आणि बळकटीकरण योजने''बद्दल माहिती दिली. ही योजना मोहाडी तालुक्यात भाजीपाला क्षेत्र वाढवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी राबवली जाणार होती. श्री. ठवकर यांच्या गावात आणि आजूबाजूच्या परिसरात भाजीपाला शेती आधीपासूनच प्रचलित होती, त्यामुळे ही योजना त्यांच्यासाठी वरदान ठरली. कु.अपेक्षा बोरकर यांच्या मार्गदर्शनाने आणि प्रोत्साहनाने परिसरातील सुशिक्षित आणि प्रगतीशील शेतकऱ्यांना एकत्रित आणले व त्यांनी ''मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनी'' या नावाने शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापन केली.

श्री. सतीश ठवकर

संस्था स्थापनेचे उद्देश

✻ मोहाडी तालुक्यात भात आणि भाजीपाला पिकांना बाजारपेठेत योग्य भाव मिळत नव्हता. विशेषतः हिरव्या मिरचीसारख्या पिकांना मध्यस्थांमुळे कमी दर मिळत होते. कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादन थेट बाजारपेठेत विकून त्यांना चांगला भाव मिळवून देणे.

✻ स्थानिक शेतकऱ्यांमध्ये एकत्रितपणे शेती आणि विक्रीची संकल्पना नव्हती. कंपनी स्थापन करून शेतकऱ्यांना एका व्यासपीठावर आणणे आणि सामूहिक शेतीच्या माध्यमातून त्यांची ताकद वाढवणे.

✻ शासकीय योजनांचा लाभ मिळवणे, शेतकऱ्यांना अनुदान, प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

✻ मोहाडी तालुक्यात भाजीपाला शेती, विशेषतः हिरव्या मिरचीचे क्षेत्र वाढवणे आणि त्याची गुणवत्ता सुधारणे. शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके यांसारख्या निविष्ठा कमी खर्चात उपलब्ध करून देणे संकलन, प्रतवारी, पॅकेजिंग आणि विक्री यासारख्या सुविधा पुरवणे,

✻ कंपनीच्या माध्यमातून स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

✻ शेतकऱ्यांना प्रशिक्षण, अभ्यास दौरे आणि प्रात्यक्षिकांद्वारे आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देणे आणि त्याचा अवलंब करून उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाण वाढवणे.

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ (MCDC) ला राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक NABARD यांनी १०,००० शेतकरी उत्पादक कंपनी योजनेअंतर्गत क्लस्टर आधारित व्यवसाय संस्था (CBBO) म्हणून नियुक्त केले आहे.

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने कंपनी स्थापनेसाठी आवश्यक नोंदणी, व्यवसाय विकास आराखडा (Business Development Plan) तयार करणे, संचालक मंडळाचे प्रशिक्षण, आणि सभासदांसाठी जागरूकता कार्यक्रम कार्य केले. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावर समन्वयक (Co-ordinators) नेमले, ज्यांनी कंपनीच्या कार्याला गती देण्यासाठी आणि शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, शेतकऱ्यांच्या उत्पादनांना बाजारपेठेत स्थान मिळवून देण्यासाठी आणि ब्रँडिंगसाठी सहाय्य केले.

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) ही या योजनेची प्रमुख अंमलबजावणी संस्था होती. त्यांनी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाला CBBO म्हणून नियुक्त करून भंडारा जिल्ह्यात कंपनी स्थापनेसाठी आर्थिक आणि तांत्रिक पाठबळ दिले. NABARD ने कंपनी स्थापनेसाठी आणि तिच्या प्रारंभिक तीन वर्षांच्या कार्यासाठी रु. १८ लाख अनुदान, उपलब्ध करून दिले. ज्यामध्ये नोंदणी, क्क्ग्र् चा पगार, व्यवसाय विकास आराखडा तयार करणे, प्रशिक्षण आणि जागरूकता कार्यक्रमांचा समावेश आहे. मोहाडी तालुका कृषी विकास उत्पादक कंपनी दि. १६ जुलै, २०२१ रोजी स्थापन झाल्यानंतर मोहाडी तालुक्यातील सालेबर्डी आणि आसपासच्या गावांमधील शेतकऱ्यांना एकत्र आणून हिरव्या मिरची आणि भाजीपाला शेतीला चालना देण्यावर लक्ष केंद्रित केले. कंपनीने वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळ्या समित्या तयार केल्या. यात शेअर मोबीलायझेशन समिती, मार्केटिंग समिती, कृषी निविष्ठा व इनपुट समिती, कायदेशीर समिती, आर्थिक समिती यांचा समावेश आहे. अभ्यासानुसार संचालकांना वेगवेगळ्या समित्या सोपविण्यात आल्या. संचालकांनी सालेबीर्डी आणि आसपासच्या १२ गावांमधील शेतकऱ्यांशी वैयक्तिकरित्या भेटी घेतल्या, जागरूकता मेळावे आणि गटचर्चा आयोजित केल्या कंपनी चे फायदे (जसे की योग्य भाव, निविष्ठा सुविधा, शासकीय अनुदान) समजावले व शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सभासद बनवून घेतले. सुशिक्षित आणि प्रगतीशील शेतकऱ्यांना प्रथम सभासद बनवले, ज्यांनी इतर शेतकऱ्यांना प्रेरित केले.यामुळे सुरुवातीला ३०४ शेतकरी भागधारक कंपनीशी जोडले गेले. प्रत्येक गावातून १०-१५ शेतकऱ्यांचा गट तयार केला गेला आणि त्यांच्याकडून नाममात्र समभाग(Shares)गोळा केले गेले. नंतर कंपनीने व्यवसाय विकास आराखडा (Business Developemtn Plan) तयार केला ज्यामध्ये हिरव्या मिरचीच्या संकलन, प्रतवारी आणि विक्रीवर लक्ष केंद्रित केले.

सभासदांमध्ये हिरवी मिरची आणि इतर भाजीपाला शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश होता, ज्यामुळे ८५ हेक्टर मिरची पिकाचे क्षेत्र प्रारंभिक टप्प्यात निश्चित झाले.कंपनीने सभासद शेतकऱ्यांकडून हिरवी मिरची थेट खरेदी करून स्थानिक बाजारपेठेत विक्री सुरू केली. यामुळे मध्यस्थांचा प्रभाव कमी झाला आणि शेतकऱ्यांना अतिरिक्त रु. ३-४ रुपये/प्रतीकिलो सुमारे ३-५% जास्त भाव मिळाला. कंपनीने सभासदांना कमी किमंतीत बियाणे, सेंद्रिय खते आणि कीटकनाशके पुरवण्यास सुरुवात केली. कंपनीने जैन इरिगेशनच्या ड्रिपटेक उपकंपनीकडून ड्रिप इरिगेशन डीलरशिप घेतली. यामुळे शेतकऱ्यांना ड्रिप इरिगेशनची उपकरणे आणि तांत्रिक सेवा कमी खर्चात उपलब्ध झाल्या. ड्रिप इरिगेशनमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर आणि मिरची पिकाचे उत्पादन वाढले. अशा प्रकारे संपूर्ण ७५७ सभासदांना जोडून कंपनीने ८५ हेक्टरवर असलेले मिरची पिकाचे क्षेत्र ४५३ हेक्टरपर्यंत वाढवले. याचबरोबर कंपनीने राष्ट्रीय अन्न सुरक्षा मिशन अभियान अंतर्गत २५० मेट्रिक टन क्षमतेचे गोदाम उभारले गेले या मार्फत कंपनीने सभासदांसाठी साठवणूक सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

कंपनीने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजने अंतर्गत शेतबांधावरील प्रयोगशाळा आणि १० ड्रम थेअरी सुविधा उभारली, ज्यामुळे सेंद्रिय खत निर्मिती आणि माती परीक्षण शक्य झाले आहे.

कंपनीमुळे फायदे -

* सालेबीर्डी आणि आजूबाजूच्या गावांतील शेतकरी वैयक्तिकरित्या शेती करत होते. सामूहिक शेती किंवा शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) याबद्दल त्यांना विश्वास नव्हता. शेतमालाच्या विक्रीसाठी त्यांना म ध्यस्थांवर अवलंबून राहण्याची सवय होती, त्यांना एकत्र येण्याचे फायदे माहित नव्हते.

* हिरव्या मिरचीसारख्या भाजीपाल्याला स्थानिक बाजारपेठेत म ध्यस्थांमुळे कमी भाव मिळत होता. याशिवाय, बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्याच्या चढ-उतारांमुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत होते.

* कंपनीला हिरव्या मिरचीचे संकलन, प्रतवारी, आणि साठवणूक यासाठी पायाभूत सुविधांची (जसे की गोदाम, संकलन केंद्र) गरज होती, पण सुरुवातीला अशा सुविधा उपलब्ध नव्हत्या. तथापि सदर अडचणी लक्षांत घेवुनच कंपनीच्य स्थापनेचे कामकाज करण्यात आले.

* कृषी विभाग आणि महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ (MCDC) यांच्या मदतीने जागरूकता कार्यक्रम आणि शेतकरी मेळावे आयोजित केले, ज्यामुळे शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण झाला.सुशिक्षित आणि प्रगतीशील शेतकऱ्यांना प्रथम सभासद बनवले, ज्यांनी इतरांना प्रेरित केले. यामुळे हळूहळू सभासदांची संख्या वाढली.

सभासद शेतकऱ्यांकडून नाम मात्र समभाग (Shares) गोळा केले, ज्यामुळे कंपनीच्या प्रारंभिक खर्चासाठी निधी उपलब्ध झाला. NABARD आणि MCDC यांनी केंद्र शासनाच्या १०,००० शेतकरी उत्पादक कंपनी योजने अंतर्गत निधी उपलब्ध करून दिला या निधीचा वापर कंपनी. नोंदणी, मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) चा पगार, व्यवसाय विकास आराखडा तयार करणे आणि प्रशिक्षणासाठी करण्यात आली.

कंपनीने सभासद शेतकऱ्यांकडून थेट मिरची खरेदी करून स्थानिक बाजारपेठेत विक्री सुरू केली, ज्यामुळे मध्यस्थांची भूमिका कमी झाली आणि शेतकऱ्यांना ३-५% जास्त भाव मिळाला. ग्क्क़्क् च्या मार्गदर्शनाने उत्पादनाची ब्रँडिंग आणि पॅकेजिंग सुधारले, ज्यामुळे मालाला चांगला भाव मिळाला. बाजारपेठेतील मागणीचा अंदाज घेण्यासाठी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधला आणि मागणीनुसार पिकांचे नियोजन केले.

* डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियानांतर्गत शेतबांधावरील प्रयोगशाळा आणि १० ड्रम थेअरी युनिट तयार केले. महाराष्ट्र शासनाची ही योजना नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आहे, ज्यामध्ये रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय आणि पर्यावरण स्नेही शेती पद्धती अवलंबल्या जातात. कंपनीने शेतबांधावरील प्रयोगशाळा उभारली, ज्यामुळे सभासद शेतकऱ्यांना माती परीक्षण, सेंद्रिय खत निर्मिती आणि कीटकनाशकांचे सेंद्रिय पर्याय यांची माहिती मिळाली.१० ड्रम थेरी (सेंद्रिय खत निर्मितीसाठी उपकरणे) उपलब्ध करून देण्यात आली, ज्यामुळे शेतकऱ्यांना स्वस्त दरात सेंद्रिय खत निर्मिती करता आली.

✻ **समभाग निधी** – समभाग निधी अंतर्गत कंपनीला त्यांच्या भांडवली खर्चासाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो.,मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनीला रु.१५ लाख समभाग निधी उपलब्ध झाला आहे. या निधीचा उपयोग संकलन केंद्र, प्रतवारी युनिट, पॅकेजिंग सुविधा आणि गोदाम उभारण्यासाठी केला गेला.

✻ **राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान** : केंद्र शासनाचे . राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान शेती उत्पादन वाढवण्यासाठी आणि पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आहे, ज्यामध्ये साठवणूक सुविधांचा समावेश आहे.कंपनीने २५० मे. टन क्षमतेचे गोदाम उभारले. त्यात रु.१२.५० लाखाचे अनुदान प्राप्त झाले. ज्यामुळे हिरव्या मिरची आणि इतर भाजीपाल्याचे संकलन, प्रतवारी, पॅकेजिंग आणि साठवणूक शक्य झाले.

सभासदाचा फायदा –

✻ कंपनीने सभासद शेतकऱ्यांकडून हिरव्या मिरचीची थेट खरेदी करून स्थानिक बाजारपेठेत विक्री केली. ज्यामुळे मध्यस्थांचा प्रभाव कमी झाला. यामुळे सभासदांना प्रति किलो रु. ३ ते ४ जास्त भाव मिळाला.

✻ कंपनीने सभासदांना कमी खर्चात बियाणे, सेंद्रिय खते आणि कीटकनाशके पुरवली, ज्यामुळे १५-२०% खर्च कमी झाला.

✻ जैन इरिगेशनच्या ड्रिपटेक डीलरशिपमुळे सभासदांना कमी खर्चात ड्रिप इरिगेशन उपकरणे आणि सेवा मिळाल्या. यामुळे पाण्याचा कार्यक्षम वापर झाला आणि उत्पादन खर्च १०-१५% कमी झाला.

✻ डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत उभारलेल्या शेतबांधावरील प्रयोगशाळा आणि १० ड्रम थेअरी यामुळे सभासदांना सेंद्रिय खत निर्मिती आणि माती परीक्षणाची सुविधा मिळाली.

✻ ड्रिप इरिगेशनमुळे मिरची पिकाचे उत्पादन २०-२५% वाढले, पाण्याचा अपव्यय कमी झाला.

✻ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत उभारलेल्या गोदामामुळे माल खराब होण्याचे प्रमाण ५-१०% कमी झाले.

✻ कंपनीने ग्ठ्ण्ठ्क्ण्त्र् पोर्टलद्वारे सभासदांना शेततळे, ड्रिप इरिगेशन, आणि कृषी यांत्रिकीकरण योजनांसाठी ६०-१००% अनुदान मिळवून दिले.

✻ CSC केंद्रांमार्फत Farmer ID ७/१२ उतारा, आणि आधार सीडिंग, सुविधा सभासदांना पुरविण्यात येते आहे.

सद्यस्थिती

चार वर्षाच्या कालावधीत कंपनीने भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील शेती क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. कंपनीने आसपासच्या १२ गावांमध्ये आपले कार्य विस्तारले आहे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण आणि सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

सुरुवातीला कंपनीकडे ८५ हेक्टर क्षेत्र हिरव्या मिरचीखाली होते, जे आता ४५३ हेक्टरपर्यंत वाढले आहे. ही वाढ कंपनीच्या विश्वासार्हतेमुळे आणि शेतकऱ्यांना मिळालेल्या लाभांमुळे शक्य झाली.

७५७ शेतकरी भागधारक कंपनीशी जोडले गेले आहेत. कंपनीने सुरुवातीला बियाणे, खते, कीटकनाशके आणि कृषी सेवा पुरवून इतर शेतकऱ्यांना विश्वासात घेतले. कंपनीने हिरवी मिरची खरेदी करताना वाजवी किंमती (प्रति किलो रु.३ ते ४ जास्त देऊन आपले वचन पूर्ण केले. ज्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास वाढला. हिरव्या मिरचीच्या किंमतीत सरासरी रु.३-५ प्रति/किलो वाढ झाली आहे, ज्यामुळे सभासदांच्या उत्पन्नात लक्षणीय सुधारणा झाली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा मिशन (NFSM)योजनेअंतर्गत उभारलेल्या २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदामामुळे हिरव्या मिरची आणि इतर भाजीपाल्याचे संकलन ,प्रतवारी ,पॅकेजिंग आणि साठवणूक सोयीस्कर झाले आहे .कंपनीने जैन इरिगेशनच्या उपकंपनी ड्रिपटेककडून ड्रिप इरिगेशन डीलरशिप घेतली आहे. यामुळे मोहाडी तालुक्यातील शेतकऱ्यांना ड्रिप इरिगेशन सुविधा कमी खर्चात उपलब्ध झाली आहे. कंपनीने ड्रीप इरिगेशन देखभाल डॉ. पंजाबरव देशमुख नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत उभारलेली शेतबाधावरील प्रयोगशाळा आणि १० ड्रम थेरी यामुळे सभासद शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळले आहेत. कंपनीने आता भाजीपाला प्रक्रिया जसे की मिरची पावडर, लोणची, चिली पेस्ट, भाजीपाला निर्जलीकरण सु डिग्री करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्र अँग्री बिझिनेस नेटवर्क (MAGNET) प्रकल्प, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसायव ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) किंवा राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनांचा लाभ घेण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर केले आहे. कंपनी ई- कॉमर्स प्लॅटफॉर्म GeM, ONDC आणि डिजिटल मार्केटिंगचा वापर करून आपली विक्री वाढवण्याचे नियोजन करत आहे. हिरव्या मिरची सोबतच टमाटे, वांगी आणि हळद यांसारख्या भाजीपाल्यावर लक्षकेंद्रित केले जाणार आहे.कंपनीने राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक नाबार्ड कडून समभाग निधी अंतर्गत सभासदांनी गोळा केलेल्या भांडवलाच्या बरोबरीने दोन ड्रोनमध्ये रु.१५ लाख प्राप्त केले आहेत. कंपनीने व्यवस्थापन करण्यासाठी नाबार्ड कडून मंजूर रु.१८ लाख डिलिव्हरेबल्स पूर्णते नुसार तीन वर्षातील कामे पूर्ण करून१२ इंस्टॉलमेंटमध्ये रु.१८ लाखाचे अनुदान प्राप्त करून घेतले. गेल्या चार वर्षांत कंपनीचा एकूण टर्नओव्हर रु.३ कोटी पर्यंत पोहोचले आहे. यामुळे कंपनी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली आहे आणि सभासद शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे.

✻ कंपनीने गेल्या चार वर्षांतील सर्वागीण रु. ३ कोटी टर्नओव्हर गाठले आहे.

✻ हिरव्या मिरचीच्या विक्री व्यवस्थेमुळे सभासद शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे.

✻ टर्नओव्हरच्या वाढीला २५० मेट्रिक टन गोदाम, ड्रिपटेक ड्रिप इरिगेशन डीलरशिप, आणि सेंद्रिय शेती उपक्रमांनी चालना दिली आहे.

✻ रु. १५ लाख समभाग निधी उपलब्ध झाल्यामुळे कंपनीचा भांडवली आधार मजबूत झाला. हा निधी संकलन केंद्र, प्रतवारी युनिट आणि पॅकेजिंग सुविधा वाढवण्यासाठी वापरला गेला.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा मिशन (NFSM): २५० मेट्रिक टन गोदाम उभारणीसाठी रु.१२.५० लाख अनुदान मिळाले, ज्यामुळे माल खराब होण्याचे प्रमाण कमी झाले आणि विक्रीतून उत्पन्न वाढले.

कंपनी भविष्यात 'मोहाडीकर ब्रँड' विकसित करणार आहे.

यशस्वी उपक्रम

✻ डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत कंपनीने १००० हेक्टर क्षेत्र सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीखाली आणण्याचा उपक्रम

यशस्वीपणे राबवला आहे.

✲ २५० मेट्रिक टन गोदाम (ग़्क़च्ग् अंतर्गत) आणि संकलन केंद्र उभारले गेले.

भविष्यातील नियोजन

✲ मिरची पावडर, चिलीपेस्ट, भाजीपाला निर्जलीकरण आणि सेंद्रिय मसाले यांसारख्या प्रक्रिया उद्योगांना वाढवून मूल्यवर्धन करणे.

✲ APEDA च्या सहाय्याने सेंद्रिय मिरची आणि प्रक्रिया उत्पादनांची निर्यात सु डिग्री करणे.

✲ २५० मे. टन गोदामाची क्षमता ५०० मे. टनपर्यंत वाढवणे आणि नवीन शीतगृह (Cold Storage) उभारणे.

✲ मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत शीतगृह, अवजारे बँक, ग्रेडिंग आणि पॅकेजिंग युनिट, साठवणूक सुविधा केंद्र, भाजीपाला निर्जलीकरण प्रकल्प यांसारखे उपक्रम सुरू डिग्री करणे. अशा प्रकारचे कंपनीचे भविष्यातील नियोजन आहे.

१. सुविधा

साठवणूक सुविधा केंद्र –

राष्ट्रीय अन्न सुरक्षा मिशन (NFSM) योजने अंतर्गत २५० मेट्रिक टनाचे साठवणूक सुविधा केंद्र मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनी मार्फत कृषी निविष्ठा शेतकऱ्यां पर्यंत वितरण करण्याची सुविधा

२. पिके

१. तांदूळ

२. गहू

३. मिरची

३. ब्रँड/उत्पादने

मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनी अंतर्गत तयार केलेले कृषि विकास ब्रँडचे सॉर्टेक्स राईस

४. विक्री व्यवस्थापन

✲ मिरची खरेदी व्यवस्थापन करण्यासाठी खरेदी केंद्र

✲ विविध कृषी प्रदर्शनी, FPO मेळावे यात सहभाग घेऊन कंपनी मार्फत तयार केलेल्या उत्पादनाचे विक्री व्यवस्थापन

✲ कंपनी मार्फत शेतकरी सभासदांचा भाजीपाला

✲ विकत घेऊन ग्राहकां पर्यंत पोहचवण्या करिता थेट शेतकरी ते ग्राहक विक्री व्यवस्थापन

५. मान्यवर भेटी

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ MCDC चे अधिकारी श्री. भास्कर पाटील सर, श्री. बळवंत धुमाळ सर, व श्री. सादिक मनेरी सर यांची राष्ट्रीय अन्न सुरक्षा मिशन योजने अंतर्गत सु डिग्री असलेल्या गोडाऊन बांधकामाला भेट.

नाबार्ड व ONDC मार्फत भरवण्यात आलेल्या तरंगमेळाव्याला मोहाडी तालुका कृषि विकास FPC ने सहभाग घेतले असता मा. हेमंत जगताप सर (प्रशिक्षण समन्वयक MCDC) यांची स्टॉलला भेट.

मा. श्री. देवेंद्र हेडाउ सर , नाबार्ड (DDMभंडारा) यांची इन्स्पेक्शन दरम्यान मोहाडी तालुका कृषि विकास FPC ला भेट.

६. इतर नावीन्यपूर्ण उपक्रम

✲ मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनी अंतर्गत जैन इरिगेशनची उप कंपनी ड्रीपटेक कडून डीलरशीप घेऊन सभासदांना व इतर शेतकऱ्यांना ड्रिप सुविधा पुरवत आहे.

✲ मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनीच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्र साकोली यांच्या मार्फत हरभऱ्याचे क्षेत्र वाढविण्या करिता हरभरा बियाणे वाटप करण्यात आले.

✲ मोहाडी तालुका कृषि विकास उत्पादक कंपनी अंतर्गत जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

श्री. सतीश रामदास ठवकर,
संपर्क – ८८८८२००७६७
ईमेल – krushivikasfpomohadi@gmail.com

✲✲✲

एन.बी. फॉर्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड

रामटेक, महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील एक ऐतिहासिक छोटस शहर, जिथे शेती, जिरायती, पशुपालन व जंगलावर आधारित व्यवसाय हा स्थानिक लोकांच्या जीवनमान जगण्याचा आधार आहे. रामटेक हे छोटस शहर श्रीरामाचे भव्य मंदिर, हे मंदिर म्हणजे इतिहास, भक्ती आणि सौंदर्य यांचा मिलन असलेले एक अद्वितीय तीर्थस्थान आहे त्याचबरोबर महान कवी कालिदास लिखित खंडकाव्य 'मेघदूत' खूप प्रसिद्ध आहे. रामटेकवरून ७ किलोमीटर अंतरावर घोटी या छोट्याशा गावामध्ये शेतकऱ्यांचा कृषीमालाला चांगला मोबदला देण्याच्या उद्देश्याने एन. बी. फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीची स्थापना करण्यात आली. त्या परिसरामध्ये मुख्य पिक तांदूळ व मिरची आहे. या परिसरातील मिरची हे पीक संपूर्ण भारत देशामध्ये प्रसिद्ध आहे. भविष्यात ही कंपनी शेतकऱ्यांकरिता वरदान ठरणार आहे

मन २०२० मधे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. दुधरामजी लोळकुजी सव्वालाखे यांना परिसरातील शेतकऱ्यांच्या उन्नती व शेतमालाला चांगला भाव देण्याच्या उद्देशाने त्यांच्या मनात कंपनी स्थापनेची कल्पना सुचली. आपले सहयोगी मित्र डॉ. रामसिंग महारे, बी. विरेंद्र लोखंडे, श्री. रमेशजी विरणवार व अनेक गणमान्य व्यक्तीशी चर्चा करून फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीची स्थापना करण्याचे ठरले. त्यानुसार एन.बी. फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी या नावाने कंपनी स्थापन करण्यात आली. सध्या या कंपनीमध्ये ८०१ सभासद आहेत.

यशोगाथा

संस्था स्थापनेचा उद्देश

एन.बी. फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीचा स्थापनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि मिरची हे नगदी पीक असून मिरचीचे उत्पादन आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून कसे वाढवता येईल हा उद्देश निश्चित करून कंपनीची स्थापना करण्यात आली. यामध्ये

* शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना जसे की तांदूळ, मिरची, गहू या पिकांना योग्य भाव मिळून देणे.
* शेतकऱ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडणे व शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळवून देणे.
* परिसरातील बेरोजगार तरुण, महिला बचत गट व शेतमजुरांना रोजगाराची संधी प्राप्त करून देणे.
* रासायनिक खतांचा वापर कमी करून जैविक खतांचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवणे.
* शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादन प्रक्रिया आणि व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण देणे.
* महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, नाबार्ड व कृषी विभागाचे अधिकारी यांनी शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांनी कंपनी नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे, प्रक्रिया आणि नियम याबाबत माहिती पुरवली. तसेच शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना व बळकटीकरण योजनेबद्दल माहिती त्यांनी पुरवली. शेतकऱ्यांना सेंद्रिय

शेती आणि नवीन उत्पादनांबाबत प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळा आणि कार्यक्रम आयोजित केले विविध योजनांद्वारे तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले.

* महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने कंपनीच्या स्थापनेसाठी आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य प्रदान केले. त्यांनी नाबार्ड आणि इतर संस्थांनी समन्वय साधून अनुदान आणि कर्ज मिळवण्यासाठी मदत केली. शेतकऱ्यांना सहकारी तत्त्वांवर आधारित व्यवसाय कसा चालवावा याबाबत मार्गदर्शन केले, विपणन आणि बाजारपेठ विस्तारासाठी सत्ता आणि संसाधने उपलब्ध करून दिली.

परिसरातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कंपनीच्या स्थापनेत सक्रिय सहभाग घेतला. स्थानिक शेतकऱ्यांनी कंपनीच्या सभासद म्हणून नोंदणी केली.

कामकाजाची सुरुवात

एन. बी. फार्मर्स प्रोड्युसर कंपनीने आपले कामकाज सुरु करण्यासाठी टप्प्याटप्प्याने आणि नियोजित पद्धतीने प्रक्रिया राबवली महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्या सहकार्याने कंपनीने रासायनिक खत व पिकावरील औषधे यांचा यशस्वी व्यवसाय सुरू केला आहे व शेतकऱ्यांना जास्त मोबदला न घेता उच्च गुणवत्तेचे रासायनिक खत व बी बियाणे उपलब्ध करून दिले. कंपनीने २९ वर्षाकरिता संचालक मंडळातील सदस्य श्री. दुधराम लोळकुजी सव्वालाखे यांचेकडून जागा लीज करुन कामकाजाला सुरुवात केली आहे.

एन.बी. फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या स्थापनेपासून ते कामकाज सुरू करण्याच्या प्रक्रियेत अनेक अडचणी आल्या. सुरुवातीला शेतकऱ्यांना एकत्र येऊन शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करणे कठीण होते. कंपनीची नोंदणी, परवाने मिळवणे आणि सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया पूर्ण करणे आव्हानात्मक होते.

तथापि संचालक मंडळाने अनेक गावात बैठका घेतल्या आणि शेतकऱ्यांना FPC चे फायदे समजावून सांगितले. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी कार्यशाळा आयोजित करुन सहकारी व्यवसाय मॉडेल आणि यशस्वी FPC ची उदाहरणे शेतकऱ्यांसमोर मांडली. स्थानिक यशस्वी शेतकऱ्यांचा सहभाग घेऊन आणि त्यांच्या अनुभवांचा उपयोग

करून इतर शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला गेला.

योजना

एन. बी. फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड रामटेक यांना हिरवी मिरची प्रतवारी व सात मिरची प्रक्रिया युनिट तयार करणे व तसेच प्रक्रिया केलेला फूड इंडस्ट्रिला विकणे असा हा प्रकल्प मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पाअंतर्गत मंजूर करण्यात आला. हा संपूर्ण प्रकल्प रु. २,९८,३८,०००/-आहे. यामध्ये स्वनिधी १० टक्के बँक लोन ३० टक्के व सबसिडी ६० टक्के आहे. सदर जागेवर कंपनीचे MACHINARY SHED पूर्ण झाले आहे. STAGING COLD STORAGE, PRECOOLING CHAMBER याचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. CLEANING, GRADING, GREEN CHILLI, RED CHILLLI DEHYDRYATOR WITH BIO FURNACE, SPICE PROCESSING PLANT व सोलरयुनिट यांचे टेंडर प्रक्रिया सुरू आहे. विद्युत TRANSFORMER बसविण्याचे काम पूर्ण झालेले आहे. येत्या तीन महिन्यामध्ये कंपनी प्रक्रिया उत्पादने विक्री करण्याचा मानस एन.बी. फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचा आहे. जेणे करून शेतकरी व सभासदांच्या मालाला चांगला मोबदला मिळेल.

एन.बी. फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचा स्थापनेमुळे म.स.वि. महामंडळाच्या सहकार्याने, कंपनीने शेतकरी व सभासदाकरिता चांगल्या कंपनीचे (IFFCO, RCF, KRUBHCO) रासायनिक खत व दर्जेदार वी-बियाणे, औषधे उपलब्ध करून दिली. त्यामुळे बाजारामधील बोगस मालाला आळा बसला व शेतकऱ्यांना चांगल्या खतामुळे, बियाणामुळे व औषधामुळे उत्पनात वाढ झाली.

कंपनीचे उपक्रम

एन.बी. फार्मर्स प्रोड्युसर कंपनी अंतर्गत

१. सभासद आणि स्थानिक शेतकयांसाठी सेंद्रिय शेती, सेंद्रिय मिरची उत्पादन प्रक्रिया, गोडाऊन व्यवस्थापन आणि विपणन याबाबत नियमित प्रशिक्षण कार्यशाळा घेत आहे.

२. जैविक शेती शेतकऱ्यांनी केली पाहिजे, त्याकरिता गावो-गावी जावून सभा घेण्यात येत आहे.

३. मिरची उत्पादन जास्तीत जास्त कसे करता येईल या करिता कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे.

४. उत्पादन झालेल्या मिरचीला बेस्ट बाजारपेठ उपलब्ध करण्याकरिता तज्ज्ञ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन शेतकऱ्याना देण्यात येत आहे.

इ. विविध उपक्रम कंपनीतर्फे राबविण्यात येत आहेत.

उत्पादने

एन.बी. फार्मर्स प्रोड्युसर कंपनी ही आपली सर्व उत्पादने NB FARMERS या ब्रांड नावाखाली विक्री करणार आहे. यामध्ये मसाले पदार्थ, लाल मिरची पावडर व हळदी पावडर व मसाले रेसिपी, एन.बी. फार्मर्स या ब्रँड नावाखाली विक्री करणार आहे.

भविष्यातील नियोजन

एन.बी. फार्मर्स प्रोड्युसर कंपनी भाविष्यामध्ये MAGNET POKRA या शासकीय योजनाचा लाभ घेऊन COLD STORAGE, GODOWN बांधकाम करण्याचे मानस आहे. यामुळे शेतकऱ्यांना आपला माल स्वस्त दरात न विकता, शेतकरी आपला शेतमाल COLD STORAGE किंवा GODOWN मधे ठेऊन बँक कर्ज उपलब्ध करून घेतील. शेतमालाला चांगला भाव आल्यावर शेतकरी त्या शेतमालाची विक्री करतील जेणेकरून शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होईल, त्याच बरोबर शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा एन.बी. फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीचा मानस आहे.

उपक्रमांचे फोटो सुविधा, पिके, प्रकिया यूनिट, गोदाम, बैंड उत्पादने, विक्री व्यवस्थापन, मान्यवर भेटी, उद्घाटन इवर नावीन्यपूर्ण उपक्रम.

अध्यक्ष, डॉ रामसिंग शंकरराव सहारे
एन.बी. फॉर्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड.
मोबाईल क्रमांक- ९४२२१२८६५५
पत्ता- अंबाला रोड, रामटेक,
ता. रामटेक, जिल्हा. नागपूर, ४४११०६
ईमेल - nbfarmers2021@gmail.com

***

पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक आणखी दोन पुरस्कारांनी सन्मानित

पुणे : गोवा येथे बँकिंग फ्रंटियर्स या बँकिंग क्षेत्रातील नावाजलेल्या संस्थेमार्फत 'फ्रंटियर्स को-ऑपरेटिव्ह बँकिंग अ‍ॅवॉर्ड्स' दिले जातात. येथील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस बेस्ट को-ऑपरेटिव्ह बँक इन इचआर लार्ज डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक (डीसीसीबी) कॅटेगरी आणि बेस्ट एचआर ट्रान्सफॉर्मेशन इन लार्ज डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक (डीसीसीबी) कॅटेगरीमध्ये मनुष्यबळ विकासाच्या चांगल्या कामाबद्दल दोन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. बँकिंग फ्रंटियर्सतर्फे संपूर्ण भारतातील गुणवत्ताप्राप्त बँकांचा गौरव समारंभ समारंभ पार पाडला. संपूर्ण देशातील १५० बँका यामध्ये सहभागी झाल्या होत्या. दिनांक १७ व १८ सप्टेंबर असे दोन दिवस सहकार आणि बँकिंगसंदर्भात चर्चासत्र व मार्गदर्शन करण्यात आले. गोवा सरकारचे सहकारमंत्री सुभाषराव शिरोडकर, भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे तसेच देशभरातील सहकारी बँकिंग क्षेत्रातील अनेक

दिग्गज नामवंतांच्या उपस्थितीत हा दिमाखदार सोहळा संपन्न झाला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा बँकेचे कामकाज चालते आणि मागील साडेतीन वर्षांत बँकेस मिळालेला हा आठवा पुरस्कार आहे. देशात सहकारातील अग्रगण्य जिल्हा बँक म्हणून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा गौरव होतो. या पुरस्कारांमुळे बँकेचे संचालक व राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, संचालक मंडळ व बँकेच्या प्रशासनावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

लक्ष्मी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. लक्ष्मीनगर

सांगोला तालुका हा सोलापूर जिल्ह्यात एक कृषी दृष्ट्या महत्त्वाचा तालुका असून, येथे विविध प्रकारची फळे व भाजीपाला पिके घेतली जातात. सांगोला तालुक्यामध्ये प्रामुख्याने डाळिंब आणि भाजीपाला शेती केली जाते,कारण येथील हवामान आणि जमीन फळे व भाजीपाला या पिकांसाठी परिपूर्ण आहे. सांगोला तालुका हा डाळिंबासाठी प्रसिद्ध आहे. या तालुक्यामधील जास्त भाग हा दुर्गम व ग्रामीण भाग असून तिथे भरपूर प्रमाणात परंपरागत शेती केली जाते. दुर्गम व ग्रामीण भाग असल्या मुळे तेथील शेतकऱ्यांना दैनंदिन व शेतिउपयोगी साहित्या करिता शहराच्या ठिकाणी यावं लागत होत. याचं अश्या परीस्थितीत लक्ष्मीनगर भागामधील काही शेतकऱ्यांनी पुढे येऊन लक्ष्मी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. ची स्थापना केली.

कृषी विभाग, सोलापूर यांच्या मार्फत केंद्र सरकारच्या १०००० शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना व बळकटीकरण या योजने बद्दल माहिती मिळाली संस्थेच्या पदाधीकाऱ्यांना कृषी विभाग मार्फत या योजने बद्दल परिपूर्ण माहिती घेऊन दीनांक ३०/०९/२०२२ रोजी लक्ष्मी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. ची स्थापना करण्यात आली.

यशोगाथा

स्थापनेचा उद्देश

* लक्ष्मी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. चा मुख्य उद्देश दुर्गम आणि ग्रामीण भागामधील शेतकऱ्यांना आर्थिक दृष्टया सक्षम करणे हा असून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य तो भाव मिळवून देणे आणि बाजारपेठ उपलब्ध करून देणे.
* शेतकऱ्यांना शेती आवश्यक वस्तू (खते, औषधे, बि-बियाणे, औजारे इत्यादी) ग्रामीण भागात, योग्य दरात आणि वेळेवर उपलब्ध करून देणे.
* शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांना माहिती देणे.
* शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे.

सर्वप्रथम कृषी विभाग, सोलापूर यांच्या मार्फत केंद्र सरकारच्या १० हजार शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना व बळकटीकरण या योजनेबद्दल योग्य ते मार्गदर्शन मिळाले. तसेच कंपनी नोंदणी करिता लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्यास कृषी विभागाने मदत केली.

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित पुणे यांच्या मार्फत कंपनी यशस्वीरित्या चालवण्याकरिता योग्य ते मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. तसेच वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले.

कंपनी यशस्वीरित्या चालवण्याकरिता राष्ट्रीय सहकार विकास निमग मार्फत आर्थिक सहाय्य देण्यात आले.

कामकाजाची सुरुवात –

संस्था स्थापनेच्या सुरवातीच्या काळात महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित पुणे यांच्या मार्गदर्शनाखाल संस्थेच्या सुरळीत कामकाजासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव यांची नियुक्ती करण्यात आली आणि संस्थेचे नोंदणी करण्यात आली संस्थेचे बँक खाते

उघडण्यात आले. तसेच विविध ठिकाणी ग्रामीण भागात जाऊन शेतकरी उत्पादक कंपनी बद्दल जनजागृती व माहिती देण्यात आली.

दुर्गम आणि ग्रामीण भाग असल्या मुळे शेतकऱ्याला संस्थे बद्दल व कंपनीच्या कामाबद्दल माहिती देणे व सर्व प्रकल्प समजावून सांगणे हे खूप जुजबीचे काम ठरले. तरी देखील तेथील प्रमुख शेतकऱ्यांच्या मदतीने शेतकरी एकत्र करणे सोपे झाले.

शेतकऱ्यांना एकत्र येण्यासाठी वेगवेगळे जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आले.

या जनजागृती कार्यक्रमा दरम्यान तिथे शेतकऱ्यांच्या कृषी विषयक अडचणी जाणून घेतल्या व त्या वरील उपाय योजनांवर चर्चा केली.

शेतकऱ्यांना त्यांचे होणारे फायदे समजून सांगितले गेले. यामुळे संस्थेचे सभासद होण्यसाठी मोठया प्रमाणात हातभार लागला.

अडचणी कोणत्या आल्या

* शेतकऱ्यांना आपल्या संस्थे बद्दल माहिती देणे व ही योजना पटवून देण हे खूप कठीण गेले.
* शेतकऱ्यांना आपल्या संस्थेचे सभासद बनवणे व भागभांडवल गोळा करणे फार मेहनतीचे काम होते. शेतकरी संघटित होत नव्हते कारण एकत्र येऊन काम करणे हि सोपी गोष्ट नाही असे सर्व शेतकऱ्यांचे मत होत.
* शेतकरी पिकवलेला माल ते कमी दरात व्यापाऱ्यांना देत होते. दुर्गम आणि ग्रामीण भाग असल्यामुळे सोयी सुविधांचा खूप अभाव होता. त्यामुळे त्यांना आपला माल व्यापाऱ्याला देणे हा एकच पर्याय वाटत होता. या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न संस्थेमार्फत करणार असल्याचे शेतकऱ्यांना पटवुन देण्यात आले.
* सुरवातीला कृषी विभागाच्या मदतीने काही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यात आल्या.
* संस्थेमार्फत गावागावात जाऊन स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. त्यांच्यात विश्वास निर्माण करण्यात आला. संस्थेबद्दल शेतकऱ्यांचा विश्वास संपादान करण्यासाठी व शेतकऱ्यांकडून भागभांडवल जमा गोळा करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष यांनी हमी शेतकऱ्यांना दिले. त्यानंतर शेतकरी सभासद

होण्यास तयार झाले.

* शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी कंपनीने शेतकऱ्यांना मदत केली. शेतकऱ्यांची ढोबळी मिरची आणि डाळिंब, मका या पिकांना योग्य बाजारभाव आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली गेली.
* संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विविध शेतकरी एकत्र आले.
* संस्थेने कृषी विभागाशी समन्वय साधून काही वैयक्तिक शेतकऱ्यांना शासकीय योजननांचा लाभ मिळवून दिला.
* डाळिंब, ढोबळी मिरची, मका, बोर, व इतरही भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांचा माल योग्य त्या भावाने खरेदी केला. त्यामुळे शेतकऱ्याला त्याच्या मालाची योग्य ती किंमत मिळाली.
* शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांबद्दल माहिती मिळाली. त्यांना योजनांचा वैयक्तिक लाभही घेता आला.

सद्यस्थिती –

लक्ष्मी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. चे एकूण ७५० सभासद आहेत. शेतकऱ्यांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्यास मदत करत आहे. संस्थेमार्फत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन डाळिंब, मका, ढोबळी मिरची खरेदी विक्री चालू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना या गोष्टीचा फायदा होत आहे. कंपनीचा टर्नओव्हर देखील वाढला आहे. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित पुणे यांच्या मार्फत विविध ठिकाणी कृषि मेळव्यांना जाऊन कंपनीचे उत्पादने विक्री करण्याची संधी मिळाले. त्याचबरोबर डिजिटल प्लॅटफॉर्म मार्फत देखील कंपनीच्या उत्पादनांची विक्री सुरु आहे. संस्थेमार्फत भाजीपाला कलेक्शनसेंटर सुरु करण्यासाठी वाटचाल करत आहोत.

संस्थेची आर्थिक स्थिती

संस्था स्थापन होवुन २ वर्ष १० महिने पूर्ण झाले आहेत. संस्थे मार्फत डाळिंब, मका, ढोबळी मिरची आणि इतरही भाजीपाला खरेदी विक्री चालू आहे.

संस्थेची पहिल्या आर्थिक वर्षात उलाढाल रु.१,४५,६०,५५६/- आणी दुसऱ्या आर्थिक वर्षात रु.१,८४,९७,७१९/- इतकी आहे. तसेच कंपनीचे कृषीकेंद्र देखील सुरु आहे. संस्था सध्या फळे आणि भाजीपाला खरेदी करूनत्याची विक्री करत आहे.

भविष्यातील नियोजन

लक्ष्मी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. भाजीपाला कलेक्शन सेंटर आणि गोळी पेंड बनवण्याचा प्रकल्प उभारण्याचे नियोजन करत आहे. यामुळे कार्यक्षेत्रातील तसेच सभासद शेतकऱ्यांना याचा फायदा होईल.

कंपनीला वेदांत अग्रो सायन्स टेक प्रा.लि.पुणे यांचेकडून सन्मानित करण्यात आले आहे.

अध्यक्ष – श्रीमती. चांगुणा प्रताप नरळे
मोबाईल क्रमांक-७५८८२२२००७
लक्ष्मी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. लक्ष्मीनगर
मु./पो.लक्ष्मीनगर - महूद, ता. सांगोला, जि. सोलापूर.
ई-मेल-lakshmifpo2022gmail.com

***

तीन महिनेच हंगाम चालण्याने साखर कारखानदारी तोट्यात

राज्यात पूर्वी सहा महिन्यांइतका चालणारा ऊसगाळप हंगाम आता केवळ तीन महिन्यांवर आला आहे. त्यामुळे कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक असलेली कारखानदारी एवढ्या कमी कालावधीसाठी चालण्याने साखर कारखान्यांना तोटा होत असल्याबद्दल राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी चिंता व्यक्त केली. त्यामुळे कारखानदारी अडचणीत आहे, असे बोलून न थांबता त्या संकटावर मात करण्यासाठी पर्याय शोधण्याची आवश्यकता असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या (डीएसटीए) ७० वे वार्षिक अधिवेशन आणि साखर प्रदर्शनाचे हॉटेल जेडब्ल्यू मेरिएटमध्ये सोमवारी (दि.२२) सकाळी त्यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील, आमदार अभिजित पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, सहकार आयुक्त दीपक तावरे, राज्याचे माजी साखर आयुक्त डॉ. शेखर गायकवाड, द वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी.बी.ठोंबर, द साउथ इंडियन शुगरकेन अँड शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष एन.चिनप्पन, द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष एस.बी.भड, उपाध्यक्ष सोहन शिरगावकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक एस.बी.भड यांनी केले. एस.डी.बोखारे यांनी आभार मानले.

वाढत्या एफआरपीचा ताळमेळ आवश्यक: सहकारमंत्री

केंद्र सरकारने साखरेचा किमान विक्री दर (एमएसपी) तोच ठेवला असताना दरवर्षी एफआरपीचा दर वाढत आहे. हा ताळमेळ घालावा लागेल, असे नमूद करून सहकारमंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, भावनिक निर्णय न घेता आणि कार्यकर्त्यांना सांभाळण्यासाठी सहकारी कारखान्यात होणारी अनावश्यक नोकरभरतीमुळे कारखाने अडचणीत येत आहेत. साखर उत्पादनासोबतच आता इथेनॉल, वीज, सीबीजीसारख्या उपपदार्थनिर्मिती हेच आता मुख्य उत्पादन झाले असून, ती काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

डीएसटीतर्फे देण्यात आलेल्या पुरस्कारांचे वितरण

* साखर उद्योग गौरव पुरस्काराचे मानकरी: संगमेश निरानी-निरानी ग्रुप, बाबूराव बोत्रे पाटील-ओंकार शुगर्स, भावेश पटेल-बारडोली गुजरात, अरविंद गोरे-आंबेडकर शुगर, विनय कोरे-वारणा शुगर ग्रुप
* बेस्ट शुगर फॅक्टरी २०२५ पुरस्कार: राजारामबापू सहकारी साखर कारखाना, व्यंकटेशकृपा शुगर मिल्स, नॅचरल शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज, द्वारकाधीश शुगर, गणदेवी शुगर, व्यंकटेश पॉवर प्रोजेक्ट लि. तसेच यावेळी तांत्रिक पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार व साखर उद्योगातील उल्लेखनीय कामगिरीबद्दलच्या पुरस्कारांचे वितरणही भरणे व बाबासाहेब पाटील आणि व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

समृद्धी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या.

यशोगाथा

समृद्धी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. ही एक केवळ शेतीपूरती संकल्पना राहिली नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिशा देणारा दीपस्तंभ ठरली आहे. वाई तालुक्यातील कवठे या छोट्याशा गावातून उगम पावलेली ही संस्था, २०२१ मध्ये अधिकृतपणे नोंदणीकृत झाली आणि त्याच क्षणापासून एक नवे स्वप्न घेऊन शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करू लागली.

वाई परिसर प्रचंड नैसर्गिक संपत्तीने समृद्ध असला तरी शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठा, प्रक्रिया सुविधा आणि मार्केट लिंकेजच्या अभावामुळे मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. दलालांच्या साखळीत अडकलेल्या या शेतकऱ्यांच्या डोळ्यात आशेऐवजी फक्त चिंता होती.

या पार्श्वभूमीवर समृद्धी संस्थेचा जन्म झाला. उद्देश होता – शेतकऱ्यांना त्याच्या श्रमाचे न्याय्य मूल्य मिळवून देणे, साठवणूक व प्रक्रिया करून मूल्यवर्धन करणे, स्वबळावर ब्रँड तयार करणे आणि महिला शेतकऱ्यांना उद्यमशीलतेचे व्यासपीठ देणे.

या वाटचालीत NCDC, MCDC, NABARD, कृषी विभाग, ATM- आणि स्थानिक प्रशासनाचे मोलाचे सहकार्य लाभले. सुरुवात झाली सोयाबीन व्यापाराने आणि तिथून पुढे हळद प्रक्रिया, सेंद्रिय खत, गूळ पावडर यांसारखे उपक्रम उभे राहू लागले. महिला बचतगटांची घरोघरी चालणारी रसायनमुक्त हळदीच्या लोणच्याची चळवळ ही संस्थेची खरी ताकद ठरली.

अर्थातच, वाट सुलभ नव्हती. भांडवली मर्यादा, प्रक्रिया यंत्रणांचा अभाव, ब्रँडिंगसाठी गरज असलेला निधी आणि लॅब परवाना यासाठी लागणारा खर्च ही मोठी आव्हाने होती. मात्र या अडथळ्यांवर मात करत त्यांनी सरकारी योजनांचा लाभ घेतला, खाजगी निधी उभारला, शेतकऱ्यांचा विश्वास जिंकला आणि एका यशाच्या पर्वाची सुरुवात केली.

संस्थेला '१०,००० एफपीओ योजना', NFSM अंतर्गत गोडाऊन', PMFME अंतर्गत १.०५ कोटींचा मार्केटिंग प्रकल्प', 'क्रेडिट गॅरंटी योजना', 'मॅचिंग इक्विटी ग्रँट', अशा विविध योजनांचा लाभ झाला आणि संस्थेचे पाय अधिक बळकट झाले.

आज समृद्धी FPO ७५० थेट व ४५०० अप्रत्यक्ष शेतकऱ्यांना जोडून आहे. शेतकरी वेळेवर बियाणे, खते घेत आहेत, उत्पादन प्रक्रिया करत आहेत आणि थेट बाजारात विक्री करत आहेत. महिलांनी स्वतःचे छोटे-मोठे युनिट सुरू करून आर्थिक स्वावलंबन गाठले आहे.

रु. १.१५ कोटींची वार्षिक उलाढाल, रु.३० लाख भागभांडवल, रु.२० लाख कर्ज खेळते भांडवल स्वरूपात आणि प्रत्येक उत्पादनामागे उभा असलेला समृद्धी चा चेरीयम ब्रँड – ही केवळ आकडेवारी नाही, तर शेतकऱ्यांच्या नव्या जीवनशैलीची साक्ष आहे.

संस्थेचे हळद पावडर, लोणचं, गूळ पावडर, शेंगदाणा चिक्की यांसारखी उत्पादने आज देशभर पोहोचली आहेत. राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार, पंतप्रधानांच्या गिफ्ट बास्केटमधील निवड, आकाशवाणीवरील कार्यक्रम, घीळीहळ गरसीरप प्रमाणपत्र – हे सारे यशाचे शिखर गाठण्याचे टप्पे ठरले.

संस्थेचा दृष्टीकोन आणखी व्यापक आहे – ड्रोनद्वारे पिक निरीक्षण, ट्रेसिबिलिटी, ICT आधारित ॲप्स, आंतरराष्ट्रीय विक्री व्यवस्था, आणि अजून ११ नवीन ब्रँडेड उत्पादने बाजारात आणण्याचे नियोजन सुरू आहे.

आज समृद्धी ही एक संस्था नाही, तर एक चळवळ आहे – शेतकऱ्यांच्या कष्टाचे मूल्य, महिलांच्या सामर्थ्याचे प्रतिबिंब आणि नवभारताच्या ग्रामीण

परिवर्तनाचे सशक्त उदाहरण. तिची वाटचाल ही प्रेरणा आहे – अडचणींवर मात करत उभे राहण्याची आणि संपूर्ण देशासाठी एक यशस्वी मॉडेल ठरण्याची.

संस्थेच्या उत्पादनांमध्ये आता आवळा कँढी, चिंच गोळी, चिंच लाडू, शेंगदाणा चिक्की यांसारख्या पारंपारिक चवीनं भरलेल्या पदार्थांचा समावेश झाला आहे. याशिवाय वाई परिसरात पिकणाऱ्या उच्च प्रतीच्या स्ट्रॉबेरीवर आधारित प्रक्रिया उत्पादनेही आता समृद्धीच्या ब्रँडखाली येत आहेत.

PMFME या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत पुढील वर्षभरात एक कोटीहून अधिक खर्च फक्त ब्रँडिंग आणि मार्केटिंगवर होणार असून, त्याद्वारे ही दर्जेदार उत्पादने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्राहकांपर्यंत पोहोचवली जातील. या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादन जागतिक दर्जाचे मानले जाईल.

या वाटचालीस अनेक मान्यवरांचा पाठींबा लाभला आहे. सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. मृणाल कुलकर्णी यांनी शेतकऱ्यांच्या या प्रामाणिक प्रयत्नांना आपला सहृदय पाठिंबा दर्शविला आहे. त्याचप्रमाणे, श्री. व सौ. भालेराव दांपत्य, 'आयुष्य' या संस्थेच्या माध्यमातून, सुमारे ३० लाख रुपयांचा निधी उभारून प्रशिक्षण, स्टँडर्डायझेशन व व्यावसायिक आकर्षक पॅकिंग या महत्त्वाच्या बाबींवर भर दिला आहे.

संस्थेच्या पुढील टप्प्यातील एक महत्वाचा प्रकल्प म्हणजे – प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे सर यांच्या नावाने नोंदणीकृत नैसर्गिक खताच्या पेटंटचा वापर करून 'कृषी समृद्धी' या ब्रँड अंतर्गत जैविक खतांचे उत्पादन सुरू करणे. हे भारतातील एकमेव पेटंट असलेले सेंद्रिय खत असून, त्यासाठी आवश्यक करार आणि पत्रकार परिषद नुकतीच संपन्न झाली आहे.

या सर्व वाटचालीला मूळ शेतकरी पुरुष व महिलांचा विश्वास, समर्पण व एकनिष्ठ साथ लाभली आहे. याशिवाय NCDC व MCDC सारख्या संस्थांनी वेळोवेळी दिलेले प्रशिक्षण, मार्गदर्शन व मदतीचा हात महत्त्वाचा ठरला आहे.

संस्था मन:पूर्वक या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करते – कारण या सर्वांच्या पाठिंब्यामुळेच 'समृद्धी' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे.

अध्यक्ष, श्री. विकास भगतसिंग डेरे,
मो. : ९८५०३९२०७५
मु.पो. कवठे, ता. वाई, जि. सातारा, पिन कोड ४१५५१६
ईमेल : samruddhifpo@gmail.com

पोकरा प्रकल्पामुळे आर्थिक स्थैर्य

लाभार्थी :– ज्ञानेश्वर लोकडू गाडे
योजना :– नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेडनेटहाऊस उभारणी
प्रशिक्षण संस्था :– महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ , साखर संकुल पुणे
पत्ता :– गाव –लोणी खुर्द ता .रिसोड जि .वाशिम
व्यवसाय :– शेडनेटहाऊस – २० गुंठे

पुढील शिक्षणासाठी घरची आर्थिक परिस्थिती हालाची असल्यामुळे पुढील शिक्षण होऊ शकले नाही, आणि वयाच्या २० व्या वर्षी अंकुर सीडस कंपनीत मी रोजाने रुपये ३००/- याप्रमाणे ६ वर्ष काम केले. परंतू तिथे काही मन रमेना. आपल्याला काहीतरी वेगळे करायाचे म्हणून मी कंपनी सोडली आणि नंतर वडिलांनी मला प्रेशर घेऊन दिले व गावात किराणा दुकान नव्हते मी किराणा दुकान टाकले. असा माझा छोटासा व्यवसाय सुरु झाला व मला राजकारणात पण खूप रस होता, व मी ग्रामपंचायत मध्ये ५ वर्ष सदस्य म्हणून राहिलो.

आणि त्यामधून माझ्या अनेक लोकांचे सोबत ओळखी झाल्या. व त्या वर्षी आपले गाव पोकरा अंतर्गत आहे असे मला माहीत झाले आणि ती त्यामधून सर्वप्रथम शेतकरी बचत गट तयार केला व शेतकरी अवजारे बँक घेतली. ट्रक्टर व त्यावर लागणारे सर्व साहित्य घेतले माझ्याकडे २ एकर शेती आहे. शेती कमी असल्यामुळे मी आर्थिक दृष्टया अधिक फायदेशीर करण्यासाठी पोकरा अंतर्गत शेडनेटहाऊस साठी अर्ज केला. माझी प्रशिक्षणासाठी निवड झाली. मला कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथे महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या माध्यमातून ५ दिवसीय निवासी शेडनेटहाऊस प्रशिक्षण घेतले. प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पहावयास मिळाले. माझ्या दृष्टीने ही संकल्पना स्वप्नवत होती . श्री. हेमंत जगताप व श्री. दिगंबर साबळे साहेब यांनी परदेशात व देशात कमी जागेत कसे अधिक चांगल्या दर्जाचे अर्थक्षम उत्पादन घेतात याची अनेक उदाहरणे समजून सांगितले. त्यामधून मी प्रेरणा घेतली. व पोकरा अनुदानातून २० गुठयांचे शेडनेटहाऊस उभारले. त्यामध्ये मी अगदी चांगल्या प्रकारे भाजीपाला धंदा सुरु केला मी मिरची, टमाटर, वांगे, या भाजीपाल्याची लागवड करत आहे आणि त्यामध्ये मला खुप आर्थिक फायदा झाला, आणि माझी आर्थिक परिस्थिती पण सुधारली आहे. महत्वाचे म्हणजे शेतक-याला योग्य मार्गदर्शन मिळाले तर अशक्य काहीच नाही. त्यामुळे महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे खुप खुप धन्यवाद. त्यासोबत पोकरा प्रकल्पातील मिळालेले अनुदान व माझे योगदान यामुळे मला या सर्व गोष्टी शक्य झाल्या, त्यामुळे शेतकरी बांधवांना मी आवाहन करतो की, शासनाच्या अनुदानाच्या पैशातून माझा जसा आर्थिक विकास झाला तसा आपण सुद्धा अनुदानातून आर्थिक विकास साधावा.

शेडनेटहाऊस मध्ये हिरवी ढोबळी मिरची लागवड

शेडनेटहाऊस मध्ये टोमॅटो पिकाची लागवड

बिगरशेती पतसंस्थांची गुंतवणूक आणि वैधानिक तरलता

श्री. गणेश निमकर

कर्ज आणि गुंतवणूक या उद्देशासाठी मागणीनुसार परतफेड करता येतील, या अटीवर केवळ त्यांच्या नियमित किंवा 'अ' वर्ग ('ब' वर्ग किंवा नाममात्र सभासद सोडून) सभासदांकडूनच ठेवी गोळा करणे, हा प्रत्येक बिगरशेती पतसंस्थेचा मूलभूत व्यवसाय आहे.

कोणतीही बिगरशेती पतसंस्था ही जेवढ्या ठेवी गोळा करते, त्या सर्वच्या सर्व ठेवी कर्जरुपाने वितरण करू शकत नाही. प्रत्येक बिगरशेती पतसंस्थेला सहकार कायदा/नियामक मंडळ तसेच सहकार खात्याच्या निर्देशानुसार आवश्यक तेवढी रोख व वैधानिक तरलतेपोटी गुंतवणुक करावी लागते. याचा अर्थ आवश्यक रोक व वैधानिक तरलतेपोटी गुंतवणुक प्रमाण पूर्ततेनंतर कर्ज वितरणाबरोबरच उर्वरित रकमेची वैकल्पिक किंवा बिगर वैधानिक तरलता गुंतवणूक करता येते. वैधानिक गुंतवणूक ही कायद्याने बंधनकारक असल्याने प्रसंगी उत्पन्न क्षमता विचारात न घेता मर्यादित व निर्धारित साधनांमध्ये ती करावीच लागते या उलट वैकल्पिक गुंतवणुकीसाठी अधिक पर्याय उपलब्ध असतात.

गुंतवणूक म्हणजे भविष्यामध्ये व्याज अथवा लाभांश स्वरूपात उत्पन्न मिळवण्यासाठी वर्तमान कालावधीत केलेला त्याग आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. गुंतवणुकीमधील उत्पन्न हे अनिश्चित स्वरूपाचे असून यामध्ये जोखीम स्वीकारलेली असते. जितकी जोखीम अधिक तितके उत्पन्न देखील अधिक (Higher the risk, Higher the reward) असते. गुंतवणुकीमध्ये असणारी जोखीम विचारात घेता जोखीम टाळता येत नसली तरी तिचे नियमन कसे करायचे हे पाहणे खूप महत्त्वाचे आहे. अनेक वेळेला गुंतवणुकीमध्ये प्रथम दर्शनी मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असल्याचे दिसते, परंतु त्यामध्ये नेमकी कोणती जोखीम दडलेली आहे किंवा अदृश्य स्वरूपातील जोखीम कोणती आहे हे लक्षात येत नसल्याने कोणतीही गुंतवणूक करताना ह्या बाबी नजरेआड करून चालत नाही.

कोणतीही गुंतवणूक करताना प्रामुख्याने तीन मुलभूत गोष्टी तपासणे महत्त्वाचे असते.

१) सुरक्षा :– गुंतवणुकीची मूळ मुद्दल व व्याज रक्कम मुदत पूर्व किंवा मुदत संपल्यावर तातडीने परत मिळण्याची निश्चितता असावी.

२) तरलता :– गुंतवणूक मुदतीनंतर परत घेताना व्याजासह मुद्दलाचे कोणतेही नुकसान न होता मात्र मुदत पूर्व बंद केल्यास मुद्दलाचे कोणतेही नुकसान न होता मात्र केवळ अल्प प्रमाणात व्याज नुकसान विचारात घेऊन गुंतवणूक त्वरील मिळण्याची खात्री असावी.

३) उत्पन्न स्थिरता :– उत्पन्नाची स्थिरता म्हणजे उत्पन्नाची नियमितता व सातत्य असावे. याचा अर्थ मिळणारे व्याज उत्पन्न अटी किंवा शर्ती पूर्ततेवर अवलंबून नसावे.

बिगरशेती पतसंस्था यांना देखील आता रोख राखीव व वैधानिक तरलता निधी बाबत वैधानिक तरतूद असून त्याचे उल्लंघनाबाबत दंडात्मक कारवाई देखील नमूद आहे. वास्तविक बँकिंगसारख्या व्यवसायामध्ये तरलता ही अत्यंत महत्त्वाची असते व त्याचे प्रतिकूल परिणामदेखील बिगरशेती पतसंस्था चळवळीच्या बाबतीत दिसून येत आहेत.

या दृष्टीने नागरी सहकारी पतसंस्थांसाठी विद्यमान सहकार कायद्यामध्ये दि. २२ फेब्रुवारी २०१९ पासून प्रकरण–११ (एक) (अ) हे स्वतंत्रपणे समाविष्ट करण्यात आले असून त्यामध्ये एकूण कलम १४४ (२) (अ) ते कलम ९४४(३१) (अ) अशी विविध कलमे समाविष्ट करण्यात आली. त्यामधीलच कलम १४४ (९) (अ) मध्ये रोख राखीव निधी व १४४(१०) (अ) वैधानिक तरलता निधी या यासंदर्भातील स्वयंस्पष्ट तरतुदी करण्यात आल्या आहेत.

रोख राखीव व वैधानिक तरलता निधी या दोन्हीचे प्रमाण बिगरशेती पतसंस्थेच्या प्रत्येक तिमाही अखेरच्या एकूण शिल्लक ठेवीवर नियामक मंडळाने निर्धारित केले असून प्रत्येक तिमाही अखेरच्या एकूण शिल्लक ठेवीवर लगतचे पुढील तिमाहीमध्ये दररोज हे निर्धारित किमान प्रमाण शिल्लक ठेवणे बंधनकारक आहे.

रोख राखीव निधी च्या बाबतीत रोख रकमेच्या स्वरूपात किंवा एखाद्या निर्धारित बँकेमधील (राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक) चालू किंवा बचत खात्यामध्ये किंवा पंधरा दिवसांपासून अधिक नसेल इतक्या दिवसांच्या निर्धारित बँकेमधील अल्प मुदत ठेवीच्या स्वरूपात अशी रक्कम ठेवावयाची असून वैधानिक तरलता निधी हादेखील रोख राखीव निधीप्रमाणे प्रत्येक तिमाही अखेर ठेव रकमेवर निर्धारित (राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक) बँकेमध्ये मुदत ठेव स्वरुपात ठेवावयाचा आहे.

रोख राखीव निधी रक्कम निर्धारित बँकेमध्ये (राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक) बचत चालू अथवा व पंधर दिवसांपेक्षा अधिक कालावधी नसलेल्या अल्पमुदत ठेव स्वरूपात तर व वैधानिक

तरलता निधीची रक्कम निर्धारित बँकेमध्ये मुदत ठेव स्वरूपात ठेवावयाची असल्या बाबतीत कायद्यात स्पष्ट तरतूद आहे. याचा अर्थ यासाठी वरील नमूद गुंतवणूक साधनांमध्ये केवळ ठेवी हा शब्द असल्याने या ऐवजी अन्य कोणतेही गुंतवणूक साधन यासाठी पात्र होणार नाही हे स्पष्ट होत आहे.

निर्धारित बँक म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील 'कलम ७० मध्ये नमूद केलेली बँक' अशी स्पष्ट शब्दरचना असल्याने यामध्ये केवळ निर्धारित बँकांमधील गुंतवणूक म्हणजे राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँकेतील गुंतवणूक असा अर्थ स्पष्ट आहे. तसेच निर्धारित बँकेत म्हणजेच राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँकेत गुंतवणूक करताना काही निकष पूर्ततादेखील आहेत त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

याशिवाय या कलमात 'राज्य शासनाने, नियमांद्वारे किंवा त्या बाबतीत दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी दिलेल्या इतर कोणत्याही प्रकारे गुंतवणूक करता येते' अशी एक तरतूद आहे. यासंदर्भात राज्य शासनाने दिलेल्या सीसीआर /प्र.क्र.१३०९/७स दि. ५ डिसेंबर २०१३ रोजीचे विशेष आदेशाद्वारे काही शर्ती पूर्तता करण्याचे अटीवर परवानगी दिलेल्या नागरी सहकारी, राष्ट्रीयीकृत अथवा प्रादेशिक ग्रामीण बँकेत बचत, चालू, अल्पमुदत तसेच मुदत ठेव स्वरुपात गुंतवणूक करण्यास परवानगी दिली असल्याने या तीन प्रकारच्या बँका यातील नमूद शर्ती पालन करण्याच्या अटीवर रोख राखीव निधी व वैधानिक तरलता निधी गुंतवणुकीसाठी पात्र होतील. सध्या तरी या व्यतिरिक्त अन्य कोणताही या संदर्भात शासन आदेश नाही.

यातील विशेष आदेशाद्वारे असणारया अटींमध्ये नागरी सहकारी, बँकांच्याबाबतीत मागील लागोपाठ तीन वर्षांत लेखापरीक्षणात निदान 'अ' वर्ग प्राप्त होणे व ज्या नागरी सहकारी बँकेत गुंतवणूक केली जाणार आहे त्या बँकेने म.स.सं. नियम १९६९ मधील नियम ३५ ची पूर्तता करणे या दोन निकषांची पूर्तता करणे आवश्यक असून या दोन्ही अटींची पूर्तता निकष हा राष्ट्रीयीकृत अथवा प्रादेशिक ग्रामीण बँकांना लागू नसला तरी राष्ट्रीयीकृत अथवा प्रादेशिक ग्रामीण या बँकांचे बाबतीत गुंतवणूक करताना बिगरशेती पतसंस्थेच्या केवळ मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या या बँकांचे शाखेत गुंतवणूक करता येणार आहे.

यामध्ये शेड्यूल्ड, खाजगी किंवा लघुवित्त बँका असा कोठेही शब्द प्रयोग नसल्याने खासगी किंवा लघुवित्त बँकांमधील गुंतवणूक ही रोख राखीव निधी व वैधानिक तरलता निधीसाठी पात्र होणार नाही. तसेच सरकारी कर्ज रोख्यांप्रमाणे कलम ७० प्रमाणे अन्य कोणतीही गुंतवणूक वैध असली तरीदेखील सदर गुंतवणूक वैधानिक तरलतेसाठी सध्यातरी पात्र नाही. वरील सर्व बाबी पाहता यामध्ये निर्धारित बँकेतील मागणी व मुदत स्वरूपातील ठेवी व्यतिरिक्त अन्य कोणतीही गुंतवणूक वैधानिक तरलतेसाठी सध्यातरी पात्र नसल्याचे अनेक पतसंस्थांना माहिती नसल्याने व त्यांनी ही गुंतवणूक या निर्धारित पूर्ततेसाठी ग्राह्य धरल्यास त्यांचे रोख राखीव निधी व वैधानिक तरलता निधीचे उल्लंघन होऊ शकते व पर्यायाने दंडात्मक कारवाई होऊ शकते. भविष्यात ही गुंतवणूक वैधानिक तरलतेसाठी पात्र झाल्यास प्रश्न येणार नाही.

वैधानिक तरलतेची गुंतवणूक करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे ही गुंतवणूक बिगरशेती पतसंस्थेला कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपलब्ध होणे अपेक्षित असल्यानेच काही निकष पूर्तीच्या अटीवर बिगरशेती पतसंस्थेला निर्धारित बँकांमधील केवळ मागणी अथवा मुदतठेवींमध्येच सध्यातरी ही गुंतवणूक करण्यास सूचित केले आहे. याचा सरळ सरळ अर्थ असा होतो की, निर्धारित बँकांमधील मागणी अथवा मुदतठेवी व्यतिरिक्त निर्धारित बँकेत अन्य कोणत्याही साधनांमध्ये गुंतवणूक केल्यास ही गुंतवणूक रोख अथवा वैधानिक तरलतेसाठी पात्र राहणार नाही.

रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी तसेच राज्य आणि जिल्हा बँकांना त्यांचे प्राथमिक तसेच दुय्यम भांडवल उभारणीसाठी विविध गुंतवणूक साधने (उदा. डेट इन्स्ट्रुमेंट.एल.टी.डी इत्यादी) उपलब्ध करून दिली आहेत. या साधनांमधील गुंतवणूक ही त्या बँकेतील प्राथमिक अथवा दुय्यम भांडवलामधील गुंतवणूक असून अगदी एल.टी. डी.च्या बाबतीत त्यामध्ये ठेव हा शब्द असला तरी ती गुंतवणूक केव्हाही उपलब्ध होणार नसल्याने ठेव गुंतवणुकीची कोणतीच वैशिष्ट्ये यातील कोणत्याच गुंतवणुकीला लागू होत नाहीत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, शासन आदेश व सहकार खाते आणि नियामक मंडळ यानी बिगरशेती पतसंस्थेने कोण कोणत्या साधनामध्ये गुंतवणूक करण्यास मुभा दिली आहे, याची सविस्तर माहिती घेतल्यानंतर अशाच साधनांमध्ये गुंतवणूक करणे हे नक्कीच संस्था हिताचे आहे.

जी साधने उपलब्ध नाहीत अशा साधनांमधील गुंतवणुकीबाबतीत जोपर्यंत शासन अध्यादेश येत नाही, तोपर्यंत बिगरशेती पतसंस्थेने गुंतवणूक करणे देखील जोखमीचे आहे.

अगदी थोडक्यात म्हणायचे तर बिगरशेती पतसंस्थेच्या बाबतीत रोख राखीव तसेच वैधानिक तरलतेसाठी पात्र गुंतवणुकीसाठी म.स.सं.अधि. कलम १४४ (९) (अ) व १४४(१०) (अ) मधील तसेच अन्य गुंतवणुकीसाठी म.स.सं.अधि. कलम ७० मध्ये नमूद असलेल्या तरतुदींचा बारकाईने अभ्यास करूनच गुंतवणूक करणे आवश्यक आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. याचा अर्थ म.स.सं.अधि. कलम ७० नुसार मुभा असणारी प्रत्येक गुंतवणूक ही म.स.सं.अधि. १४४ (९) (अ) व १४४ (१०) (अ) नुसार रोख राखीव तसेच वैधानिक तरलतेसाठी पात्र गुंतवणूक असेलच असे नाही.

बिगरशेती पतसंस्थांसाठी आता रोख राखीव तसेच वैधानिक तरलता गुंतवणूक ही अनिवार्य बाब झाली असून यामध्ये दंडात्मक कारवाई तरतूद अंतर्भूत आहे. अशा प्रकारची दंडात्मक कारवाई होणार नाही. तसेच कोणतीही गुंतवणूक तातडीने उपलब्ध होईल, अशाच पद्धतीने गुंतवणूक करणेची आवश्यक दक्षता घेण्याची नक्कीच गरज आहे.

श्री. गणेश निमकर पुणे

मो. ९८२२५६८५५०

***

मनी लॉन्ड्रिंग : पतसंस्थांसाठी जागरुकता व सावधगिरी

The Prevention of Money Laundering Act, 2002 (PMLA) किंवा सामान्य भाषेत आपण ज्याला अँटी मनी लॉन्ड्रीग असे संबोधतो. खरं तर हा विषय देशाची सुरक्षितता, आर्थिक घोटाळे, कर चोरी अशा बाबींशी संलग्न आहे, ज्याप्रमाणे कपडे धुण्याकरिता आपण लॉन्ड्री या शब्दाचा वापर करतो, त्याचप्रमाणे ब्लॅक मनीला व्हाईट मनीमध्ये रूपांतरीत करणे, याला (मनी लॉन्ड्रीग) असे म्हटले जाते. असा बेकायदेशीर पैसा कायदेशीर करण्याकरता शेल कंपन्या, आयात निर्यात कंपन्या, कॉन्ट्रॅक्टमधील ओव्हर एनव्हाइसिंग, हवाला बँकिंग, रियल इस्टेट किंवा गोल्ड इंवेस्टमेंट, इन्शुरन्स, सरकारी कंत्राट अशा माध्यमांचा वापर केला जातो. या सर्व माध्यमातून पैसा हस्तांतरणासाठी किंवा कायदेशीर व्यवहार दाखवण्यासाठी एखाद्या प्लॅटफॉर्मची आवश्यकता असते व हा प्लॅटफॉर्म म्हणजेच बँक किंवा पतसंस्थेमध्ये असलेले त्या व्यक्तीचे अकाउंट/खाते होय.

आपण विचार करत असाल गेल्या काही वर्षापर्यंत मनी लॉन्ड्रीग या विषयाची खूप जास्त भीती पतसंस्थांना किंवा मल्टीस्टेट सोसायटी यांना नव्हती. मग आता याबद्दल जास्त विचार करण्याची आवश्यकता का आहे?

श्री. मंगेश देहेडकर

आपण जर गेल्या पाच वर्षांचा काळ पाहिला तर असे लक्षात येईल की सरकारची धोरणे हे अशा प्रकारच्या बेकायदेशीर व्यवहारांवर नियंत्रण आणणे हे राहिले आहे आणि याकरिता बँकांतील खात्यांवर आरबीआयच्या मार्फत खूप मोठ्या प्रमाणात नियंत्रण आणले गेले आहे. यामध्ये हाय व्हॅल्यू ट्रांजेक्शन रिपोर्टिंग व सस्पेशियस ट्रांजेक्शन रिपोर्टिंग हे बँकांना अधिक काळजीपूर्वक तपासून संबंधित ऑथॉरिटीला माहिती देण्याकरिता बंधनकारक केले आहे. गोल्ड व प्रॉपर्टी खरेदी-विक्री या संदर्भातील नव्या तरतुदी तसेच इन्कम टॅक्सच्या माध्यमातून दोन लाखांपेक्षा अधिक रकमेचे व्यवहार कॅशमध्ये न करणे, अशा अनेक बदलातून शासनाने असे बेकायदेशीर व्यवहार नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला आहे. यामागील पाच वर्षाच्या काळात या बदलांमुळे असे व्यवहार करणाऱ्या व्यक्तींनी डिजिटल अकाउंट, पेमेंट बँक अकाउंट व ई-वॉलेट अशा माध्यमांचा खूप मोठ्या प्रमाणात वापर करणे सुरू केले होते. अशा प्रकारच्या खात्यांचा गैरवापर होतोय, हे लक्षात आल्यावर त्यावरदेखील आरबीआयने अनेक निर्बंध घातले. मग असे व्यवहार करण्याकरिता सॉफ्ट टारगेट गेल्या पाच वर्षात व प्रकर्षाने गेल्या तीन वर्षात पतसंस्था व मल्टीस्टेट सोसायटी या झाल्या आहेत. आता पतसंस्थांना टार्गेट करण्याकरिता सर्वात प्रथम अशा व्यक्ती पतसंस्थांमध्ये अनेक खाते एकाच शाखेत किंवा पतसंस्थेच्या अनेक शाखांमध्ये वेगवेगळ्या नावाने उघडतात. अशा खात्यांवरती वेगवेगळ्या जिल्ह्यातून, राज्यातून रक्कम जमा व्हायला लागतात. अशा रक्कम या कॅश स्वरूपात किंवा ट्रान्सफरने इतर खात्यामध्ये वळवून विथड्रॉल केल्या जातात. प्रत्येक वेळी अशा रक्कम या मोठ्या स्वरूपाच्या असतीलच असे नाही. उलट छोट्या छोट्या रकमेच्या अनेक ट्रांजेक्शन जास्त केल्या जातात. काही काळ असे व्यवहार सातत्याने शाखांवरती सुरू असतात. रक्कम या लहान आकाराच्या असल्यामुळे कर्मचारीदेखील अशा व्यवहारांची विशेष चौकशी करत नाही. यानंतर काही काळातच बँकेकडून आपल्याला कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेचे खाते गोठविण्यात आलेले आहे. चौकशीअंती पतसंस्थेला समजते की, कुठल्यातरी इतर राज्यातून आपल्या पतसंस्थेतील एखाद्या किंवा अनेक ग्राहकांच्या खात्यात काही रक्कम आल्या व ज्या लोकांची फसवणूक झालेली आहे त्या लोकांनी या खातेदारांविरुद्ध तक्रार दाखल केली व त्या कारणाने पतसंस्थेचे खाते गोठविण्यात आलेले आहे. वास्तवात पतसंस्थांना असे वाटते की, सदर व्यवहार हा पतसंस्थेचे खातेदार आणि फसवणूक झालेली व्यक्ती यामध्ये झालेला असताना पतसंस्थेचे खाते का गोठविण्यात आले आहे? याचे कारण सायबर गुन्हे अन्वेषण किंवा तत्सम यंत्रणांना पैसे कोठून कुठल्या बँकेमध्ये ट्रान्सफर झाले.

याची चेन ही शेवटी पतसंस्थेच्या खात्यापर्यंतच जाऊन सापडते व थांबते. त्यापुढे पतसंस्थेच्या खातेदाराची माहिती ही अशा यंत्रणांकडे जात नाही. त्यामुळे सदरील व्यक्ती ऐवजी पतसंस्थेचे खाते गोठविण्यात येते. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे केवायसी नॉम्सअनुसार नो युवर कस्टमर म्हणजेच तुम्ही ज्या व्यक्तीला खाते उघडू दिले आहे. अशा व्यक्तीच्या त्या खात्यावरील व्यवहाराची माहितीदेखील पतसंस्थेने ठेवणे आवश्यक आहे. त्या व्यक्तीचा खाते उघडण्याचा उद्देश काय होता? ज्या उद्देशाने खाते उघडले तो उद्देश कायदेशीर होता की नाही? त्या खात्यावर झालेले सर्व

पान क्र. ३९ वर

सहकारी संस्थांमधील सभासद व ग्राहक साक्षरता

महाराष्ट्र हे सहकार सर्वाधिक रुजलेले राज्य आहे. सर्वाधिक सहकारी संस्था महाराष्ट्रात आहेत. साखर कारखाने, दूध उत्पादक संघ, विणकर, मच्छिमार सोसायटी आणि त्याच बरोबर पतसंस्था, बँका अशा प्रकारच्या आर्थिक संस्था महाराष्ट्रात सर्वाधिक आहेत. या संस्थांपेक्षा आर्थिक सहकारी संस्था यांचे स्थान विशेष महत्वाचे आहे. कारण त्या विश्वस्तवृत्ती, संचालकांचा विश्वास आणि पारदर्शी कारभार यांचे जोरावर मोठ्या होतात.

श्री. अविनाश जोशी

सहकार ही एक जीवनशैली आहे. आपल्या समान गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने आणि सहकाराची मूलतत्त्वे पाळून चाललेली संस्था म्हणजे सहकारी संस्था. संयुक्त प्रयत्नांतून एक समान ध्येय गाठण्यासाठी एकत्र आलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे सहकार होय. सहकार ही व्यापक चळवळ असून यात समान गरजा असलेल्या व्यक्ती, समान आर्थिक उद्दिष्टांसाठी, स्वेच्छेने संघटित झालेल्या असतात. खरे तर ग्रामीण भागातील गरीब, गरजू लोकांना सावकारी पाशातून सोडवून त्यांच्यात पत निर्माण करण्यासाठी सहकारी तत्त्वावर पतसंस्था आणि सहकारी बँका यांचा उदय झाला. सहकाराची सात मूलतत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. भारतातील सहकारी चळवळीने ती स्वीकारली आहेत. ऐच्छिक आणि खुले सभासदत्व, सभासदांचे लोकशाही नियंत्रण, अर्थव्यवहारात सभासदांचा सहभाग, स्वयंशासन आणि स्वातंत्र्य, शिक्षण प्रशिक्षण आणि माहिती, सहकारांतर्गत सहकार आणि सामाजिक जाणीव व बांधिलकी अशी सात मूलतत्त्वांचे आधारावर कोणतीही सहकारी संस्था चालावी, अशी अपेक्षा आहे.

※ गुड गव्हर्नन्स ही संकल्पना महत्त्वाची –

कोणत्याही सहकारी संस्थेत लोकशाही नियंत्रण म्हणजे लोकशाही पद्धतीने निवडून दिलेले सभासद म्हणजेच संचालक, हे त्या संस्थेचा कारभार दररोज पाहत असतात. संस्था संचालन म्हणजेच गुड गव्हर्नन्स ही संकल्पना महत्त्वाची आहे. संस्थेचे सर्व हितसंबंधी घटकांना एकत्र करून त्यांचे हित जोपासणे, हे काम संस्था संचालनात अपेक्षित आहे. आर्थिक सहकारी संस्थेत म्हणजेच पतसंस्था वा सहकारी बँका यामध्ये प्रथम भागधारक, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, कर्मचारी, संचालक, नियंत्रक या सर्वांचे हितसंबंध जपणे म्हणजे संस्था संचालन होय. याची प्रमुख जबाबदारी संस्थेचे दैनंदिन कारभारावर नियंत्रण ठेवणाऱ्या संचालक मंडळाची आहे. अभ्यासू वृत्तीने, विश्वस्तांचे भावनेतून पारदर्शी व्यवहार ठेवले तरच सहकारी आर्थिक संस्था उत्तम कारभार करू शकतील. भांडवल पुरवणारे भागधारक यांचे हित त्यांना दरवर्षी मिळणाऱ्या परताव्यावर म्हणजेच लाभांश किंवा डिव्हिडंड यामध्ये आहे. त्यामुळे संस्था नफ्यात चालते तेव्हाच त्यांना लाभांश मिळेल.

※ ग्राहक वा सभासदांची साक्षरता महत्त्वाची –

संस्थेतून दिल्या जाणाऱ्या अनेकविध सेवांचा लाभ घेणारे ग्राहक आणि त्यांना देण्यात येणारी विनम्र आणि तत्पर सेवा हेच सहकारात काम करणाऱ्या आर्थिक संस्थांचे खरे भांडवल आहे. ग्राहकांचे विश्वासास तडा जाणार नाही, याची काळजी संचालक मंडळाने केली, तरच सहकारी संस्था वाढतील आणि याही अडचणीचे काळात तगून राहतील. प्रमुख हितसंबंधी म्हणजेच भागधारक, कर्मचारी आणि संचालक हे प्रशिक्षित असले पाहिजेत, त्यासाठी घटना दुरुस्तीने कायद्यात २४ अ हे नवे कलम समाविष्ट करून या तीनही घटकांचे प्रशिक्षण संस्थांवर बंधनकारक केले आहे. त्यामुळेच ग्राहक वा सभासदांची साक्षरता ही सहकारी आर्थिक संस्थांमध्ये अत्यंत महत्त्वाची आहे.

सभासद आणि ग्राहक हे जागरूक आणि प्रशिक्षित असणे, ही सहकाराची गरज आहे. कोणत्याही सहकारी आर्थिक संस्थेत म्हणजेच पतसंस्था वा सहकारी बँकेत ग्राहकाची व्याख्या ही अगदी सोपी आहे. त्या संस्थेत दिल्या जाणाऱ्या सोयी वा सुविधांचा लाभ घेण्यासाठी येणारी प्रत्येक व्यक्ती ही पतसंस्था वा सहकारी बँकेची ग्राहक आहे. या सुविधा देतानाच तत्पर आणि विनम्र सेवा देणे, हेच सहकारी संस्थांचे भांडवल आहे. कारण ग्राहकांमुळेच मिळणाऱ्या व्यवसायातून नफा क्षमता वाढते. जेवढी नफा क्षमता अधिक, तेवढे निधी संकलन अधिक होईल, जेवढा निधी (रिझर्व्हस) वाढेल तेवढी स्वनिधीमध्ये वाढ होऊन संस्था आर्थिकदृष्ट्या सदृढ-सशक्त होईल. वसूल भाग भांडवल आणि मुक्त निधी म्हणजे फ्री रिझर्व्हज, ही स्वनिधीची व्याख्या आहे. स्वनिधी जेवढा अधिक, तेवढी जोखीम पेलण्याची संस्थेची शक्ती अधिक असते. त्यामुळे व्यवसाय वाढ म्हणजेच व्यावसायिकता आणि नफा क्षमता या प्रमुख गोष्टीवर लक्ष केंद्रित करून ग्राहक सेवेला महत्व देणे, हाच संख्या वाढीचा रामबाण उपाय आहे.

※ ग्राहकासमोर अनेक पर्याय उपलब्ध –

ग्राहकासमोर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. ग्राहक संरक्षण मंच आणि कायद्याचेही संरक्षण त्यांना उपलब्ध आहे. त्यांना इतर आर्थिक संख्या अनेकविध प्रलोभने दाखवून आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे आपला ग्राहक दुसरीकडे जाणार नाही, त्याचे तक्रारीचे निवारण लवकर आणि त्यास समाधान देणारे, कसे होईल, याची काळजी संस्थांनी यापुढे अधिक घेणे गरजेचे आहे. तसेच ग्राहकांनीही अधिक जागरूक आणि सतर्क राहणे, अभ्यासू वृत्तीने संस्थेच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊनच गुंतवणूक करणे, ही आता काळाची गरज आहे. संस्थांनी आपल्या ग्राहकाला प्रशिक्षित व साक्षर करून त्यास सतत नवनवीन माहिती, ज्ञान देऊन अधिक प्रगल्भ केले पाहिजे. यासाठी ग्राहक साक्षरता मेळावे आयोजित करून कायद्याची, आपल्या सोयीसुविधांची त्यास अद्ययावत माहिती देणे, ही संस्था संचालकांची जबाबदारी आहे.

ठेव ठेवताना संस्थेची सशक्तता व सुदृढता याची त्यास माहिती असणे, गरजेचे आहे. कर्ज व्यवहार करताना कर्ज मंजुरीच्या अटी, शर्ती, मुदत, व्याजदर, कागदपत्रांची पूर्तता यांची संपूर्ण माहिती आणि त्यासाठी त्यांची संमती घेणे, या गोष्टींबाबत संस्थेने त्यास अवगत करणे गरजेचे आहे. कर्ज रोख्यामध्ये आपण काय लिहून दिले आहे. आपली जबाबदारी काय, कारण आणि तारण यांची पूर्ण माहिती, जामीनदार, गहाणखत याबाबत संपूर्ण माहिती कर्जदारास सांगणे आता खूप गरजेचे बनले आहे. कर्ज वितरणाअगोदर कर्जदारास ही सर्व माहिती देणे आवश्यक आहे. बँकेच्या/ संस्थेच्या वेबसाईटवर ग्राहकांना तक्रार नोंदवण्याची सोय उपलब्ध झाली पाहीजे. त्यांचे तक्रारीबाबत त्वरित कार्यवाही करून त्यास समाधानकारक उत्तर देणे गरजेचे आहे. कोणीही ग्राहक मग तो ठेवीदार, कर्जदार वा इतर सोयी सुविधांचा लाभ घेणारा असो, तो पतसंस्था वा बँकेच्या नजरेच्या टप्प्यात असला पाहिजे म्हणजे आपला ग्राहक ओळखा किंवा केवायसी हे तत्त्व पाळले पाहिजे. कारण जसा ग्राहक हा व्यवसाय देणारा घटक आहे. तसेच त्याचेपासून संस्थेस जोखीम (रिस्क) पोहोचू शकते. त्यामुळे केवायसी नियम पूर्णतः पाळून त्याची संपूर्ण माहिती करून घेतली पाहिजे.

※ विविध उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक –

ग्राहकांना आणि भागधारकांना पतसंस्थेची वा बँकेची संपूर्ण माहिती असणे गरजेचे आहे. वार्षिक अहवालातील नफा तोटा पत्रक ताळेबंद, परिशिष्टे तसेच त्याबाबतची दिलेली माहिती (डिस्क्लोजर्स) अभ्यासले पाहिजेत. ग्राहकांना साक्षर करणे, ही जशी संस्थेची जबाबदारी आहे. तसेच स्वत: ग्राहकाने अभ्यासू वृत्तीने संस्थेची ओळख माहिती करून घेणे आणि आपली संस्था आर्थिकदृष्ट्या सदृढ, सशक्त आहे ना याची खात्री करून घेणे ही काळाची गरज आहे. सर्वच सहकारातील आर्थिक संस्थांनी विशेषत: पतसंस्था व सहकारी बँकांनी पुढाकार घेऊन ग्राहकांचे आर्थिक साक्षरतेसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण, अभ्यासवर्ग, ग्राहक मेळावे यांद्वारे प्रबोधन करावे.

संकेतस्थळ जाहिराती, पत्रके, फ्लेक्स यांद्वारे त्यांना सतत बदलत्या सोयी सुविधांची माहिती देणे हे गरजेचे आहे. त्यासाठी संचालक मंडळाने विशेष कार्यक्रम राबवून हितसंबंधी घटकांना विशेषतः भागधारक, ठेवीदार, कर्जदार आणि ग्राहकांना सुशिक्षित आणि साक्षर बनविण्याचे काम जाणीवपूर्वक करणे, अत्यंत गरजेचे आहे.

श्री. अविनाश जोशी,

निवृत्त अधिकारी, भारतीय रिझर्व्ह बँक,

व्यवस्थापक मंडळ सदस्य, वाई अर्बन बँक.

संपर्क – ९८१९३२९७५०

पान क्र. ३७ वरून

मनी लॉन्ड्रिंग : पतसंस्थांसाठी जागरुकता व सावधगिरी

व्यवहार हे कायदेशीर आहेत किंवा नाही? यासंदर्भात तपासणी करण्याची जबाबदारी ही बँकांची व पतसंस्थांची आहे. त्यामुळे केवळ आधार कार्ड किंवा पॅन कार्ड घेतले म्हणजे संस्थेची जबाबदारी संपली असे नाही.

बँकांमध्ये असे खाते उघडण्यापूर्वीच अँटी मनी लॉन्ड्रीग / ए एम एल सॉफ्टवेअरचा वापर करून अशा व्यक्तीने इतर कुठल्या बँकेमार्फत गैरव्यवहार केलेला आहे का? हे शोधूनच त्या व्यक्तीचे खाते उघडायचे किंवा नाही हे ठरवले जाते. या व्यतिरिक्तदेखील दैनंदिन व्यवहारात खात्यावर कुठल्याही प्रकारचे संशयित व्यवहार आढळल्यास त्वरित असे खाते गोठविले जाते. परंतु अशी यंत्रणा ही आपल्या पतसंस्थेमध्ये नसल्यामुळे अशा व्यवहारांना आळा घालणे हे आपल्याला शक्य होत नाही.

हा विषय पतसंस्थांसाठी दिवसेंदिवस अधिक अडचणीचा ठरणारा आहे. आजच कित्येक कोटी रुपये पतसंस्थांची प्रत्यक्ष चूक नसताना देखील बँकांमध्ये अडकले आहेत. अनेक संस्था या आमच्याकडे अशा घटना झाल्यानंतर मार्गदर्शनाकरिता येतात. यातून सुखरूप बाहेर पडण्याकरता कायदेशीर मार्ग जरी असले तरी देखील ते थोडे क्लिष्ट स्वरूपाचे व वेळ खाऊ असतात. थोडक्यात रोगापेक्षा इलाज कडक अशी अवस्था होऊ शकते. याकरिता संस्थांना आमचे कायम सांगणे असते की, प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर! याकरिता संस्थांनी सर्वात प्रथम अनोळखी व्यक्तीचे खाते उघडताना त्याचा उद्देश समजून घेतला पाहिजे. कोणतेही खाते उघडल्यानंतर त्यावरती होणाऱ्या व्यवहारांवरदेखील लक्ष ठेवले पाहिजे. याकरिता आपल्या शाखा स्तरावरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले पाहिजे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात AML policy तयार केली पाहिजे. आपल्या संस्थेतील प्रत्येक व्यवहार आपण तपासू शकतो. एवढी आपली यंत्रणा सक्षम केली पाहिजे, तरच आपली संस्था सुरक्षित राहील!

जय सहकार...!

श्री. मंगेश देहेडकर

Co-op trainer consultant

मो. नं. – ९९२१३ ०४८११

***

को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रगतीसाठी संचालकांची भूमिका महत्त्वाची

को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संचालकांनी संस्थेचा व्यवसाय वाढवण्यासाठी आणि संस्थेला प्रगतिपथावर नेण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागते. सहकार खात्याचे नियम आणि धोरणांचे पालन करणे हे सर्वात महत्त्वाचे आहे.

● **संचालकांची भूमिका आणि जबाबदाऱ्या –**

* **धोरण आणि उद्दिष्ट्ये निश्चित करणे :** संस्थेच्या सभासदांच्या हितासाठी आणि नियामकाच्या (सहकार विभाग) मार्गदर्शक तत्त्वांनुसार व्यवसायाच्या वाढीसाठी स्पष्ट धोरणे आणि उद्दिष्टे निश्चित करणे आणि त्यांचे काटेकोरपणे पालन करणे.

* **व्यवस्थापनाचे मार्गदर्शन आणि नियंत्रण :** दैनंदिन कामकाजासाठी योग्य व्यवस्थापन टीमची निवड करणे, त्यांच्या कामावर नियमित देखरेख ठेवणे ही संचालकांची जबाबदारी आहे. प्रशासन संस्थेच्या ध्येय-धोरणांनुसार आणि नियमांनुसार काम करत आहे की नाही यावर संचालक मंडळाने आणि पदाधिकाऱ्यांनी नियमित लक्ष ठेवावे.

श्री. व्यंकटेश कुळकर्णी

* **कायदेशीर आणि नियामक अनुपालन :** सहकार कायद्यांतर्गत असलेल्या सर्व नियमांचे आणि धोरणांचे योग्य पालन करणे आवश्यक आहे. यात वेळोवेळी होणारे बदल समजून घेणे आणि त्यानुसार संस्थेत बदल करणे महत्त्वाचे आहे.

* **जोखीम व्यवस्थापन :** संस्थेच्या व्यवसायात असलेल्या विविध प्रकारच्या धोक्यांचे (उदा. कर्जाची वसुली, बाजारातील बदल) मूल्यांकन करणे त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

* **सभासदांशी संवाद :** संस्थेच्या सभासदांशी नियमित संवाद साधणे, त्यांच्या गरजा व अपेक्षा समजून घेणे आणि त्यानुसार सेवा पुरवणे महत्त्वाचे आहे.

* **पारदर्शकता आणि जबाबदारी :** संस्थेच्या कारभारात पूर्ण पारदर्शकता ठेवणे आणि घेतलेल्या निर्णयांसाठी जबाबदार राहणे आवश्यक आहे.नियमितपणे संस्थेचे ऑडिट करणे आणि ऑडिटमधील त्रुटींचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवणे, त्या चुका पुन्हा होणार नाहीत याची दक्षता घेणे त्याचा अहवाल संचालक मंडळासमोर व सभासदांना सादर करणे महत्त्वाचे आहे.

* **दीर्घकालीन नियोजन :** संस्थेच्या भविष्याचा विचार करून दीर्घकालीन योजना तयार करणे, ज्यात व्यवसायाचा विस्तार, नवीन सेवा आणि तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश असावा. व्यवसाय यशस्विता योजना (Business Succession Plan), व्हिजन (Vision) आणि मिशन स्टेटमेंट (Mission Statement) तयार करून त्याची अंमलबजावणी करणे.

● **व्यवसायवाढीसाठी काय करावे –**

* **सभासद व ग्राहक संख्या वाढवणे :** अधिकाधिक लोकांना संस्थेशी जोडण्यासाठी आकर्षक योजना आणि सेवा सुरू करणे. ग्रामीण भागात आणि असंघटित क्षेत्रात सभासद नोंदणीसाठी विशेष प्रयत्न करणे. ग्राहक मेळावे, सभासद शिक्षण आणि प्रशिक्षण मेळावे घेणे, सभासदांनी दिलेल्या सूचना व सल्ले ऐकून ते प्रत्यक्षात अंमलबजावणीत आणणे.

* **ठेवी वाढवणे :** वेगवेगळ्या प्रकारच्या आकर्षक ठेव योजना (उदा. मुदत ठेव, आवर्ती ठेव) सुरू करणे आणि त्यावर योग्य व्याजदर देणे.सभासदांना त्यांच्या गरजेनुसार बचत करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

* **कर्ज वितरण :** सभासदांच्या गरजेनुसार आणि नियमकाच्या नियमांनुसार विविध प्रकारची कर्जे (उदा. कृषी कर्ज, व्यवसाय कर्ज, गृह कर्ज, वैयक्तिक कर्ज) वाटप करणे. कर्ज प्रक्रिया सुलभ आणि जलद करणे, सुटसुटीत दस्तऐवज वेळेत कर्ज पुरवठा करणे.

●**नवीन सेवा सुरू करणे :**

* **डिजिटल बँकिंग :** मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, UPI यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सभासदांना जलद आणि सोयीस्कर सेवा पुरवणे. यासाठी आवश्यक त्या बँकांसमवेत सेवा करार करणे, अल्प सेवाशुल्क घेऊन त्या सभासदांना व ग्राहकांना पुरवणे.

* **वित्तीय साक्षरता :** सभासदांसाठी वित्तीय साक्षरता कार्यक्रम

आयोजित करणे, ज्यामुळे त्यांना योग्य आर्थिक नियोजन आणि गुंतवणुकीची माहिती मिळेल. सायबर सुरक्षेचे धोके सभासद व ग्राहकांना अवगत करून त्यांचे प्रबोधन करणे.

● **इतर वित्तीय सेवा :** विमा उत्पादने, म्युच्युअल फंड इत्यादी सेवा पुरवण्याचा विचार करणे (सहकार विभागाच्या परवानगीनुसार), ज्यामुळे उत्पन्नात वाढ होईल.

* **तंत्रज्ञानाचा वापर :** संस्थेच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे,ज्यामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल आणि ग्राहक व सभासदांना चांगल्या सेवा देता येतील व सेवा खर्च कमी होईल.

* **प्रशिक्षण आणि विकास :** संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांसाठी नियमित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, ज्यामुळे त्यांची कौशल्ये आणि ज्ञान अद्ययावत राहतील आणि त्यातून चांगली ग्राहक सेवा देता येईल व कामकाजात सुधारणा होतील.

* **सहभागी दृष्टिकोन :** संस्थेच्या निर्णयांमध्ये सभासदांचा सहभाग वाढवणे, त्यांच्या सूचना आणि मतांचा आदर करणे.

* **सामुदायिक विकास :** संस्थेच्या माध्यमातून सामाजिक आणि सामुदायिक विकास कार्यक्रमांमध्ये योगदान देणे, ज्यामुळे संस्थेची प्रतिमा समाजात चांगली राहील.

* **इतर संस्थांशी सहकार्य :** समान विचारधारा असलेल्या इतर सहकारी संस्थांशी आणि बँकांशी व्यावसायिक संबंध प्रस्थापित करणे, ज्यामुळे व्यवसायाच्या संधी वाढू शकतील.

* **सहकार खात्याच्या नियमांचे उल्लंघन –** नियमकाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि नियमांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे. विशेषत सीआरआर (CRR), एसएलआर (SLR) आणि भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy), एनपीए (NPA) नियंत्रित ठेवणे यांसारख्या नियमांचे काटेकोर पालन करावे.

* **गैरव्यवहार :** संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचार होऊ नये याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मजबूत अंतर्गत नियंत्रण प्रणाली (Internal Control System) तयार करावी. संस्थेच्या कामकाजात पारदर्शकता आणावी. सर्व मुद्द्यांवर संचालक मंडळात खुली चर्चा व विचारमंथन करावे. चांगल्या सूचनांचा आदर व अंमलबजावणी करावी.

* **अवास्तव व्याजदर –** ठेवी आणि कर्जांवर अवास्तव व्याजदर देणे टाळावे, ज्यामुळे संस्थेच्या आर्थिक स्थितीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मालमत्ता देयता व्यवस्थापन (Asset Liability Management) करावे.

* **राजकीय हस्तक्षेप –** संस्थेच्या कारभारात राजकीय आणि वैयक्तिक हस्तक्षेप टाळावा आणि व्यावसायिक दृष्टिकोन जपावा. वैयक्तिक हितापेक्षा संस्था हिताला महत्त्व द्यावे.

* **कर्ज वसुलीकडे दुर्लक्ष :** वाटप केलेल्या कर्जाची नियमितपणे वसुली करणे महत्त्वाचे आहे. कर्ज वसुलीसाठी प्रभावी नियंत्रण यंत्रणा तयार करावी आणि थकबाकीदारांवर योग्य व वेळीच कारवाई करावी. कर्ज खात्यावर देखरेख ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, वसुली कमिटीने त्यावर नियंत्रण ठेवावे. वेळोवेळी कर्ज पोर्टफोलिओचा आढावा घ्यावा.

* **सभासदांच्या व ग्राहकांच्या हिताकडे प्राधान्य :** केवळ व्यवसायवाढीवर लक्ष केंद्रित न करता सभासदांच्या व ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

* **असुरक्षित गुंतवणूक :** संस्थेच्या निधीची असुरक्षित ठिकाणी गुंतवणूक करणे टाळावे. गुंतवणुकीसाठी सहकार खात्याने व नियामक मंडळाने घालून दिलेल्या सुरक्षित मार्गांचा अवलंब करावा. गुंतवणूक करताना एकाच संस्थेत मोठ्या रकमेची गुंतवणूक करू नये, पूर्ण अभ्यास करून गुंतवणूक करावी आणि वेळोवेळी त्याचा आढावा घ्यावा.

● **पारदर्शकतेचा अभाव :** संस्थेच्या आर्थिक आणि व्यावसायिक घडामोडींमध्ये अपारदर्शकता ठेवू नये. सर्व माहिती सभासदांना व संचालक मंडळाला वेळोवेळी पुरवणे आवश्यक आहे. सहकार खात्याच्या धोरणानुसार सहकार खाते आणि नियामक मंडळ वेळोवेळी क्रेडिट सोसायट्यांसाठी विविध धोरणे आणि नियम लागू करते. संचालकांनी या धोरणांची माहिती ठेवणे आणि त्याचे योग्य पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

● **काही प्रमुख धोरणे :**

* **भांडवल पर्याप्तता :** संस्थेने तिच्या मालमत्तेच्या तुलनेत पुरेसे भांडवल राखणे आवश्यक आहे.

* **तरलता व्यवस्थापन :** संस्थेकडे दैनंदिन गरजांसाठी पुरेसा निधी असणे आवश्यक आहे (CRR आणि SLR चे पालन करणे). CASA (Current Account Savings Account), CD (Credit Deposit) Ratio वर नियंत्रण, NPA (Non-Performing Assets) वसुलीवर नियंत्रण.

* **कर्ज व्यवस्थापन :** कर्जाचे वर्गीकरण, तरतूद आणि वसुलीसाठी सहकार खात्याचे नियम पाळणे आवश्यक आहे.

* **गुंतवणूक धोरण :** संस्थेने तिच्या निधीची गुंतवणूक नियामक मंडळाने मान्यता दिलेल्या मार्गानेच करावी.

* **ग्राहक संरक्षण :** ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी सहकार खात्याने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे.

* **सायबर सुरक्षा :** डिजिटल बँकिंग सेवा पुरवत असल्यास सायबर सुरक्षेच्या मानकांचे पालन करणे. ग्राहक-सभासदांना जागृत करणे.

* **नो युवर कस्टमर** (KYC) **आणि अँटी-मनी लाँडरिंग** (AML) **मार्गदर्शक तत्त्वे :** या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

संचालकांनी जागरूक राहून, योग्य नियोजन करून आणि सहकार खात्याच्या नियमांनुसार कामकाज करून त्यांच्या को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा व्यवसाय यशस्वीपणे वाढवता येईल, सभासदांच्या हिताचे जतन करता येईल. मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून, संस्थेला अधिक मजबूत व यशस्वी बनवू शकता.

श्री. व्यंकटेश कुळकर्णी.
मो. : ९४०३० ८०७५१
प्रशिक्षण केंद्र प्रमुख
सहकार भारती प्रशिक्षण सहकारी
संस्था मर्यादित कराड, जि. सातारा

***

चार भिंतीच्या पलीकडील बँकिंग

तंत्रज्ञानप्रगती, बदलत्या ग्राहकांच्या गरजा आणि नियंत्रकाच्या आवश्यकतांमुळे बँकिंग क्षेत्रात गेल्या काही वर्षांत लक्षणीय बदल झाले आहेत. सन१९६० पूर्वी पारंपारिक बँकिंग होते. बँकिंग सेवा या बँकेच्या शाखा इमारतीमध्येच म्हणजेच चार भिंतीच्या आत दिल्या जात होत्या. ग्राहकाला कोणताही बँकिंग व्यवहार करण्यासाठी बँकेच्या व्यवसायाच्या वेळेतच समक्ष यावे लागत होते. सर्व व्यवहार हे रोखीनेच केले जात असत. नंतरच्या काळामध्ये व्यवहारांसाठी चेकचा वापर केला जाऊ लागला. एटीएमची ओळख झाल्यानंतर बँकिंग व्यवहार हे व्यवसायाच्या वेळेनंतर व बँकेच्या इमारतीबाहेर होऊ लागले. एटीएमने २४/७ रोख रक्कम उपलब्ध करून देऊन आणि भौतिक शाखा भेटींची आवश्यकता कमी करून बँकिंगमध्ये क्रांती घडवून आणली.

सन १९९० नंतर खऱ्या अर्थाने डिजिटल बँकिंगकडे वाटचाल सुरु झाली. इंटरनेट आणि मोबाइल तंत्रज्ञानाच्या आगमनाने ऑनलाइन आणि मोबाइल बँकिंग सेवा सक्षम झाल्या. घरात बसून ग्राहक त्यांच्या खात्यांचे व्यवहार करू लागले.डिजिटल पेमेंट सिस्टीम उदयास आल्याने ऑनलाइन व्यवहार सुलभ झाले. सन २००७ मध्ये आयफोन लॉंच झाल्यामुळे मोबाइल बँकिंग ॲप्सच्या विकासाला वेग आला. मोबाइल बँकिंग ॲप्समुळे ग्राहकांना त्यांचे खाते व्यवहार करणे, चेक जमा करणे आणि रस्त्यातून जाता जाता पेमेंट करणे शक्य झाले. संपर्क रहित पेमेंट आणि डिजिटल वॉलेट्स वाढत्या प्रमाणात लोकप्रिय झाले आहे.

श्री. गणेश निमकर

सन २०१० पासून ओपन बँकिंग नियमांमुळे तृतीय-पक्ष विकासकांना परस्पर संमतीने ग्राहक बँकिंग डेटामध्ये प्रवेश करणे शक्य झाले. फिनटेक कंपन्या उदयास आल्या, ज्यांनी पीअर-टू-पीअर कर्ज आणि डिजिटल वॉलेट्स सारख्या नाविन्यपूर्ण आर्थिक उत्पादने आणि सेवा देण्यास सुरुवात केली आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि बिटकॉइन सारख्या क्रिप्टोकरन्सीं यांनी लोकप्रियता मिळवायला सुरुवात केली आहे.एआय-संचालित चॅटबॉट्स आणि वैयक्तिक सेवांसह बँकिंग आणखी डिजिटल आणि ग्राहक-केंद्रित होत असून,ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवहारांमध्ये सुरक्षा आणि पारदर्शकता मोठ्या प्रमाणावर वाढू लागली आहे.

या सर्वच परिणाम म्हणजे पारंपारिक भौतिक चारभिंतीच्या आतील पारंपरिक बँकिंग युगाचा अस्त जवळ येत असून निओ आणि डिजिटल-बँकिंग युग सुरु होत आहे.

आता पारंपारिक बँकिंग संपुष्टात येत असताना, चार भिंती पलीकडील बँकिंग सुरु झाल्याने बँकिंग सेवांच्या बाबतीत ग्राहकांच्या अपेक्षा बदलत असून, भविष्यात बँकांना फिनटेक कंपन्यांच्या बरोबर भागीदारी करूननाविन्यपूर्ण सेवा देणे अत्यावश्यक होईल.डिजिटल बँकिंगमुळे तरुण ग्राहक आकर्षित करणे हे बँकांपुढे मोठे आव्हान आहे. कोणत्याही देशांमध्ये तरुण लोकसंख्येचे प्रमाण जास्त असेल तर त्या देशामध्ये डिजिटल सेवा स्वीकृती प्रमाण देखील अधिक असते. भारतामध्ये तरुण लोकसंख्या प्रमाण अधिक आहे मात्र अचूक आकडेवारी उपलब्ध नसली तरीएका सर्वेक्षणानुसार भारतातील सरासरी अंदाजे वय २८.८ वर्षे असून, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-5(NFHS- 5)) नुसार ३० वर्षापेक्षा कमी वय असणारी लोकसंख्या जवळ जवळ ५२% आहे. यावरूनच भारताच्या लोकसंख्येपैकी अर्ध्याहून अधिक भाग तरुणाईचा आहे हेच दिसून येते. बँकिंग क्षेत्रापेक्षा कॅपिटल व सोने मार्केट, म्युच्युअल फंड गुंतवणुकीकडे तरुणाईचा अधिक कल असल्याचे यापूर्वीचे अनेक आकडेवारीवरून सिद्ध झाले आहे. बँकिंग क्षेत्रात तरुणाई आकर्षित होत असली तरी, त्या प्रमाणात बँकिंग क्षेत्रातील पारंपारिक गुंतवणुक व कर्ज व्यवहारापासून दुरावत चालली आहे हे देखील नाकारून चालणार नाही.

एका सर्वेक्षणानुसार भारतात जानेवारी २०२५ अखेर ५५.३०% लोक इंटरनेट वापरतात असे दिसून आले असून, मार्च २०१४ मध्ये हे प्रमाण १३.५% होते याचा अर्थ भारतात जवळ जवळ ८० कोटी पेक्षा अधिक लोक इंटरनेट वापरत आहेत. आजकाल व्हॉट्सॲप वापरकर्ते देखील दिवसागणिक वाढत असून, जुलै २०२२ पर्यंत भारतात अंदाजे ५३.२० कोटी सक्रिय व्हॉट्सॲप वापरकर्ते होते, सध्या हि आकडेवारी देखील जवळ जवळ ८० कोटीपर्यंत पोहोचली आहे.

आजही वाढत्या डिजिटल स्वीकृती लक्षात घेता, तरुण ग्राहकांची एक महत्त्वपूर्ण टक्केवारी डिजिटल बँकिंग सेवा वापरत आहे.एकूण डिजिटल व्यवहारांमध्ये यू.पी.आय.चे योगदान मोठ्या प्रमाणात असून सद्यस्थितीत भारतामध्ये यू.पी.आय. चे दैनंदिन सरासरी व्यवहार संख्या ही ६७.५ कोटी असून साधारण दैनंदिन सरासरी व्यवहार रक्कम रुपये ७५००० कोटी पर्यंत आहे. यापुढे प्रत्येक बँकेने संपूर्ण डिजिटल व्यवहारांमध्ये आपले बँकेचे सद्यस्थितीत नेमके स्थान कोठे आहे? तसेच यातील आपले योगदान वाढवण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे याचा वारंवार आढावा घेऊन आपल्याकडे तरुणाई येण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

तरुण लोकसंख्येला बँकिंग क्षेत्रात आकृष्ट करण्यासाठी विविध सेवां द्वारे संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. यासाठी केवळ तरुण ग्राहक असून चालणार नाहीत तर या आव्हानात्मक कामासाठी बँकिंग समवेत डिजिटल तंत्रज्ञानाची माहिती व अनुभव असणारे तरुण कर्मचाऱ्यांचे प्रमाण देखील वाढणे आवश्यक आहे.बँकिंग उद्योग जसजसा विकसित होत जाईल तसतसे आणखीन आधुनिक तंत्रज्ञान आल्याने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) संचालित सेवा अधिकाधिक प्रचलित होतील. यामुळे कर्मचाऱ्यांचे कार्यक्षमतेत वाढ होऊन ग्राहकांचे अधिक समाधान होईल.

आज फिजिकल बँकिंग कडून डिजिटल चा प्रवास फार वेगाने सुरु आहे. आज जागतिक स्तरावर 'निओ-बँकिंगचा' उदय झाला असून वित्तीय सेवांमध्ये

पान क्र. ४४ वर

पतसंस्था व बँकिंग क्षेत्रातील क्रांती : AI आणि ML चे युग

सहकारी पतसंस्था व बँकेत आजही आपण CBS प्रणालीमधील अडचणी दूर करण्याचा व ती अद्ययावत करण्याकरिता प्रयत्न करीत आहोत, असे असताना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि मशीन लर्निंग (ML) असे तंत्रज्ञान बँकिंग क्षेत्रात वेगाने शिरकाव करून ग्राहकांना आधुनिक बँकिंगकडे घेऊन जात आहे. ग्राहकांच्या बँकेकडून असलेल्या अपेक्षेपेक्षा अधिक सोपी थोडक्यात हायपर-पर्सनलाइज्ड बँकिंगचा अनुभव हे तंत्रज्ञान ग्राहकांना करून देत आहेत, सहकारात आपल्याला या तंत्रज्ञानाचा विचार एवढ्या लवकर करण्याची गरज आहे का? तर याचे उत्तर निश्चितच हो असे आहे. परंतु ते अधिक विस्तृतरीत्या समजावून घेण्याआधी आपण आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि मशीन लर्निंग (ML) नेमके काय आहे ते समजून घेऊयात.

AI म्हणजे यंत्रांना किंवा संगणकांना मानवी बुद्धिमत्तेची नक्कल करण्याची क्षमता देणे, ज्यामुळे ती शिकू शकतील, समस्या सोडवू शकतील आणि निर्णय घेऊ शकतील. उदा. चेस खेळणारा संगणक किंवा ग्राहकांना उत्तर देणारा चॅटबॉट किंवा यांत्रिक call प्रणाली हे AI चे भाग आहेत. याउलट, ML हे AI चे एक उपक्षेत्र आहे, ज्यात यंत्रे डेटावरून शिकतात आणि स्वतःची कार्यक्षमता सुधारतात, जसे एखाद्या लहान मुलाला आपण विविध गोष्टी दाखवून किंवा सांगून प्रश्न विचारून शिकवतो. त्याचप्रमाणे यासाठी मशीनला प्रत्येक वेळी स्पष्टपणे प्रोग्राम करण्याची गरज नसते. आपण YouTube वर किंवा Netflix वर व्हिडिओ पाहताना आपल्याला आपण जे व्हिडिओ पाहतो, त्याच प्रकारचे इतर व्हिडिओ आपल्याला सुचवले जातात, ते ML मुळेच शक्य होते.

श्री. मंगेश देहेडकर

पतसंस्था किंवा बँकिंग संदर्भात आपण AI आणि ML विषयी चर्चा करू, AI आणि ML चा सर्वात मोठा फायदा म्हणजे ग्राहक अनुभव सुधारणे. कल्पना करा, तुम्हाला रात्री दोन वाजता तुमच्या खात्याविषयी माहिती हवी आहे किंवा एखाद्या कर्जाबद्दल विचारायचे आहे. येथेच चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट्स मदतीला येतात. हे AI-आधारित रोबोट २४/७ उपलब्ध असतात, ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरे देतात, मूलभूत व्यवहार करतात आणि ग्राहकांना आवश्यक माहिती पुरवतात. यामुळे ग्राहकांचा वेळ वाचतो, त्याला त्याच्या वेळेनुसार बँकिंग सुविधा मिळतात आणि बँक किंवा पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होतो.

आज प्रत्येक ग्राहकाला आपल्या वेळेत व बँकेने योग्य अशी सेवा सुचविणे अपेक्षित असते. या तंत्रज्ञानामुळे वैयक्तिकृत सेवा देणेही शक्य होते. ML अल्गोरिदम्स तुमच्या व्यवहारांचा, बचतीच्या सवयींचा आणि गरजांचा अभ्यास करतात. या अभ्यासातून, तुम्हाला कोणत्या प्रकारच्या कर्जाची गरज आहे, कोणती गुंतवणूक योजना तुमच्यासाठी योग्य आहे किंवा कोणती विमा पॉलिसी तुमच्या कुटुंबासाठी फायदेशीर ठरू शकते, हे अचूकपणे सुचवले जाते. याचा परिणाम म्हणून, कर्ज प्रक्रिया अत्यंत वेगाने होते. ML अल्गोरिदम्स कर्ज अर्जदारांच्या मोठ्या डेटाचे विश्लेषण करून त्यांची क्रेडिट पात्रता काही मिनिटांत तपासू शकतात, ज्यामुळे कर्ज मंजुरीची प्रक्रिया खूप जलद होते आणि लोकांना वेळेवर निधी मिळू शकतो. शिवाय वेगाने प्रक्रिया करीत असताना चुकीचा कर्जदार संस्थेत प्रवेश करीत नाही आणि संस्था/बँकदेखील सुरक्षित राहते.

संस्थेमध्ये / बँकेमध्ये अनेक कामे अशी असतात जी वारंवार करावी लागतात, ज्याला आपण वर्क डुप्लिकेशन असे म्हणतो. यामध्ये कर्मचाऱ्यांचा अधिक वेळ जातो. ग्राहक सेवेबरोबरच, AI आणि ML वित्तीय संस्थांच्या कार्यक्षमतेत आणि सुरक्षिततेत लक्षणीय वाढ करतात. अनेक नियमित आणि पुनरावृत्तीची कामे, जसे की डेटा एंट्री, अहवाल तयार करणे, खात्यांची पडताळणी किंवा देयके तपासणे, AI मुळे स्वयंचलित करता येतात. यामुळे कर्मचाऱ्यांना अधिक महत्त्वाच्या आणि व्यवसायवाढीच्या, ग्राहकांबरोबरचे व्यावसायिक संबंध (PR) वाढविण्याच्या कामांवर लक्ष केंद्रित करता येते, जेणेकरून त्यांची क्षमता अधिक चांगल्या प्रकारे वापरली जाते. PR हा बँकिंग व्यवस्थेत अतिशय महत्त्वाचा भाग मानला जातो. आज आपण सर्व सुविधा असतानादेखील सरकारी बँकांबद्दल ग्राहकाचे मत फारसे चांगले नाही असेच पाहतो. याचे कारण म्हणजे तेथील कर्मचारी त्यांच्या दैनंदिन ऑपरेशनल कामातच एवढे अडकून पडतात की, प्रत्येक ग्राहकाला वैयक्तिक सेवा पुरवणे त्यांना शक्य होत नाही. परिणामी आज खासगी बँका या सरकारी बँकांपेक्षा अधिक प्रभावी ठरत आहेत.

बँकिंग हे प्रमुख आर्थिक क्षेत्र असल्याने यामध्ये ग्राहक व बँक या दोघांचीही फसवणूक होण्याची शक्यता असते. आज ज्या प्रमाणात लोक बँकिंग व्यवहार करत आहेत व सातत्याने या व्यवहारांची संख्या वाढत आहे, त्यानुसार व्यवहार करण्याकरिताच मनुष्यबळ अपुरे पडताना दिसते. मग त्या व्यवहारातील फसवणूक ओळखणे, हे अतिशय कठीण कार्य झाले आहे. परंतु AI चा बँकिंगमधील वापर पाहिल्यास फसवणूक ओळखणे (Fraud Detection) हे AI आणि MLचे एक महत्त्वाचे कार्य आहे. हे तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहारांच्या डेटाचे विश्लेषण करते आणि संशयास्पद किंवा अनपेक्षित नमुने शोधते. उदाहरणार्थ, तुमच्या खात्यावरून अचानक परदेशात मोठा व्यवहार झाल्यास, अचानक नियमित

होणाऱ्या रकमेच्या व्यवहारापेक्षा कमी किंवा अधिक रकमेचे व्यवहार होणे, एखाद्या विशिष्ट बँक खात्यात अचानक अनेक छोट्या छोट्या किंवा एकच मोठी रक्कम ट्रान्स्फर होणे, अनेक निरनिराळ्या देशातून, राज्यातून, वेगवेगळ्या व्यक्तींमार्फत खात्यावर पैसे जमा होणे, अनेक दिवसांपासून ज्या खात्यावर व्यवहार नाहीत, अशा खात्यांवर अचानक मोठ्या प्रमाणात व्यवहार सुरू होणे. AI ते लगेच ओळखू शकते आणि तुम्हाला सतर्क करू शकते. यामुळे बँकांना आणि पतसंस्थांना संभाव्य आर्थिक नुकसानीपासून वाचण्यास खूप मदत होते.

बँकिंग मधील AIच्या वाढत्या वापरामुळे येत्या काही वर्षांतच ग्राहक सेवेच्या व्याख्याच बदलून जातील. पुढील काही वर्षात AI आणि ML वित्तीय क्षेत्रात आणखी खोलवर रुजतील. आपण हायपर पर्सनलायझेशनच्या दिशेने वाटचाल करत आहोत. जिथे प्रत्येक ग्राहकासाठी अत्यंत वैयक्तीकृत आणि भावनिक स्तरावर जोडलेली सेवा दिली जाईल. ग्राहकांची आर्थिक उद्दिष्टे आणि सवयी यानुसार ग्राहकांना प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन मिळेल. Predictive Analytics ज्याला आपण भविष्यवेधी विश्लेषण असे म्हणू शकतो. ते वाढेल, म्हणजे AI भविष्यातील आर्थिक अडचणी किंवा बाजारातील चढ-उतार यांचा अंदाज अधिक अचूकपणे घेईल, ज्यामुळे संस्थांना वेळेवर उपाययोजना करता येतील आणि मोठे नुकसान टाळता येईल. याव्यतिरिक्त, AI सायबर सुरक्षांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. सायबर हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी आणि डेटाची गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी ते एक अभेद्य कवच म्हणून काम करेल.

ग्राहक सेवा व सुरक्षा यांच्या इतकेच व्यवसाय वाढ हा भागदेखील अत्यंत महत्त्वाचा आहे. कोणत्या प्रॉडक्टकरिता कोणत्या ग्राहकाला आपण संपर्क केला पाहिजे, हे आपल्याला सहज सुचवू शकेल. उदाहरणार्थ ज्येष्ठ नागरिकांकरिता एखादी योजना असेल व त्याकरिता आपण वर्तमानपत्रात जाहिरात दिल्यास ती जाहिरात सर्वच वयोगटातील व्यक्ती वाचतील. म्हणजेच ज्यांच्यासाठी ती योजना नाही किंवा जे त्या योजनेसाठी पात्र नाहीत. अशांपर्यंत ती योजना जास्त प्रमाणात जाईल व ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अपेक्षित योजना पोहोचेलच असे नाही. याव्यतिरिक्त किती ज्येष्ठ नागरिकांपर्यंत आपली योजना पोहोचली आहे, याचा कोणताही डेटा आपल्याकडे नसेल. म्हणजेच जाहिरातीवर होणारा आपला खर्च व त्यामागील आपले उद्दिष्ट पूर्ण होईलच याची शाश्वती नसते. परंतु व्यवसाय वाढीमध्ये AI चा वापर केल्यास अपेक्षित ग्राहकांपर्यंत कमी खर्चात पोहोचता येईल.

अर्थात, AI आणि ML स्वीकारताना काही आव्हाने आहेत. डेटाची गोपनीयता आणि त्याचा गैरवापर टाळणे हे महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाचा खर्च सुरुवातीला जास्त असू शकतो आणि कर्मचाऱ्यांचे या नवीन तंत्रज्ञानासाठी प्रशिक्षण करणे आवश्यक आहे. मात्र, योग्य नियोजन आणि टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केल्यास, पतसंस्था आणि बँका या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करू शकतात.

थोडक्यात, AI आणि ML हे केवळ तांत्रिक बदल नाहीत, तर ते वित्तीय संस्थांसाठी एक नवीन युगाची सुरुवात आहेत. यामुळे केवळ संस्थांच्या कार्यक्षमतेत सुधारणा होणार नाही, तर ग्राहकांशी असलेले संबंध अधिक दृढ होतील आणि त्यांना अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि वैयक्तिकृत वित्तीय सेवा मिळतील. त्यामुळे, AI आणि ML हे पतसंस्था आणि बँकांच्या भविष्यातील यशासाठी महत्त्वाचे घटक बनतील यात शंका नाही.

श्री. मंगेश देहेडकर
मोबा. – ९९२१३ ०४८११
Co-op trainer consultant ****

पान क्र. ४२ वरून

चार भिंतीच्या पलीकडील बँकिंग

डिजिटल क्रांती झाली आहे.

निओ बँकिंग म्हणजे डिजिटल बँकिंग सेवा (Digital Banking Service) किंवा शाखा नसलेली बँक (Branchless Bank). होय. निओ बँकांमध्ये प्रत्यक्ष शाखा (physical branches) नसतात, त्या सर्व सेवा डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे, जसे की मोबाइल ॲप्स आणि वेबसाइट्सद्वारे दिल्या जातात. या बँका तंत्रज्ञानाचा (technology) वापर करून ग्राहकांना चोवीस तास बँकिंग सेवा पुरवतात. हा बदल ग्राहकांच्या बदलत्या गरजा पुरवण्यास खूप उपयोगी पडताना दिसत आहे. पश्चिम ऑस्ट्रेलियातील 'बँक वेस्टचे'९७% व्यवहार डिजिटल झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या ४५ शाखा बंद केल्या असून, सर्वच ग्राहकांना केवळ डिजिटल सेवा देण्यास सुरुवात केली आहे. सन२०१७ पासून जागतिक स्तरावर बँक शाखा व ए.टी.एम.संख्या मोठ्या प्रमाणवर कमी होताना दिसत आहेत.

डिजिटल बँकिंगकडे होणारे स्थलांतर हे तरुणाईसाठी सोयीचे व सुकर असले तरी, विशेषतः वृद्ध आणि डिजिटल साक्षरता नसलेल्या अशा ग्राहक वर्गांसाठी सुलभता नसून त्यांचा या सेवांमध्ये समावेशकतेबद्दल अडचणी येऊ शकतात. हि अडचण असली तरी यापुढे तंत्रज्ञानावर आधारित बँकिंग हि ग्राहकांची नव्हे तर बँकांची देखील अपरिहार्यता राहणार आहे. पूर्वी कोणत्याही बँकेचे मोठेपण हे त्या बँकेचा कार्यक्षेत्र विस्तार आणि शाखा विस्तार यावर ठरवले जायचे एवढेच नव्हे तर त्या बँकेच्या स्व-मालकीच्या इमारती किती आहेत या बाबी देखील अभ्यासल्या जात होत्या.

आजही विशेषत: नागरी बँका /पतसंस्था तसेच इतर आर्थिक संस्था चालकांना शाखा विस्तार आणि स्व-मालकीच्या इमारती बाबत पूर्वी इतकेच आकर्षण असून, आपल्याला खरोखरच किती जागातसेच शाखा आवश्यक आहेत आणि आपण स्व-मालकीची अनुत्पादकस्थावर गुंतवणूक केली आहे किंवा दरमहा भाडेतत्वावरील जागेसाठी किती अनावश्यक खर्च करीत आहोत याचे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. यापुढे तंत्रज्ञाना मध्ये भांडवली तसेच महसुली खर्चात मोठी वाढ होणार असल्याने या प्रकारची अनुत्पादक गुंतवणूक किंवा अनावश्यक खर्च आपल्या बँकेला किंवा पतसंस्थेला परवडेल का? याचा देखील गांभीर्याने विचार करणेची गरज आहे. बँका व पतसंस्थांनी तंत्रज्ञान गुंतवणुकीबाबतीत या क्षेत्रातील माहितगार व अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन घेऊन तसेच साकल्याने विचार करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. यापुढे इमारतीच्या दगड मातीच्या चार भिंतींपेक्षा संगणक कार्यप्रणालीच्या सुरक्षा भिंती (security wall) याच अधिक सुरक्षित कशा असतील याचा विचार करून जो कृती करेल तोच या स्पर्धेत भविष्यात आपले अस्तित्व टिकवेल यात मात्र कोणताही संदेह राहिलेला नाही.

श्री. गणेश निमकर
मो. ९८२२५६८५५०
***

अर्थव्यवस्थेची दिशा ठरविणारे राष्ट्रीय सहकार धोरण

'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' हे वर्ष २०४७ मध्ये विकसित भारत बनण्याच्या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे. या धोरणामुळे सहकार क्षेत्राच्या क्षमतेचा पूर्ण वापर देशासाठी होणार आहे. यातून सहकार क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत आधारस्तंभ बनल्याशिवाय राहाणार नाही.

'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' हे वर्ष २०४७ मध्ये विकसित भारत बनण्याच्या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे. या धोरणामुळे सहकार क्षेत्राच्या क्षमतेचा पूर्ण वापर देशासाठी होणार आहे. यातून सहकार क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत आधारस्तंभ बनणार आहे.

※ महाराष्ट्र 'सहकाराची जन्मभूमी' –

महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्र राज्य हे 'सहकार क्षेत्राची जन्मभूमी' म्हणून ओळखली जाते. सहकारी संस्थांचे सर्वांत मोठे जाळे हे महाराष्ट्रात पसरलेले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात कायम सहकार क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलली आहेत. त्यामुळे केंद्र सरकारच्या सहकार धोरणात महाराष्ट्राची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या दिशेने वाटचाल करताना केंद्र सरकारने पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य निश्चित केले आहे. हे लक्ष्य गाठताना सहकार क्षेत्राचा वाटा निर्णायक ठरणार आहे. 'सहकारातून समृद्धीकडे' या योजनेनुसार सहकारी क्षेत्राच्या दिर्घकालीन विकासासाठी अनुकूल वातावरणनिर्मितीसाठी 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' तयार करण्यात आले. देशात सुमारे ८.५ लाख सहकारी संस्था, त्यात ३० कोटींहून अधिक सदस्य कार्यरत आहेत. या क्षेत्राला फक्त आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित करता येत नाही. सामाजिक परिवर्तन, महिला सक्षमीकरण, आणि ग्रामीण विकासालाही या क्षेत्रातून हातभार लागतो. नवी दिल्लीतील 'अटल अक्षय ऊर्जाभवन' येथे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते नव्या धोरणाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. भारत सरकारने सादर केलेल्या 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' नुसार सहकार क्षेत्रातून एक ट्रिलियन डॉलरचे योगदान अपेक्षित आहे.

सहकारी संस्थांसाठीचे धोरण वर्ष २००२ मध्ये अटलबिहारी बाजपेयी पंतप्रधान असताना जाहीर झाले. त्यानंतर एकोणीस वर्षांनी या क्षेत्राचे महत्त्व अचूक ओळखत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ६ जुलै २०२१ मध्ये स्वतंत्र केंद्रीय सहकार मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे या खात्याची धुरा सोपवण्यात आली. ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्राचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राशी भारतातील सुमारे ३० कोटी जनता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या अवलंबून आहे. गेल्या दोन दशकांत आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे जग आमूलाग्र बदलले आहे. कृषी क्षेत्रातील बाजारपेठा विस्तारल्या आहेत. आव्हानाचे स्वरूपही बदलले आहे. या बदलत्या परिस्थितीचा वेध घेत देशातील सहकारी संस्थांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम राहाणे गरजेचे आहे. हीच दूरदृष्टी ठेवत 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' आखण्यात आले आहे.

६ जुलै २०२१ रोजी सहकार मंत्रालयाची निर्मिती झाल्यानंतर एका वर्षाच्या आत केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी नवे राष्ट्रीय धोरण तयार करण्याच्या दिशेने तयारी सुरू केली. २ सप्टेंबर २०२२ रोजी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षततेखाली ४८ सदस्यांची राष्ट्रीय समिती तयार करण्यात आली. डिसेंबर २०२३ मध्ये या समितीने 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५'चा पहिला मसुदा तयार केला. या समितीकडून सहकार क्षेत्रातले विविध अभ्यासक, तज्ज्ञ आणि अधिकारी यांच्यासोबत एकूण १७ बैठका घेण्यात आल्या. नोव्हेंबर २०२३ मध्ये गुरुग्राम, अहमदाबाद, बेंगलूरु आणि पाटणा या चार ठिकाणी कार्यशाळांचे

आयोजन करण्यात आले. तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर आणि नाबार्डचे अध्यक्ष यांच्यासोबत सल्लामसलत करुन त्यांच्या सूचनांचे पालन करण्यात आले. या सर्व तज्ज्ञ मंडळीकडून ६४८ सूचना प्राप्त झाल्या. त्यानुसार मसुद्यात योग्य ते बदल करण्यात आले.

※ सहकार धोरणाचा फायदा – सहकार धोरण निश्चित करताना केंद्र सरकारकडून राज्य पातळीवर व्यापक प्रयत्न केले जात आहेत. याचाच भाग म्हणजे भारतातल्या प्रत्येक गावात किमान एक सहकारी संस्था स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन सुमारे ४.१९ ट्रिलियन डॉलर आहे. यामध्ये सहकार क्षेत्राचा वाटा अंदाजे ३ ते ४ टक्के (१६७.६ अब्ज डॉलर) आहे. हा वाटा सुमारे तिप्पट वाढवण्याचे लक्ष्य 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' च्या माध्यमातून ठेवण्यात आले आहे. हे ध्येय गाठण्यासाठी १० वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ज्यासाठी सहा मूलभूत गोष्टींचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या कृती आराखड्यात १६ ठोस उद्दिष्टे आणि ८२ कृतिकार्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. ज्या मुद्द्यांवर सहकार क्षेत्र एक ट्रिलियन डॉलरचे लक्ष्य गाठणार आहे, त्यामध्ये सहकार क्षेत्राचा मूलभूत पाया मजबूत करणे, सहकार क्षेत्रातील सक्रियता आणि गतिशीलता वाढवणे, सहकारी संस्थांना भविष्यासाठी सक्षम बनवणे, समाजातील सर्व घटकांना सहकारक्षेत्राशी जोडणे, या क्षेत्राचा नव्या क्षेत्रांमध्ये विस्तार करणे आणि सहकार वृद्धीसाठी नव्या पिढीला घडवणे या सहा तत्त्वांचा समावेश आहे. यासाठी वर्ष २०३५ पर्यंत सहकारी संस्थाचे जाळे प्रत्येक गावात पोचवत ५० कोटी सदस्यसंख्या करण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे. याशिवाय सहकार संस्थांशी संबंधित सदस्यांची ३० टक्क्यांनी वाढवणे, सहकारी बँकांना बळकटी देत त्यांची ग्राहकसंख्या अडीचपट वाढवणे आणि प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील किमान एक व्यक्ती सहकारी संस्थेचा सदस्य असेल असे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' अंतर्गत केंद्र सरकारने सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी, कामकाजातील पारदर्शकता वाढवण्यासाठी नियोजनबद्ध उपक्रम आखले आहेत. यामध्ये 'राष्ट्रीय सहकारी डिजिटल भरती मंडळ' स्थापन करून सहकार संस्थांमधील भरतीप्रक्रिया पारदर्शक केली जाणार आहे. सहकारी संस्थांमध्ये काम करण्यासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याचा मार्ग यामुळे खुला होणार आहे. 'राष्ट्रीय सहकारी लेखा व लेखापरीक्षण मंडळ' हे सहकारी संस्थांच्या आर्थिक शिस्तीवर लक्ष ठेवणार आहे. सहकारी संस्थांना वित्तपुरवठा करण्यासाठी वित्तसंस्थांची उभारणी केली जाणार आहे. 'राष्ट्रीय सहकारी न्यायाधिकरण' स्थापल्याने सहकारी संस्थांच्या वादांचे त्वरित व न्याय्य निवारण शक्य होईल, ज्यामुळे संस्था अधिक सक्षम व स्वयंपूर्ण बनतील. याशिवाय प्रत्येक पंचायतमध्ये एक प्राथमिक कृषिसंस्था, प्रत्येक जिल्ह्यात एक मॉडेल सहकारी गाव, प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, प्रत्येक शहरी भागात एक शहरी सहकारी बँक यांची स्थापना केली जाणार आहे. सहकारी क्षेत्रातील संस्थांना बळकटी देतानाच या संस्थांमध्ये महत्त्वाच्या कायदेशीर सुधारणा राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ अंतर्गत करण्यात आल्या आहेत. सहकारी संस्थांमध्ये घराणेशाहीचा कारभार ही समस्या राहिली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी निवडणुकीत पारदर्शकता आणि प्रशासकीय पदांवरील पात्रतेचे नियम अधिक स्पष्ट करण्यात आले आहेत.

प्राथमिक कृषी पतसंस्था या महत्वाच्या सहकारी संस्थांच्या कारभारातील पारदर्शकतेसाठी या संस्थांचे डिजिटल सक्षमीकरण करणे नितांत गरजेचे होते. प्राथमिक कृषिसंस्थांचे व्यवहार डिजिटल प्रणालीद्वारे होणार असल्यामुळे पारदर्शकता वाढणार आहे. सहकारी बँकांना आता 'बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट' अंतर्गत 'आरबीआय'च्या देखरेखीखाली आणले गेले आहे. यामुळे ठेवीदारांचा विश्वास वाढेल, गैरप्रकारांना आळा बसेल आणि बँकिंग व्यवस्थेत शिस्त येईल.

※ राष्ट्रीय सहकार धोरणाची वैशिष्ट्ये – या धोरणाच्या माध्यमातून देशातील ५० कोटी जनतेला सहकार क्षेत्राच्या कक्षेत आणण्याची केंद्र सरकारची योजना आहे. यामुळे पुढील १० वर्षांत देशाच्या राष्ट्रीय सकल उत्पादनात तीनपटींनी वाढ होणार आहे. यासाठी 'राष्ट्रीय टास्क फोर्स' स्थापना केला जाणार आहे.

सहकार खात्याला बळकटी मिळावी यासाठी केंद्राच्या विविध मंत्रालयांमध्ये समन्वयाचे धोरण तयार केले जाणार आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कागदविरहित नोंदणी कार्यालये, प्राथमिक कृषिसंस्थांचे डिजिटायझेशन, सहकारी बँकांसाठी आयटी प्रणाली, रोजगार प्लॅटफॉर्म्स इत्यादी उपक्रम राबवले जाणार आहेत. 'त्रिभुवन सहकारी विद्यापीठ', राष्ट्रीय सहकारी बँक, शहरी सहकारी बँकांसाठी अपेक्स संस्था, ग्रामीण सहकारी बँकांसाठी SSE या माध्यमातून सहकारी संस्थांचे जाळे प्रत्येक गावात पोचवण्यात येणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी केवळ केंद्र पातळीवर मर्यादित न राहता राज्य पातळीवरही प्रभावीपणे केली जाणार आहे. त्यामुळे ३१ जानेवारी २०२६ पर्यंत प्रत्येक राज्याने स्थानिक गरजांनुसार स्वतःचे सहकार धोरण तयार करणे बंधनकारक असणार आहे.

'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' हे वर्ष २०४७ मध्ये विकसित भारत बनण्याच्या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे. या धोरणामुळे सहकार क्षेत्राच्या क्षमतेचा पूर्ण वापर देशासाठी होणार आहे. यातून सहकार क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत आधारस्तंभ बनणार आहे.

त्रिभुवन सहकारी विद्यापीठ कार्यकारी मंडळावर सतीश मराठे

सहकार भारतीचे संस्थापक सदस्य, माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांची नुकतीच गुजरातमधील त्रिभुवन सहकारी विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळावर नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. ही निवड तीन वर्षासाठी असणार आहे.

केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या वतीने ही निवड करण्यात आली आहे. नवनियुक्त मंडळात एकूण २५ सदस्य असणार आहेत. त्यामध्ये ४ सदस्य नामनिर्देशित असणार आहेत. देशातील सहकार क्षेत्राच्या सर्व स्वरुपाच्या संस्थासाठी प्रशिक्षण, शिक्षण, संशोधन पदवी, पदविका, अभ्यासक्रम असे अनेकविध उपक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहेत.

सहकारी संस्थांच्या खर्चाचे व्यवस्थापन

सहकारी संस्थांनी विशेषतः नागरी सहकारी बँका व पतसंस्थांनी कामकाज करताना कराव्या लागणाऱ्या प्रशासनिक खर्चाचे नियोजन व व्यवस्थापन करणे ही बाब आवश्यक असते. सहकारी संस्थांनी केलेला खर्च हा प्रामुख्याने त्यांच्या उपविधीतील उद्देशांची पूर्तता करण्यासाठीच केला पाहिजे. ही प्राथमिक व महत्त्वाची बाब लक्षात ठेवून खर्चाचे नियोजन व व्यवस्थापन केले पाहिजे. नागरी सहकारी बँकांसाठी लागू असलेल्या लेखापरीक्षण वर्गवारीच्या CAMELS RATING प्रमाणे प्रशासनिक खर्चाची मर्यादा ही १% असून राज्यातील पतसंस्थांसाठीचे नियामक मंडळाचे परिपत्रक दिनांक १०/०५/२०१९ अन्वये ही मर्यादा २% निश्चित केली आहे. नियामक मंडळास असा अधिकार हा सहकार कायद्याच्या कलम १४४-८अ प्रमाणे प्राप्त झालेला आहे. वरील १% व २% ह्या मर्यादांची परिगणना करताना हे प्रमाण खेळत्या भांडवलाच्या प्रमाणात असून संस्थेच्या उत्पन्नाच्या प्रमाणात नाही म्हणजेच संस्थेचा व्यवसाय जेवढा जास्त असेल तेवढे खेळते भांडवल अधिक व खर्च मर्यादाही जादा असते. ही बाब या ठिकाणी लक्षात घ्यावी. त्यामुळे संस्थेचे उत्पन्न वाढविले म्हणजे अशा खर्चाची मर्यादाही वाढेल असे नाही.

आता आपण प्रशासनिक खर्चात कशाचा समावेश होतो हे पाहू :-

* **आस्थापना खर्च –** पगार, बोनस, भत्ते, भविष्य निर्वाह निधी, सेवानिवृत्ती लाभ इ.

* **प्रशासनिक खर्च –** प्रिंटिंग व स्टेशनरी, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, संचालक मंडळ प्रवास व सभा भत्ते.

प्रचार व प्रसिद्धी खर्च, पोस्टेज, सभासमारंभ, भाडे, वीमा, कायदा फी, हिशेब तपासणी फी, प्रवास, इंधनखर्च, दुरूस्ती व देखभाल खर्च, वीज खर्च, निवडणूक खर्च तरतूद, सहकार शिक्षण व प्रशिक्षण खर्च/तरतूद, आयकराव्यतिरिक्त इतर कर इ.

(ठेवी व बाहेरील कर्जावरील व्याज, आयकर, थकव्याज तरतूद, उत्पादक व अनुत्पादक जिंदगीची तरतूद यांचा व्यवस्थापन खर्चात समावेश होत नाही.)

श्री. संतोष मानूरकर

सहकारी संस्थांची नफा क्षमता ही संस्थेस मिळत असलेल्या उत्पन्नाबरोबरच ती अशा उत्पन्नातून किती खर्च करते व प्राप्त ढोबळ नफ्यातून असा खर्च वजा जाता तिला निव्वळ नफा किती शिल्लक राहतो यावर अवलंबून असते. त्यासाठी उत्पन्न व खर्च यांचे नियोजन व व्यवस्थापन यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. उत्पन्नाचे नियोजन व व्यवस्थापन करताना उत्पन्नाची गळती (Leakage of income) होणार नाही याची काळजी घेण्याबरोबरच ठेवींवर दिलेले (देय) व्याज व वाटप कर्जावर प्राप्त व्याज अधिक गुंतवणुकीवरील व्याज यांच्यामध्ये योग्य तो दुरावा (Margin) संस्थेने राखल्यास संस्थेचे उत्पन्न योग्य व पुरेसे असेल. आता खर्चाच्या बाबतीत त्याचे नियोजन व व्यवस्थापन कसे करावे या बाबीवर आपण चर्चा करूया.

* **प्रशासनिक खर्चाचे व्यवस्थापन खालीलप्रमाणे करावे –**

१. अंदाजपत्रक तयार करणे :- बँकांनी/पतसंस्थांनी अनुक्रमे १% व २% ची मर्यादा राखण्यासाठी त्याची तयारी ही आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच केली पाहिजे. अन्यथा वर्षसमाप्तीनंतर आर्थिक पत्रके निश्चित केल्यानंतर खर्चाची मर्यादा ओलांडल्याची बाब लक्षात आल्यावर त्यावर कोणताही उपाय असत नाही. अंदाजपत्रकास मंजुरी हा जरी वार्षिक सभेच्या मंजुरीचा विषय असला तरी वर्षारंभी असे अंदाजपत्रक तयार करून संचालक मंडळाच्या मान्यतेने साधारण सभेच्या मंजुरीस अधीन राहून त्याप्रमाणे खर्च करावा व वार्षिक सभेत ही तेच अंदाजपत्रक सादर करून त्यास मंजुरी घ्यावी व कायद्यातील तरतुदीचे ही पालन करावे.

ज्याअर्थी, प्रशासनिक खर्चाची मर्यादा ही खेळत्या भांडवलावर आधारित आहे, त्याअर्थी संस्थांनी सर्वात प्रथम आपला आगामी वर्ष या संकल्पित ताळेबंद (Tentative Balance-Sheet) तयार करून साधारणपणे आपले खेळते भांडवल जास्तीत जास्त अचूकपणे निश्चित करण्याचा प्रयत्न करावा. त्यानंतर खेळत्या भांडवलाच्या २% येणारी रक्कम निश्चित केल्यास आपण कोणत्या बाबींवर किती खर्च करावा, याची जास्तीत जास्त अचूकपणे मांडणी करता येईल व वर्षभर वेळोवेळी त्याचा आढावा घेतल्यास नियामक मंडळाने घालून दिलेल्या मर्यादा उल्लंघनाचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

२. उद्येशविरहित, अनावश्यक खर्चांना प्रतिबंध :-

१. सहकारी संस्थांनी खर्च करताना खालील तत्त्वे पाळावीत.

संस्थेच्या उद्येगाशी संबंधित नसलेले खर्च करता कामा नये. ज्या खर्चामुळे संस्थेच्या उत्पन्नात कोणतीही भर पडणार नाही, असे खर्च करू नयेत.

वैयक्तिक खर्च हे संस्थेमध्ये टाकू नयेत. उदा. इंधन खर्च आवश्यकता नसल्यास केवळ अंदाजपत्रकीय तरतूद आहे म्हणून खर्च करू नये.

महाराष्ट्र शासनाचे सहकार विभागाने सहकार कायदा कलम ७९-अ अन्वये दि. २ मार्च २००० रोजी सहकारी संस्था व बँकांना निदेश दिले असून त्याप्रमाणे कोणत्याही सहकारी संस्थेने / बँकेने कोणत्याही व्यक्तीच्या

स्वागतानिमित्त, जन्मदिनानिमित अगर तत्सम कोणत्याही प्रयोजनानिमित्त संस्थेच्या/बँकेच्या नावाने महाराष्ट्र शासनाचे सहकार विभागाने सहकार कायदा कलम ७९-अ अन्वये दि, २ मार्च २००० रोजी सहकारी संस्था व बँकांना निदेश दिले असून त्याप्रमाणे कोणत्याही सहकारी संस्थेने/बँकेने कोणत्याही व्यक्तीच्या स्वागतानिमित्त, जन्मदिनानिमित अगर तत्सम कोणत्याही प्रयोजनानिमित्त संस्थेच्या/बँकेच्या नावाने वृत्तपत्रात, मासिकात अथवा नियतकालिकामध्ये जाहीरात देऊ नये. मात्र, संस्था स्वतःच्या व्यवसाय वृद्धीच्या दृष्टिकोनातून सहाय्य होईल अशा जाहिरातीवर प्रतिबंध नाही.

३. भांडवली खर्च हा महसुली खर्च म्हणून टाकू नये :-

वेबसाईट विकसन तसेच सॉफ्टवेअर खर्च यांसारखे खर्च त्यांचा कालावधी लक्षात घेऊन एका वर्षापेक्षा जादा कालावधीसाठी त्यांचा व्यवसायास उपयोग होणार असल्याने असे खर्च हे महसुली खर्च म्हणून नफा-तोटा खाती खर्ची न टाकता त्यांना 'भांडवली खर्च' समजून योग्य तो जमाखर्च करणे उचित असते. अन्यथा संस्थेला घालून दिलेली मर्यादा ही अशा खर्चामुळे ओलांडली जाऊ शकते.

४. तरतुदी :- Accounting Standared-29 प्रमाणे Provision means present obligation from a past event. संस्थांनी ज्या त्या वर्षातील आवश्यक त्या कायदेशीर देणी रकमांच्या तरतुदी आवश्यक त्या प्रमाणात केल्याच पाहिजेत. तरतूद न करणे किंवा आवश्यक तेवढी तरतूद न करणे या दोन्ही बाबी या सदर Accounting Standard चे उल्लंघन ठरते. कमी तरतूद केल्यामुळे किंवा अजिबात तरतूद न केल्यामुळे प्रशासनिक खर्चाची मर्यादा पाळल्याचे चित्र निर्माण न करता आवश्यक त्या तरतूदी केल्याच पाहिजेत. उदाहरणार्थ,

१. माहे मार्चच्या पगाराची तरतूद करून ही ताळेबंदात देयतेला दिसलीच पाहिजे, अशी तरतूद न केल्यास केवळ अकरा महिन्यांच्या पगाराचा खर्च चालू वर्षात दिसेल व आगामी वर्षात तो तेरा महिन्यांचा दिसेल.

२. निवडणूक खर्चाची तरतूद ही सहकारी नियम ४९-अ प्रमाणे प्रतिवर्षी करणे आवश्यक आहे. अन्यथा अशी तरतूद न केल्यास आगामी काळात ज्या वर्षी संस्थेमध्ये प्रत्यक्षात निवडणूक होईल, त्यावर्षी असा संपूर्ण खर्च हा एकाच आर्थिक वर्षात पडेल व संस्था विहित खर्चाची मर्यादा कदाचित ओलांडेल.

५. सेवक निवृत्ती लाभ :- Accounting Standard-15 प्रमाणे सेवकांना सेवानियमांप्रमाणे द्यावयाचे लाभ जसे की भविष्य निर्वाह निधी, उपदान, रजा पगार इत्यादी. अशा खर्चाची प्रतिवर्षी संस्थांनी तरतूद करावी. अन्यथा एखाद्या आर्थिक वर्षात संस्थांचे काही कर्मचारी मोठ्या संख्येने सेवानिवृत झाल्यास व त्यांचे सेवानिवृत्ती लाभ हे एकाच आर्थिक वर्षात खर्ची पडल्यास संस्था खर्चाची विहित मर्यादा पाळू शकणार नाही.

६. रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव खर्च :- संस्था आगामी काळात रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव साजरा करणार असल्यास अशा खर्चासाठी संस्थेने कोणतेही नियोजन केले नसल्यास असा महोत्सव ज्या आर्थिक वर्षात साजरा होणार आहे, त्या आर्थिक वर्षात संस्थेने असा एकरकमी खर्च केल्याने त्यावर्षी विहित खर्चाची मर्यादा ओलांडण्याची शक्यता असते. तसेच असे खर्च हे काही चालू वर्षी खर्ची टाकण्याची बाब नाही किंवा असा खर्च ही काही कायदेशीर तरतूद नाही. सहकारी नियम ४९-अ मध्ये कोणत्या खर्चाची संस्थांनी तरतूद करावी. यामध्ये अशा खर्चाच्या तरतुदींचा अंतर्भाव नाही. असा खर्च संस्थांनी करण्याचे ठरविले असल्यास अशा प्रसंगापूर्वीच काही वर्षे अगोदर निव्वळ नफ्यातून म्हणजेच नफा वाटणीतून पुढे काही वर्षे त्यासाठी तरतूद करावी. वार्षिक सभेत त्यास मंजुरी घ्यावी. अशा निधीच्या विनियोगाचे नियम बनवून त्यास ही वार्षिक सभेची मंजुरी घ्यावी व अशा निधी निर्मितीचा उपविधीमध्ये समावेश नसल्याने अशा विनियोग नियमावलीस संबंधित निबंधक कार्यालयाची मान्यता घेणे उचित ठरते.

७. देणगी/अंशदानः- सामाजिक बांधिलकी हे सहकाराचे एक उदात्त तत्त्व असून सहकार कायदा कलम ६९ प्रमाणे सहकारी संस्था या सार्वजनिक प्रयोजनासाठी/धर्मादाय कारणासाठी देणगी / अंशदान देऊ शकतात. धर्मादाय या शब्दाच्या व्याख्येत गरिबांना मदत, त्यांचे शिक्षण, औषधोपचार, नवीन रस्त्यांची बांधणी, शाळेची इमारत, वाचनालये उघडणे, पूरग्रस्तांसाठी मदत करणे व तत्सम सार्वजनिक हिताच्या बाबींचा समावेश होतो. संस्थांनी देणगी देण्यास्तव सहकार कायद्यानेच परवानगी दिलेली आहे. अर्थात एखाद्या आर्थिक वर्षात कोणत्याही तरतुदींविना अशी रक्कम दिल्यास नफा तोटा खात्यावर विपरीत परिणाम होऊन संस्था विहित खर्चाची मर्यादा ओलांडण्याचा धोका असतो. तसेच कलम ६९ मध्ये देखील धर्मादाय निधी हा नफा विभागणीतूनच उभारणी करण्याची तरतूद आहे. तरी संस्थांनी आपल्या निव्वळ नफ्याच्या विनियोगातून ज्या त्या वर्षी २०% च्या मर्यादेत असा निधी उभा करावा व याच कलमात सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे या राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेकडे रीतसर प्रस्ताव दाखल करून तिच्या पूर्व-मान्यतेने सार्वजनिक प्रयोजनासाठी आपले योगदान द्यावे म्हणजे कायद्यातील तरतुदींचे पालनही होईल व विहित खर्चाची मर्यादाही ओलांडली जाणार नाही.

✲ समारोप :- Carrot Stick Policy प्रमाणे पतसंस्थांनी २%ची खर्चमर्यादा पाळल्यास तिला लेखापरीक्षण वर्गवारी निश्चिती परिपत्रकाप्रमाणे पूर्ण १५ गुण मिळतील व संस्थांनी ही मर्यादा ओलांडल्यास त्या प्रमाणात हे गुण कमी कमी होत जाऊन खर्चाच्या मर्यादेने ३% ची मर्यादा ओलांडल्यास संस्थेस शून्य गुण मिळतील. थोडक्यात मर्यादा पालनास्तव बक्षिस (Carrot) मिळेल व मर्यादा ओलांडल्यास एक प्रकारची छडी (Stick) मिळेल म्हणून सहकारी पतसंस्थांनी विहित खर्चाची मर्यादा पाळण्यासाठी वर्षारंभापूर्वी नियोजन करावे. वर्षभरात वेळोवेळी अशा खर्चाचा आढावा घेऊन त्याचे व्यवस्थापन करावे व आपला कारभार काटकसरीने करावा.

श्री. संतोष मानूरकर
M.Com, CAIIB, D.T.M.,G.D.C.A
विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सोलापूर
मो. नं. - ९८५०७ ८३९८३

✲✲✲

को-ऑपरेटिव्ह आणि एन.बी.एफ.सी.

Non Banking Finance Companies – एनबीएफ सी – बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांची कर्ज वितरण प्रक्रिया जलद असल्याने बरेचदा सहकारी बँकांकडे जी कर्ज प्रकरणे पूर्वी येत होती ती आता अशा कंपनीकडून कर्ज घेऊ लागली आहेत. त्याचा नकारात्मक परिणाम सहकारी बँकांना भोगावा लागत आहे.

वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

दोन्हींचा स्टेट्स वेगळा आहे, कार्य कृती उत्पन्न आणि नफा सर्व भिन्न भिन्न आहेत. दोन्हीवर आरबीआयचा वर्चस्व आहे. काही बंधने एनबीएफसी यांना आहेतच. त्यांना बँकेचे दर्जा दिलेला नसल्याने काही बंधने आहेत. ओळख बँक म्हणून नाही. त्याने ते चेकबुक देऊ शकत नाहीत. सहकारी बँकांसमोर आणखीन एक प्रतिस्पर्धी म्हणून कंपन्या उभ्या ठाकल्या. काही अटींवर काही कंपन्या समाजातील गरजूंना कर्जाऊ रक्कम देण्यास पात्र ठरवल्या आहेत.

सुरूवातीला काही ठराविक कर्ज देता देता आता त्यांच्याकडून इतर काही गरज पुरविण्यासाठी कर्ज मंजुरी होताना दिसते. तेव्हा अनेकजण बँकांकडे न जाता एनबीएफसीकडून कर्ज मागणी करताना दिसतात. त्यामुळे बँकांसमोर प्रतिस्पर्धी त्रासदायक ठरू लागला आहे. कंपनीकडे अत्यावश्यक टेक्नॉलॉजी सहज उपलब्ध आहे. त्याबरोबर शिक्षित मनुष्यबळ आहे, हा नाही तर लगेच दुसरा कोणीतरी ते काम करू शकतो. त्यामुळे कामे पटापट कामे होतात. प्रपोजल छाननी कमी वेळात जलद गतीने होते. थोड्या प्रश्नांवर मंजुरी लगेचच, त्यामुळे लोकांना तिथून कर्ज घेणे अधिक सोयीचे, विना चौकशीचे, सोपी कागदपत्रे असे सहजगत्या मिळणारे कर्ज घेणे सोयीस्कर वाटणारच. यामध्ये आधारकार्ड ओळख पटकन होते, ऑनलाईन माहिती पुरवली जाते, नवीन खाते सहज काढले जाते, ठराविक फॉर्म भरून ईमेल वा व्हॉट्सपवर सर्व ते पुरवले जाते. संवाद होतो, थोडकी कागदपत्रे देऊन मंजुरीचा मेसेजदेखील मोबाईलवर झळकतो. पैसे पाठवायला मिनिट पुरते. आपोआप काही मिनिटांत कर्ज रक्कम खात्यात आल्याचा आनंद वेगळाच अनुभवला जातो. ते बँकेत जाणे नको, तिथल्या स्टाफबरोबर चर्चा नको, त्यांचे प्रश्न नको, की अधिकारी मंडळींशी बोलणे नको.

*** फिनटेक कंपन्या –** इलेक्ट्रॉनिक डिजिटल आर्थिक व्यवहार करताना पैशांची देवाणघेवाण महत्त्वाची असते. अशा व्यापारांसाठी आवश्यक टेक्नॉलॉजी देण्याचे महत्त्वाचे जबाबदारीचे काम फिनटेक कंपन्यांकडून देण्यात येते. ग्राहकांच्या दृष्टीने सोयीस्कर अशा सुविधा दिल्या जातात. वित्तीय कंपन्यांकडून सर्व प्रकारच्या आर्थिक क्षेत्रांशी अत्यावश्यक असलेली टेक्नॉलॉजी देण्यात येते. जी अतिशय महत्त्वाची गोष्ट बँकांसह अशा कंपन्यांना देखील लागतेच लागते. तेव्हा फिनटेक कंपन्यांनादेखील नव्याने अधिक प्रमाणात एनबीएफसीबरोबर काम करणे ओघाने आले आहे.

जे काम बँकांकडून केले जाणे अपेक्षित असते. ते काम इथे मोबाईलवर केल्याने बँकेकडे कर्ज मागणी करणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे. संपूर्ण देश मोबाईल प्रेमी झाला. त्याने सर्वप्रकारे त्याचा उपयोग करायला सुरुवात करूनही बराच काळ झाला. त्याचा फायदा एनबीएफसीकडून कर्ज घेताना दिसतो, तेव्हा नवीन तंत्रज्ञानाची निकड त्वरित पूर्ण करण्यासाठी बँकांना धावपळ करावी लागत आहे. डिजिटल बँकिंग ही काळाची गरज आहे. सहकारी बँकांनीदेखील डिजिटल सेवा उत्तम रीतीने देत आहेत. अनेक सहकारी बँका टेक्नॉलॉजी आधारित बँकिंग यशस्वी करीत आहेत. बँकांवर इतरही बंधने असतात, नवीन तंत्रज्ञान माहीतगार कर्मचारी भरती करणे आवश्यक झाले. तेही केले जाते. नवीन कर्जाची गरज असलेली व्यक्ती शोधून त्याला बँकेकडे आणणे महत्त्वाचे झाले आहे. त्यांना सगळेच लवकर हवे असते, कमी वेळ, कमी खर्च आणि मोठे कर्ज, त्यावर व्याजदरासह इतर सवलती देणे सहकारी बँकांना करणे शक्य नसते.

कर्ज वसुली आखीव रेखीव पद्धतीने केली जाते. आधीच फोन करून हप्त्याची आठवण केली जाते. त्यामुळे हप्ता चुकविणे जरा कर्जदाराला अवघड जाते. इथे कर्ज व्याजदर बँकांच्या दरापेक्षा बहुतेक ठिकाणी अधिक असतो. बँकेतील व्याज आकारणी पद्धत आणि कंपनीची पद्धत वेगवेगळी असते. त्यातील फरक कर्जदारास समजेलच असे नाही. ते कर्ज नक्कीच ग्राहकास महाग पडते. विविध प्रकारचे चार्जेस घेतले जातात, त्याची आधी कल्पना दिली असेलच असेही नसते.

ज्या सहकारी बँकांनी भविष्याची गरज ओळखून दहा वर्षांपूर्वीच तंत्रज्ञानाचा स्वीकार केला असेल डिजिटल सेवा, सुविधा, ग्राहकसेवा, कर्ज मंजुरी वाटप, वसुलीसह इतर सर्व गोष्ट त्यांनी अवगत केलेल्या आहेत. हे सगळे पाहता बँकिंग सेक्टरमध्ये अजूनही खूप काही करायला जागा आहे, भारतीय रिझर्व्ह बँकेने सहकारी मंत्रालय स्थापन केल्याने सर्वच सहकारी बँका गरुड झेप घेण्याच्या तयारीत आहेत. रिझर्व्ह बँक आणि मंत्रालय दोन्हीमुळे नक्कीच नजीकच्या भविष्यात अधिकाधिक प्रगती बँकिंग क्षेत्रात नजरेत येणार आहे.

वंदना धर्माधिकारी,
ईमेल : vandana10dyahoo.co.in
M - 9890623915

फुलबाजाराशी संबंधित पुरक उद्योगाकडे वळावे : मंगेश तिटकारे

शेतकऱ्यांनी पुढील काळात फक्त फुलपिके घेवून चालणार नाही, तर त्याही पुढे जाऊन उत्पन्न वाढीसाठी फुलबाजाराशी संबंधित डेकोरेशन, बुके यासाठी लागणारा सर्व प्रकारचा माल, फॅन्सी कागद, बांबूच्या जाळ्या, टोपल्या, ग्रीन फोलिएज यांचे उत्पादन व्यवसायाकडेही लक्ष केंद्रित केल्यास पारंपरिक घरगुती गृहउत्पादनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये वाढ होऊ शकते, असे प्रतिपादन महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मंगेश तिटकारे यांनी बुधवार दि. १० सप्टेंबर रोजी केले.

राळेगणसिद्धी येथे सहकार व पणन विभाग आशियाई विकास बँक अर्थसाहित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क, मॅग्नेट प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे आणि आत्मा व अहिल्यानगर कृषी विभाग यांच्यातर्फे शेतकऱ्यांसाठी आयोजित एक दिवसीय फुलपिके कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी नाशिकचे प्रकल्प उपसंचालक शिवपुरी, आत्माचे प्रकल्प उपसंचालक राजकुमार मोर, तालुका कृषी अधिकारी गजानन घुले, हेमंत जगताप, सनी काटे, महेश वसईकर, धनराज देशेटवार, देवेंद्र जाधव आदी उपस्थित होते. यावेळी तिटकारे यांनी शेतकऱ्यांनी फुलपिके उद्योगातील भविष्यातील व त्यातील प्रक्रियायुक्त उपपदार्थांविषयी माहिती दिली. महामंडळामार्फत भविष्यातही अशा प्रकारचे कार्यक्रम जिल्ह्यामध्ये घेण्यात येतील, असे ते म्हणाले.

शिवपुरी यांनी मॅग्नेट प्रकल्पाची माहिती देत जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी या प्रकल्पाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

डॉ.गणेश कदम यांनी खुल्या वातावरणातील शेवंती, निशिगंधा, ग्लॅडीओलस आदी पिकांची सविस्तर माहिती दिली, तर राजन निफाडकर तांत्रिक अधिकारी के. एफ. बायोप्लांट यांनी नियंत्रित वातावरणातील जलबेरा, कारनेशन व जिप्सेफिला व डॉ. शिवकुमार यांनी फुल पिकांचे कीड व रोग नियंत्रण याविषयी माहिती दिली. पंडित शिकारे यांनी फुलशेतीतील अनुभव कथन केले. न्यू लीफ डायनॅमिक टेक्नॉलॉजी पुणेचे विवेक गिर यांनी बायोमास आधारित कोल्ड स्टोरेज तंत्रज्ञान समजावून सांगितले. सनी काटे यांनी मॅग्नेट प्रकल्पाच्या योजना, तर धनराज देशेटवार यांनी लिंग समानता व सामाजिक समायोजन, याबाबत मार्गदर्शन केले. साबळे व घुले यांनीनी मार्गदर्शन केले. हेमंत जगताप यांनी सूत्रसंचालन केले, देवेंद्र जाधव यांनी आभार मानले. प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्ह्यातील सुमारे दोनशे शेतकरी बांधवांनी सहभाग घेतला.

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करा : श्री. अनिरुध्द देसाई

''एन.सी.डी.सी मार्फत स्थापित शेतकरी उत्पादक सहकारी संस्थानी आपल्या कार्यक्षेत्रात विविध व्यवसाय सुरु करुन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत'' असे आवाहन पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिरुध्द देसाई यांनी बुधवार, दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी काढले. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संयुक्त विद्यमाने एन.सी.डी.सी अंतर्गत स्थापित शेतकरी उत्पादक सहकारी संस्थांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी श्री. देसाई बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामंडळाचे व्यवस्थापकिय संचालक श्री. मंगेश तिटकारे होते.

''आपल्या भाषणात श्री. देसाई म्हणाले की, एन.सी.डी.सी ने पुणे जिल्ह्यात ११ शेतकरी उत्पादक सहकारी संस्था स्थापण्यासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेस क्लस्टर बेस्ड बिझनेस ऑर्गनायझेशन म्हणुन नियुक्त केले असुन त्या अंतर्गत संस्थांना प्रशिक्षण, अभ्यासदौरे यासाठी तसेच समभाग निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.मात्र संस्थांना एन.सी.डी.सी नियमांनुसार प्रशिक्षण, सभासद, भागभांडवल, जमा करावे लागणार असुन त्यावर आधारीत निधी उपलब्ध होणार आहे. केंद्र सरकार सहकारी संस्थांना बळकटीकरणासाठी प्रयत्न करीत असुन शेतकरी उत्पादक सहकारी संस्थाना विविध व्यवसाय, उद्योग करण्यास यामधून संधी मिळत असुन त्याकरीता निधीही उपलब्ध होत आहे. या

संधीचा संस्थानी लाभ घ्यावा.

महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.तिटकारे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, महामंडळ नाबार्डच्या ५६ आणि एन.सी.डी.सी च्या ५ संस्थांच्या बळकटीकरणासाठी प्रशिक्षण, अभ्यासदौरे, समभाग निधी इ.साठी कामकाज करीत असुन संस्थांच्या व्यवसाय वृध्दीसाठी विविध उपक्रम हाती घेत आहे. प्रशिक्षणार्थींनी आपल्या संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सहकार्य करावे, सहभागी व्हावे. महामंडळाकडे उपलब्ध तज्ज्ञांच्या सेवांचा उपयोग करुन घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ९ शेतकरी उत्पादक सहकारी संस्थांचे ३० पदाधिकारी /अधिकारी उपस्थित आहेत. कार्यक्रमाचे प्रस्ताविक महामंडळाच्या कृषी व्यवसाय वृध्दी कक्षाचे प्रमुख डॉ. भास्कर पाटील यांनी केले. प्रशिक्षणाचा उद्देश त्यांनी यावेळी विषद केला. कार्यक्रमास बँकेचे अधिकारी श्री. गिरीष जाधव, श्री.सुनिल माळी, महामंडळाचे राज्य समन्वयक श्री.सादिक मणेरी, अभय सर्वज्ञ उपस्थित होते.

'देशात दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था होणार' केंद्रीय सहकार मंत्री श्री. अमित शहा

देशातील ग्रामीण भागात परिवर्तन घडविण्यासाठी 'सहकार से समृद्धी' या आधारे देशाच्या विविध भागात सुमारे दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था स्थापन करण्याचे उद्दीष्ट असल्याचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितले. यामधून अंदाजे २२ विविध प्रकारची कामे आणि ३०० योजनांचे केंद्र म्हणून पतसंस्था काम करणार आहेत असे त्यांनी नमूद केले.

केंद्रीय सहकार मंत्री श्री. अमित शहा

'सहकार से समृद्धी' या राष्ट्रीय परिसंवादात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर आदी यावेळी उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, संपूर्ण जगामध्ये सहकार क्षेत्राकडे आर्थिक व्यवस्थेची संकल्पना म्हणून पाहण्यात येत आहे तर आपल्या देशासाठी सहकार क्षेत्र हे पारंपारिक जीवनशैलीतील रुजलेले तत्त्वज्ञान आहे. एकत्र येणे, विचार करणे, काम करणे आणि एकमेकांच्या दु:खात सहभागी होणे. तसेच समान ध्येय समोर ठेवून पुढे जाणे, हा भारतीय विचार शैलीचा मुख्य धागा आहे. अन्नदाता शेतकरी बांधवांना सक्षम करण्यासाठी देशात प्रथम स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन करण्यात आले. युनोने सन २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले आहे. त्यादृष्टीने देशात २ लाख नवीन विविध कार्यकारी सोसायटी स्थापन करण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक या राज्यांनी सहकाराच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

विविध कार्यकारी सोसायटी या केवळ कृषी क्षेत्रापुरत्या मर्यादित नाही तर नव्याने २२ सेवा क्षेत्राशी जोडण्यात येणार आहेत. यामध्ये जेनेरीक औषधे, पेट्रोल, गॅस वितरण, रेल्वे तिकीट सेवा अशा विविध सेवा यामध्ये असणार आहेत. तसेच सहकार क्षेत्राच्या माध्यमातून युवक आणि महिला यांच्यासाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सहकारातून समृद्धीकडे महाराष्ट्राची वाटचाल सुरू असून राज्यामध्ये विविध कार्यकारी सोसायटी आणि एफपीओच्या माध्यमातून विविध योजना यशस्वीपणाने राबविल्या जात आहेत. यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मितीला मिळत असून शेतकरी वर्गाला बाजारपेठेची साखळी उपलब्ध होत आहे. एका अर्थाने ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत आहे. केंद्र सरकारने दिलेले उद्दिष्ट राज्य अधिक सक्षमपणे पूर्ण करीत आहे.

त्रिभुवन सहकार विद्यापीठाचा अभ्यासक्रम त्या त्या राज्यांतील भाषेत शिकविणार - श्री. मोहोळ

देशांतील विविध राज्यात कार्यरत असलेल्या विविध कार्यकारी सहकारी संस्था सक्षम करण्याबरोबर नव्याने स्थापन होणाऱ्या देशातील पहिल्या सहकार विद्यापीठाचा अभ्यासक्रम त्या त्या राज्यांतील भाषेत देण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.

केंद्रीय सहकार राज्यमंत्री श्री. मुरलीधर मोहोळ

सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण, संशोधन आणि शैक्षणिक अभ्यासक्रम यावर भर दिला जाणार आहे, असे नमूद करुन ते म्हणाले, यासाठी त्या त्या राज्यांतील संस्थांना संलग्नता दिली जाणार आहे. तसेच जगातील सर्वात उत्तम पद्धतीचा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. आगामी पांच वर्षात सुमारे १७ लाख युवकांची सहकार क्षेत्राच्या वाटचालीसाठी आवश्यकता आहे. यासाठीच सहकार विद्यापीठ कार्यरत असणार आहे. विद्यापीठातून प्रशिक्षित मनुष्यबळ गरज पूर्ण होऊ शकते. त्या त्या राज्यांतील विविध सहकारी सोसायटी सक्षम करणे, यासाठी २५ विविध प्रकारचे व्यवसाय सुरु करण्यात आले आहेत. आता ४२ हजार सोसायट्या सुरु असून ६८ हजार सोसायट्यांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे.

या सोसायट्यांना आयकर नाही पण रिटन्स भरणे आवश्यक आहे. वैकुंठभाई मेहता ही संस्था नव्याने स्थापन होणाऱ्या त्रिभुवन सहकार विद्यापीठाचा एक महत्त्वाचा भाग असणार आहे, असे एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. ते म्हणाले, साडेतीन वर्षांपूर्वी सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात आले. यामुळे सहकार क्षेत्राच्या विस्ताराला गती आली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात त्रिभुवन विद्यापीठाबाबतचे विधेयक संमत झाले आहे. नजीकच्या काळात विद्यापीठ सुरू होईल. त्यासाठीची मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सहकार क्षेत्राच्या विस्तारासाठी आणि या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या युवकांना विद्यापीठाच्या माध्यमातून भविष्याची दिशा मिळू शकणार आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

एनसीडीसीच्या माध्यमातून देशातील सहकार क्षेत्राला १ लाख २८ हजार कोटी निधी देण्यात येणार आहे, असे नमूद करून ते म्हणाले, त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखान्यांना सुद्धा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

शेतकऱ्यांनी नवीन मार्केट खुले केले पाहिजे

श्री. दिपक तावरे

'महाराष्ट्र राज्य कृषी मालाच्या निर्यातीमधील देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य असुन द्राक्ष, केळी , डाळींब, आंबा, मिरची, भेंडी, लांब दांडयांची फुले यांच्या निर्यातीमध्ये राज्याने उत्तम प्रगती केली आहे. युरोपमध्ये गोड न आवडणारी लोकसंख्या आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी युरोप बरोबरच नवीन मार्केट आपल्या शेतमालासाठी खुले करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत ' असे आवाहन राज्याचे सहकार आयुक्त तथा निबंधक सह. संस्था मा . श्री. दिपक तावरे यांनी सोमवार दि.१८ ऑगस्ट २०२५ रोजी केले. महामंडळाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या 'कृषीमाल निर्यात प्रशिक्षण' कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी श्री.तावरे बोलत होते. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.मंगेश तिटकारे यावेळी उपस्थित होते.

'जागतिक बाजारपेठ ही स्पर्धात्मक आहे. जागतिक बाजारपेठेत भारताचा आंबा, द्राक्ष, संत्रा हे प्रथम क्रमांकावर आहेत असे काही नाही. आपण जागतिक बाजारपेठेत आपल्या मालासाठी जागा मिळवली पाहिजे . सन १९८० पर्यत आपण आयातदार होतो. नंतर स्वयंपुर्ण झालो आणि २००५ नंतर आपण निर्यातदार झालो आहोत. कांदा, धान्य, तांदुळ, काही फळे हे आपणाकडे जास्तीची उपलब्धआहेत. जागतिक बाजारपेठेत भारतीय निर्यातदारांकडे बेभरवशाचे म्हणुन पाहिले जाते. ही दृष्टी बदलणे गरजेचे आहे. शेतकरी खरेदीदारांकडे तात्पुरत्या फायदयासंदर्भातुन पहातो. शेतकऱ्यांनी निर्यातदारांकडे दिर्घकाळ संबंध ठेवण्याच्या दृष्टीने पहिल्यास निर्यातदार जागतिक बाजारपेठेतील आपली प्रतीमा बदलवु शकतील. तसेच शेतकऱ्यांनी मालच्या प्रतीबाबत दक्ष असणे गरजेचे आहे'. असेही श्री.दिपक तावरे म्हणाले

आपल्या भाषणात श्री. तावरे म्हणाले की, 'कृषी माल निर्यात प्रशिक्षणार्थींनी आपल्याकडे उपलब्ध वेगळ्या उत्पादनांच्या निर्यातीकडे लक्ष द्यावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्रतीच्या बाबतीत समझोता करु नये. काही कृषी मालांच्या बाबतीत स्थानिक बाजारपेठेत चांगल भाव मिळत असल्याने निर्यातीत अडचणी येतात. निर्यात क्षेत्रात भविष्य आहे, संधी आहेत. तथापी आपण कोणत्या मालाच्या निर्यातीस सुरुवात करावयाची ते ठरवुन, अभ्यास करुन, येणारे फायदे तोटे विचारात घेवुन निर्यातीत उतरा. यामुळे निश्चितच आपण शेतकऱ्यांनाही योग्य न्याय देवु शकाल'.

कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी बोलतांना महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मंगेश तिटकारे म्हणाले की, 'महाराष्ट्र राज्य कृषीमालाच्या निर्यातीत अग्रेसर असुन जगात निर्यातीसाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या सुविधा, आंतरराष्ट्रीय विमानतळ, बंदरे राज्यात आहेत. याचा फायदा घेवुन राज्यातील युवकांनी निर्यातदार व्हावे यासाठी कृषीमाल निर्यात प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केला आहे. याव्दारे राज्यातील सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि वैयक्तिक शेतकरी निर्यातीत उतरतील असे अपेक्षित आहे'.

प्रशिक्षण कार्यक्रमाची प्रस्तावना कृषी व्यवसाय वृध्दी विभागाचे प्रमुख डॉ.भास्कर ना. पाटील यांनी केली तसेच उपस्थितीचे आभार मानले. यावेळी महाव्यवस्थापक श्रीमती. शिल्पा कदु भदाणे, श्रीमती. शितल भोसले पाटील, राज्य समन्वयक निविष्ठा श्री. रमेश शिंगटे, राज्य समन्वयक श्री. सादिक मणेरी उपस्थित होते . प्रशिक्षणात एकुण ३२ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला . प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. १८ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०२५ असे पाच दिवसासाठी करण्यात आले होते.

प्रशिक्षणार्थींची वाशी नवी मुंबई येथील विकीरण सुविधा केंद्र, वेपर हिट ट्रिटमेंट सुविधा, भाजीपाल प्रक्रिया केंद्र यांना भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्र सहकार विकास
महामंडळ मर्यादित पुणे आयोजित,

MCDC

कृषी माल निर्यात प्रशिक्षण कार्यशाळा (५ दिवसीय)

- तुम्हाला स्वतःचा कृषी माल निर्यात व्यवसाय सुरू करण्याची इच्छा आहे का ?
- कृषी आणि अन्न प्रक्रिया उत्पादने परदेशात निर्यात करून मोठ्या संधी मिळवा !
- योग्य प्रशिक्षण, कागदपत्रे, सरकारी परवाने आणि मार्केटिंग इ. बाबतची परिपूर्ण माहिती देणारी, कृषी निर्यात क्षेत्रातील दिशादर्शक ५ दिवसीय कार्यशाळा !!

या कार्यशाळेत आपणांस खालील माहिती मिळेल...

- IEC, RCMC, PAN, TAN, DIN, DSC, ICEGATE, AD CODES, इ.परवाने काढण्याची कार्यपद्धती.
  (निर्यात व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक परवानग्या, परवाने, नोंदणी, इ. माहिती.)
- पॅकेजिंग आणि वाहतूक व्यवस्थापन – मालाची सुरक्षितता आणि खर्च बचत - प्रभावी डिलिव्हरी.
- निर्यातीसाठी आवश्यक कागदपत्रे – कस्टम क्लीयरन्स आणि परवाने, प्रोसिड्यूर आणि डॉक्युमेंटेशन.
- DGFT, इ.सी.जी.सी, डी.एम.आय, अपेडा, G-GAP, N.P.P.O., C.H.A, G.I.C. इ.चा निर्याती मधील सहभाग.
- निर्यातीमधील धोके आणि सुरक्षा.
- आयातदार कसे शोधावे ? – आयातदारांशी संपर्क साधण्यासाठी विविध स्ट्रॅटेजी !
- ब्रॅण्डिंग व लेबलिंग.



प्रशिक्षणार्थी - कृषी माल निर्यातीचा व्यवसाय करण्यासाठी इच्छुक व्यक्ती, सहकारी संस्था, खाजगी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, विद्यार्थी, इ. साठी उपयुक्त.

वैशिष्ट्ये:

१. सुविधा केंद्रात प्रत्यक्ष भेट
(IFC, VHT, VPF, HOT WATER TREATMENT)
२. अनुभवी व तज्ज्ञ मार्गदर्शक

प्रशिक्षण शुल्क: (जी.एस.टी. सह)

- निवासी - रु. ११,५०५/-
- अनिवासी - रु. ९,७३५/-
- प्रशिक्षण कालावधी - ५ दिवस

(सामाविष्ट – चहा, नाश्ता, जेवण (सकाळ + संध्या.), प्रशिक्षण साहित्य, प्रमाणपत्र)

कृषी माल निर्यात प्रशिक्षणाने तुम्हाला निर्यात व्यवसाय सुरू करण्याचा आत्मविश्वास आणि निर्यातीमध्ये यशस्वी होण्यासाठी योग्य दिशा मिळेल ! आजच संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करा.

अधिक माहितीसाठी - श्री. सादिक मणेरी, राज्य समन्वयक, एम. सी. डी. सी., पुणे.
८६००९८७८०७ mcdcexport@gmail.com
पत्ता - महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११००५

(PRGI Reg. No. MHMAR/25/A1461)

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे

महामंडळामार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम

प्रशिक्षण विषय

१. शेतकरी उत्पादक कंपनी
२. शेतकरी उत्पादक कंपनी संचालक मंडळ/ मुख्य कार्यकारी अधिकारी
३. गोदाम बांधकाम, अन्न धान्य साठवणूक व धान्य प्रतवारी यंत्र
४. मसाल्याचे उत्पादन व मूल्यवर्धन
५. कृषी प्रक्रिया उद्योग
६. भाजीपाला रोपवाटिका व्यवस्थापन
७. शेतकऱ्यांसाठी भौगोलिक निर्देशांकाचे महत्व
८. शेडनेट हाऊस तंत्रज्ञान
९. पॉली हाऊस तंत्रज्ञान
१०. नर्सरी तंत्रज्ञान
११. हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान
१२. फळे व भाजीपाला डिहायड्रेशन आणि कॅनिंग प्रक्रिया
१३. मशरूम उत्पादन
१४. आदर्श कृषी पद्धती
१५. फळे व भाजीपाला काढणी पश्च्यात तंत्रज्ञान (PHM)
१६. कोल्डस्टोरेज व कोल्डचेन मॅनेजमेंट
१७. भाजीपाला लागवड तंत्रज्ञान
१८. सोलर डीहायड्रेशन

सहकारी संस्थासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम

- गृह निर्माण संस्था
- पतसंस्था
- बँका
- दुध संस्था
- वि.का.सेवा सहकारी संस्था
- साखर कारखाने

संपर्क

श्री. हेमंत जगताप
मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी,
मो. क्र. ८२७५३७१०८२

श्रीमती शुभांगी भोलनकर
प्रशिक्षण समन्वयक
मो. क्र. ९३२२७९४५५०

श्री. मयुर पवार
प्रशिक्षण समन्वयक
मो. क्र. ८२६३९१५३४७

श्री. मयुर शेळके
प्रशिक्षण समन्वयक
मो. क्र. ७०२८६२५४९६

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे
पहिला मजला, 'साखर संकुल' न.ता.वाडी, शिवाजी नगर, पुणे-४११००५, दुरध्वनी क्र. (०२०)२९८०९४०८
इमेल - mcdctraining2021gmail.com वेबसाईट - www.mahamcdc.com

प्रेषक :
महा सहकार
महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे
पहिला मजला, 'साखर संकुल' न.ता.वाडी,
शिवाजी नगर, पुणे-४११००५ दुरध्वनी क्र. (०२०)२९८०९४०८
इमेल - mcdctraining2021gmail.com
वेबसाईट - www.mahamcdc.com

प्रति,